सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
तरुण भारत २०२६ दिनदर्शिकासह
धाराशिव | शुक्रवार, ९ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३१० | पाने १२ | किंमत रु. २८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com







# ना बाण, ना खान आता फक्त भगव्याची शान



## मुख्यमंत्री फडणवीसांची नवी घोषणा; शिवसेनेमुळे युती तुटल्याचा दावा

**छत्रपती संभाजीनगर, दि.९ जानेवारी,**

'ना बाण, ना खान. आता फक्त भगव्याची शान', अशी नवी घोषणा गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये केली. येथील युती फक्त शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांमुळे तुटली असा दावा त्यांनी केला.

सोबतच शहर खड्डेमुक्त करू. संभाजीनगरचा पाणीप्रश्न दोन महिन्यात सोडवू, असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी प्रचार सुरू केला आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आले असता त्यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला. यात त्यांनी संभाजीनगरच्या विकासासाठी करण्यात आलेल्या योजना तसेच निधींच्या तरतुदीबद्दल माहिती दिली. तसेच शहराच्या विकासाचे नवे व्हीजनही मांडले.

### एआयबाबतचे जागतिक स्तरावरील काम संभाजीनगरातून

उद्योजकासंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की उद्योजक संभाजीनगरच्या प्रेमात पडतात. आता दावोसमधून संभाजीनगरसाठी आणखी निधी आणणार असल्याचे देखील यावेळी त्यांनी आश्वासन दिले आहे. इतकेच नव्हे तर एआयबाबतचे जागतिक सतरावरील काम संभाजीनगरातून होत असल्याची देखील माहिती फडणवीसांनी दिली आहे.

### औरंगजेबाची निशाणी जपण्याची नाही गरज

छत्रपती संभाजीनगर शहराविषयी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, इतिहास पुसायचा नाही, पण इतिहासातून ज्या ठिकाणी गुलामगिरीची जाणीव होते त्या ठिकाणी मात्र जो खरा इतिहास आहे तो मांडायचा आहे. औरंगजेब हा काही भारतीय नव्हता, अगदी भारतीय मुस्लिम समाजाचा सुद्धा तो हीरो नव्हता. त्याने आक्रमण करून हिंदूंची मंदिरे पाडली, त्यामुळे त्याची निशाणी जपण्याची गरजच नाही. हिंदवी स्वराज्याचे तेज छत्रपती संभाजी महाराजांचे असे जीवंत ठेवले की औरंगजेबाची कबर इथे तयार झाली पण हिंदवी स्वराज्य संपले नाही.

# बांगलादेशात पुन्हा हिंसाचार

## ● सुरक्षा दलासोबतच्या संघर्षात ४ ठार, ५० जखमी

**ढाका, ८ जानेवारी**

बांगलादेशची राजधानी ढाका येथे बुधवारी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपीचे नेते अजीजुर रहमान मुसब्बिर यांची अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केली. यावेळी त्यांच्यासोबत असलेले अबू सुफियान मसूद गंभीर जखमी झाले.

या घटनेनंतर ढाका शहरात बीएनपीच्या कार्यकर्त्यांनी धुडगूस घालत शासकीय वाहने, इमारतींची तोडफोड आणि जाळपोळ केली. पोलिस आणि सुरक्षा दलांसोबत झालेल्या संघर्षात चार जणांचा मृत्यू तर, ५० पेक्षा अधिक जखमी झाले. तेजगाव विभागाचे अतिरिक्त पोलिस उपायुक्त फजलुल करीम यांनी सांगितले की, बीएनपी पक्षाचे माजी सरचिटणीस आणि तेजगाव येथील उमेदवार अजीजुर रहमान मुसब्बिर कारवान येथील तेजतुरी बाजारातून कारमधून जात होते.

यावेळी स्टार कबाब हॉटेलसमोर दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी कार अडवली आणि बेछूट गोळीबार केला. गस्तीवर असलेल्या पोलिसांनी घटनास्थळाकडे धाव घेतल्यानंतर हल्लेखोर पसार झाले. गंभीर अवस्थेत मुसब्बिर आणि त्यांच्यासोबत असलेल्या मसूद यांना बीआरबी रुग्णालयात पोहोचविण्यात आले. डॉक्टरांनी मुसब्बिर यांना मृत घोषित केले, तर मसूद यांच्यावर उपचार सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच बीएनपीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आणि त्यांनी निदर्शने केली. कारवान पोलिस ठाण्यावर त्यांनी हल्ल्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी बळाचा वापर करीत त्यांना हुसकावून लावले.




# वेळापूर परिसरात २१ लाख ६७ हजारांचा गुटखा पकडला

## वेळापूर पोलिसांची मोठी कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.८ जानेवारी-**

वेळापूर पोलिसांनी परिसरामध्ये २१ लाख रुपये किंमतीचा गुटखा व मुद्देमाल ९ लाख रुपयांचा अशी एकुण ३० लाख रुपयांची मालमत्ता पकडून जप्त करून मोठी कामगिरी केली आहे.

८ जानेवारी रोजी वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीत रात्रीची गस्त घालणारे पोलीस नाईक नितीन लिंगडे पोलीस बसवराज बिराजदार व पो.हे. अविनाश मोरे यांना घुमेरा वेळापूर येथे पहाटे ३ वा. च्या सुमारास सांगोला ते अकलूज रोडवर अशोक लेलँड कंपनीचे चार चाकी वाहन एमएच ४२बीएफ २८८७ या वाहनातील मालाबाबत संशय वाटल्याने सदर वाहनाची चौकशी केली. सदर वाहनात पाठीमागील हौद्यात बारदानाच्या पोत्यामध्ये अवैधरित्या प्रतिबंधित गुठखा असल्याचे दिसून



आले. वाहन ताब्यात घेऊन ते वेळापूर पोलीस स्टेशन येथे आणून अन्नसुरक्षा अधिकारी मंगेश लवटे यांना कळवले. त्यांच्या उपस्थितीत सदर वाहनातील गुठखा असलेल्या बारदानाची पोत्यांची पंचासमक्ष तपासणी केली. एकूण ६२ बारदानाच्या पोत्यामध्ये व ३ पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये विमल पान मसाला, आर.एम. डी, सुगंधी तंबाखू गुटखा असे एकूण २१ लाख ६७ हजार १२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व ९ लाख रुपये किमतीचे अशोक लेलँड वाहन व वाहनाच्या केबिनमध्ये व २० हजार रुपये किमतीचे vivo कंपनीचे २ मोबाईल सह एकूण ३० लाख ८७ हजार १२० रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. श्री. लवटे यांनी मुद्देममाल जप्त करून ताब्यात घेतला. तसेच सदर वाहनाची तपासणी करता सदर वाहनामध्ये गुटखा असल्याचे कोणी ओळखू नये म्हणून वाहनाच्या पाठीमागे फाळका एक थर प्लास्टिक गोण्यामध्ये सोयाबीन भरले होते. सदर वाहनावर पोलीस कारवाई करत असताना वाहनाचा चालक हा वाहन जागीच सोडून अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला.

गुटखा विक्रीसाठी वाहनातून घेऊन जात आढळून आले आहे व अन्नसुरक्षा आयुक्त महाराष्ट्र राज्य या लोकसेवकाने त्यांना दिलेल्या अधिकारानुसार जनहित व जन आरोग्याच्या दृष्टिकोनातून काढलेल्या आदेशाची अवज्ञा केल्याने मिळून आलेल्या वाहनाचे अज्ञात चालक, अज्ञात मालाचे मालक याच्याविरुद्ध अन्नसुरक्षा अधिकारी मंगेश मल्हारी लवटे यांनी वेळापूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी व पोलीस उपनिरीक्षक आकाश शेळके, पोलीस हेड कॉन्स्टेबल यशवंत आनंदपुरे, लिंगडे नितीन, बसवराज बिराजदार, तानाजी पांढरे ,अविनाश मोरे यांनी केली आहे. याचा अधिक तपास सपोनी भाऊसाहेब गोसावी हे करीत आहेत.

## महत्वाचे...



### सांगोला महाविद्यालयातर्फे दादासाहेब घाडगे यांचा सन्मान

**सांगोला, दि.८ जानेवारी -**

सांगोला महाविद्यालय आणि शिवणे ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात शिवणे गावचे सरपंच दादासाहेब घाडगे यांनी दिलेल्या योगदानाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सहभाग नोंदविणाऱ्या शिबिरार्थी विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत शिवणे यांच्या मार्फत सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड होते. यावेळी संस्था उपाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव ड.उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, सदस्य विश्वनाथ चव्हाण, शामराव लांडगे, सु.ग.फुले, प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले उपस्थित होते. यावेळी बाबुराव गायकवाड, दादासाहेब घाडगे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.सदाशिव देवकर, सूत्रसंचालन डॉ.भाग्यश्री पाटील यांनी केले. आभार डॉ. रेणुकाचार्य खानापुरे यांनी मानले.

### लज्जा वाटेल असे कृत्य; तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि. ८ जानेवारी-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात एका ३० वर्षीय तरुणीस तुम्ही खूप छान दिसत आहात असे म्हणत तिला खुणवून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी सोहेल मुल्ला,सलिम मुल्ला, इमरान मुल्ला




(रा.सलगर बु.) या तिघाविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी तीस वर्षीय तरुणी दि.२९ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता घराजवळ असताना वरील आरोपींनी मोटर सायकलवर येऊन तुम्ही खूप छान दिसत आहात असे म्हणत हाताने इशारे करुन तरुणीकडे पाहत खुणवून तु आमच्या सोबत चल असे म्हणत तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले व न आल्यास बघून घेवू असे म्हणत आरोपीने शिवीगाळी दमदाटी केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस नाईक हजारे हे करीत आहेत.

### गणेश जंगडेकर सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

शहरात व परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या एका इसमाला दोन वर्षांसाठी सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. गणेश राम जंगडेकर वय ४२, रा. मोदीखाना, सोलापूर असे तडीपार करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. गणेश जंगडेकर याच्याविरोधात सन २०२०, २०२४ व २०२५ या कालावधीत गैरकायद्याची मंडळी जमवून दंगा व मारामारी करणे, सामान्य नागरिकांना शिवीगाळ, मारहाण व दमदाटी करणे तसेच नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे यासारख्या स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. या पार्श्वभूमीवर सदर बझार पोलीस ठाण्याकडून आरोपीस तडीपार करण्याचा प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांच्याकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची सखोल चौकशी व कार्यवाही केल्यानंतर विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांनी तडीपार दि. ०६ जानेवारी रोजी गणेश राम जंगडेकर यास सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीतून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.

### मजहर कोरबू दोन वर्षांसाठी सोलापूर जिल्ह्यातून तडीपार


**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

शहरात वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या मजहर जब्बार कोरबू वय ३३, रा. ११५, कुर्बान हुसेन नगर, सोलापूर यास सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षांच्या कालावधीसाठी तडीपार करण्यात आले. मजहर जब्बार कोरबू याच्याविरुद्ध सन २०१४, २०१६, २०१७, २०२०, २०२१, २०२४ व २०२५ या कालावधीत गैरकायद्याची मंडळी जमवून दंगा व मारामारी करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, तसेच घातक शस्त्र बाळगून परिसरात दहशत निर्माण केल्याप्रकरणी विविध गुन्हे दाखल आहेत. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होत असल्याचे निष्पन्न झाले होते. त्याअनुषंगाने सदर बझार पोलीस ठाण्याकडून तडीपार करण्याचा प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांच्याकडे सादर करण्यात आला होता. प्रस्तावाची सखोल चौकशी व सुनावणीअंती पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) सोलापूर शहर विजय कबाडे यांनी दि. ०५ जानेवारी मजहर जब्बार कोरबू यास सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून कठोर पावले उचलली जात असल्याचे चित्र आहे.

### पोस्टर मेकिंग विभागीय स्पर्धेत कोठारी प्रशालेचे महेश स्वामी चौथे

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने अहमदनगर येथे घेण्यात आलेल्या शिक्षक अधिकारी पोस्टर मेकिंग



स्पर्धेत श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी प्रशालेतील महेश स्वामी यांनी विभागीय स्तरावर चौथा क्रमांक मिळविला. या कामगिरीवर त्यांची राज्यस्तरासाठी निवड झालेली आहे. राज्यस्तरावरील ही स्पर्धा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था परभणी येथे होणार संपन्न आहेत. विभागीय स्तरांवर मिळविलेल्या यशाबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश यादवाड व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालकांनी कौतुक करून अभिनंदन केले.

## सावता माळी विद्यालयात

# आनंद बाजारचे आयोजन; लाखो रुपयांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.८ जानेवारी-**

संत सावता माळी विद्यालय अरण येथे आनंद बाजार चे आयोजन करण्यात आले होते. भागीरथी रणदिवे, सौ. प्रभावती शिंदे, सौ गाजरे, सौ. चोरमोले यांच्या शुभहस्ते बाजार चे उदघाटन झाले. यावेळी भारतीय सैन्य दलामध्ये सी डी एस स्पर्धा परीक्षेतून लेफ्टनंट पदी निवड झालेल्या अजित रणदिवे याचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे माजी विद्यार्थी मेजर शंकर दिगंबर रणदिवे यांचा सैन्य दलातून सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. अजित रणदिवे यांनी विद्यार्थ्यांना सैन्य दला मध्ये असणाऱ्या विविध सेवा स्पर्धा परीक्षा व नोकऱ्या या विषयी माहिती दिली.

बाजार मध्ये खाऊ गल्ली, स्टेशनरी साहित्य, भाजीपाला व फळांचे ९२ स्टॉल्स लावण्यात आले होते. मुलांना भविष्यात मार्केटिंग व्यवस्था व विपणनाचे महत्त्व दैनंदिन व्यवहार करत असताना पैशाची काळजी घेण्याचे महत्त्व समजून येण्याच्या दृष्टीने बाजार चे आयोजन करण्यात आले होते. विशेषतः खाऊ गल्लीच्या स्टॉलवर विशेष गर्दी आढळून आली. पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या आनंद बाजारचा आनंद घेतला. एक लाख रुपयांची यातून उलाढाल झाली. या कार्यक्रम ासाठी संस्थेची कार्याध्यक्ष भारत शिंदे, संचालक सावता घाडगे, यशवंत शिंदे, आनंद कुलकर्णी, दीनानाथ घाडगे, महादेव घाडगे, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सावता घाडगे यांनी व सूत्रसंचालन सतीश घाडगे यांनी केले. प्राचार्य सुहास माळी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेऊन आनंद बाजार यशस्वी केला.




# ए. जी. पाटील पॉलिटेक्निकची अंकित चव्हाण महाविद्यालयात प्रथम

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या हिवाळी २०२५ परीक्षेत ए. जी. पाटील पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. सर्व विभागातून प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील एकूण ८८४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ३९६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले तर २६७ विद्यार्थी प्रथम श्रेणीतून उत्तीर्ण झाले. कांप्यूटर इंजीनियरिंग विभागातील अंकिता चव्हाण हिने ९५.२९% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी शैक्षणिक समन्वयक. एस. एन. गवंडी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर एम. एम. कुलकर्णी, ग्रंथपाल एस. व्ही. कस्तुरे, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एन. बी. पवार, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख टी. एल. पाटील, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस. एस. लिगाडे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस. आर. बागबान, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख आर. एस. मोटगी व प्रथम वर्ष इन्चार्ज व्ही. आर. आवटे हे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री सिद्धेश्वर पाटील तसेच संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले व उपप्राचार्य एस. के. मोहिते यांनी अभिनंदन व कौतुक केले.

**विभागावर प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी याप्रमाणे : कॉम्प्युटर:** हुमाझरीन सय्यद ९१.४१% प्रथम वर्ष, समर्थ कोरे ९४.९४% द्वितीय वर्ष, अंकिता चव्हाण ९५.२९% तृतीय वर्ष.

**इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन :** संजना गरदास ८७.१८% प्रथम वर्ष, हौसाबाई जाधव ९४.५६% द्वितीय वर्ष, आर्यन गुरव ९४.१२% तृतीय वर्ष.

**सिव्हिल :** अनुष्का कोकरे ९१.४१% प्रथम वर्ष,समर्थ धुमाळे ८३.१८% द्वितीय वर्ष, कुणाल माढेकर ८५.८९% तृतीय वर्ष.

**मेकॅनिकल :** झीशान शेख ९२.४७% प्रथम वर्ष, वेदांत ताटी ८९.३३% द्वितीय वर्ष, सत्येंद्रकुमार ठाकूर ९०.८२% तृतीय वर्ष.

**इलेक्ट्रिकल :** वमन दुबे ८४% प्रथम वर्ष, श्रुती नडगिरी ९०.७१% द्वितीय वर्ष, यशराज कोरेकर ९४% तृतीय वर्ष.

# श्रीपूर कारखान्यात झाली कामगारांची मोफत कॅन्सर तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ८ जानेवारी-**

रोटरी क्लब अकलूज व कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडूरंग सहकारी साखर कारखान्याच्या संयुक्त विद्यमाने साखर कारखाना कार्यस्थळावर ऊस तोडणी महिला कामगारांची मोफत कॅन्सर तपासणी करण्यात आली. या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्घाटन पांडुरंग कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष केतन बोरावके, सचिव अजिंक्य जाधव, प्रकल्प प्रमुख संदीप लोणकर, डॉ. अभिजीत मगर, अजित वीर, मनीष गायकवाड, अभिषेक टेके, ओजस दोबाडा, गजानन जंवजाळ, यबाजी सर, पांडुरंग कारखान्याचे कृषी अधिकारी संतोष कुमठेकर, चीप अकाउंटंट रवींद्र काकडे, कृषी विकास अधिकारी सोमनाथ



भालेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे, डॉ.प्रमोद पवार, सेक्रेटरी भीमराव बाबर तसेच कॅन्सर तपासणीसाठी कराड मेडिकल कॉलेज सातारा येथील आलेले डॉ आरुषी शर्मा, डॉ नेहा पडवळ, सागर पवार डॉ. तनवी डांगे, दिशा पारगे, सुषमा शेटे, शितल पोळ, प्रिया कदम, माधुरी गायकवाड, गुंजन पाटील, आदि अधिकारी कर्मचारी उपस्थित होते या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली तोंडाचा कॅन्सर, स्तनाचा कॅन्सर तसेच गर्भाशयाच्या कॅन्सरची प्राथमिक तपासणी करण्यात आली. तपासणी बरोबरच कॅन्सरची लक्षणे, प्रतिबंधक उपाययोजना व वेळेवर निदानाचे महत्त्व याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. कारखान्याच्या सामाजिक बांधिलकीतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा लाभ कारखान्याचे कर्मचारी, ऊस तोडणी महिला कामगार यांनी घेतला. अनेक जणांनी तपासणी करून आरोग्याबाबत जागरूकता व्यक्त केली.

वेळीच तपासणी केल्यास कॅन्सरवर यशस्वी उपचार शक्य असल्याचे मत डॉक्टरांनी व्यक्त केले. अशा आरोग्यविषयक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# बार्शीतील विद्यार्थ्यांची विधानभवनाला अभ्यास भेट; लोकशाहीच्या कार्यप्रणालीचा घेतला अनुभव

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

खांडवी (ता. बार्शी) येथील यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्याच्या कायदेमंडळाचे केंद्र असलेल्या विधानभवनाला भेटस देत लोकशाहीच्या प्रत्यक्ष कार्यप्रणालीचे जवळून निरीक्षण केले अन् लोकशाहीचे धडे प्रत्यक्ष अनुभवले.

इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी या अभ्यास भेटीत सहभाग घेतला होता. विधानभवनाच्या भव्य वास्तूची माहिती देताना मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना विधानसभा आणि विधानपरिषद यामधील फरक, लोकप्रतिनिधींची निवड प्रक्रिया आणि कायदे बनवण्याची पद्धत याबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सभागृहात जाऊन आसन व्यवस्था, अध्यक्षांचे दालन आणि ऐतिहासिक गॅलरीचे दर्शन घेतले. त्यांनी विद्यार्थ्यांना 'आजचे विद्यार्थी हेच उद्याच्या भारताचे



आधारस्तंभ आहेत,' असे सांगत सामाजिक जबाबदारीची जाणीव करुन दिली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे उत्तरे दिली. मुख्याध्यापक सिद्धेश्वर शिंदे, राजेंद्र शिंदे, मांजरे सर, संतोष खोगरे, प्रमोद जाधव, राम घाडगे या शिक्षक वृंदांनी या भेटीचे नियोजन केले होते. विधानभवन भेटीसोबतच विद्यार्थ्यांनी मुंबईतील इतर ऐतिहासिक स्थळे आणि संग्रहालयांनाही भेट दिली. केवळ पुस्तकातून नागरिकशास्त्र शिकण्यापेक्षा, प्रत्यक्ष विधान भवनात जाऊन तिथे होणारे कामकाज पाहिल्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला आहे आणि लोकशाहीवरची निष्ठा अधिक दृढ झाल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. सहलीच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेचे अध्यक्ष, ग्रामस्थ आणि पालकांनी कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडली असून, एक अविस्मरणीय शैक्षणिक अनुभव त्यांच्या गाठीशी जमा झाला आहे.

# दरोडा घालणाऱ्या ८ आरोपींच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या

## ■ फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर डी.बी. पथकाची दमदार कामगिरी ■

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

अंधाराचा फायदा घेत रस्त्यावर अडवून दरोडा घालणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने मोठी कामगिरी बजावली. या कारवाईत ८ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून २ लाख रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेल्या ३ मोटारसायकली, असा ४ लाख ५५ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

फिर्यादी गजेंद्रसिंह बनुजी चावडा वय ४८, व्यवसाय नोकरी हे ६ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता मार्केट यार्ड, सोलापूर येथून मोटारसायकलवरून घरी जात असताना जुना कारंबा नाका, सोलापूर येथील गतीरोधकाजवळ बर्गमन, शाईन व युनिकॉर्न मोटारसायकलवरून आलेल्या अनोळखी ८ इसमांनी त्यांची गाडी आडवली. आरोपींनी फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून खाली पाडले व उजव्या हाताच्या मनगटाजवळ चावा घेत गाडीच्या डिक्कीतील २५ लाख रुपये रोख रक्कम व कागदपत्रे असलेली बॅग जबरदस्तीने हिसकावून पळ काढला. या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.



यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राऊत व दुय्यम पोलीस निरीक्षक तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने तात्काळ तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण, गुप्त बातमीदारांकडून मिळालेली माहिती व तपासाच्या आधारे लक्ष्मी मार्केट, सोलापूर येथून आरोपींना शिताफीने ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शाहिद अब्दुलगणी शेख (२७), सोहेल हनिफ शेख (२४), उमर फारूक जलाल शेख (२५), मजहर युन्नुस बागलकोटे (२८), समीर राजअहमद सय्यद (२६), मोईन शौकत शेख (२६), जमीर रफिक शेख (२३) व अल्लाबक्ष कादर सय्यद (२८) सर्व रा. न्यु पाच्छापेठ परिसर, सोलापूर असे आहेत. आरोपींकडून सध्या २ लाख रुपये रोख रक्कम व ०३ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून उर्वरित रक्कम व मुद्देमाल हस्तगत करण्याची कारवाई सुरू आहे. सर्व आरोपींना अटक करून ४ दिवसांची पोलीस कोठडी (रिमांड) मंजूर करण्यात आली आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त विभाग-१ प्रताप पोमण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर व त्यांच्या पथकातील अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीपणे पार पाडली.



'नटरंग'मध्ये अतुल कुळकर्णीची निवड मी केली नव्हती. माझी पहिली निवड होती आदेश बांदेकर. अजय-अतुलशी माझी पहिली ओळखही आदेशनेच करून दिली होती. झी सिनेमाचे निखिल साने यांनी अभ्यासांती अतुलचे नाव सांगितले आणि ती निवड सार्थ ठरली.
**रवी जाधव**, निर्माता


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

शुक्रवार, ९ जानेवारी २०२६




गेल्या अनेक दिवसांपासून आपण नाराज असल्याच्या चर्चा जाणीवपूर्वक पसरवल्या जात आहेत. मात्र, या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नाही. आगामी महानगरपालिका निवडणुकीत मनसेच्या जास्तीत जास्त जागा निवडून याव्यात, यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करतो आहे.
**संदीप देशपांडे**, मनसे नेता



## विचारपुष्प



पुरोगामी लोकांची ''साहेब वाक्यम्''वरील अंधश्रद्धा अनुचित आहे. पाश्चिमात्यांकडून काहीच शिकण्यासारखे नाही हा पूर्वग्रहसुद्धा अनुचित आहे. हिंदूंची वृत्ती ''बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्'' अशी आहे. प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करून, विवेकबुद्धीने हे ठरविणे की, काय स्वीकार्ह आहे आणि काय त्याज्य आहे. हे ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांना लागू आहे, मग ते विज्ञान असो, तंत्रज्ञान असो, तत्त्वज्ञान असो किंवा कला असो.

**- दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# ईडीचा छापा; ममतांनी नेले दस्तावेज, तपास यंत्रणेची उच्च न्यायालयात धाव

**• पोलिस आयुक्तांसह आल्या घटनास्थळी • प्रतीक जैन यांचा ईडीवर फाईल्स चोरल्याचा आरोप**

**कोलकाता, ८ जानेवारी**

तृणमूल काँग्रेसचे राजकीय रणनीतीकार आणि इंडियन पॉलिटिकल ॲक्शन कमिटी (आय-पीएसी) कंपनीचे प्रमुख प्रतीक जैन यांचे निवासस्थान आणि कार्यालयावर अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने गुरुवारी छापे टाकले. कारवाईची माहिती मिळताच पोलिस आयुक्तांसोबत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आधी जैन यांच्या घरी पोहोचल्या आणि त्यानंतर त्यांच्या कार्यालयात धडक दिली.

ईडीची कारवाई सुरू असताना ममता बॅनर्जी यांनी गोंधळ घालत महत्त्वाचे दस्तावेज आणि डिजिटल उपकरणे ताब्यात घेतली. यानंतर ईडीने कलकत्ता उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. यावर शुक्रवारी सुनावणी होणार आहे. दुसरीकडे जैन यांनी ईडीवर चोरीचा आरोप करीत पोलिसांत तक्रार दाखल केली.

शासकीय नोकर भरती घोटाळ्यातील मनी लॉण्ड्रिंग प्रकरणाचा तपास म्हणून ईडीने कोलकातासह देशभरात १५ ठिकाणी छापेमारी केली. ईडीचे पथक गुरुवारी सकाळी ६.३० वाजता आय-पीएसीचे सहसंस्थापक आणि संचालक प्रतीक जैन यांच्या कोलकाता येथील निवासस्थान आणि कार्यालयात पोहोचले. याची माहिती मिळताच ममता बॅनर्जी जैन यांच्या घरी पोहोचल्या आणि



जैन यांच्या घरातून फाईल आणल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी भाषण दिले

कारवाई सुरू असताना त्यांनी काही दस्तावेज ताब्यात घेतले. त्यानंतर त्या जैन यांच्या कार्यालयात आल्या आणि तिथे गोंधळ घातला. त्यांच्यासोबत आलेल्या कर्मचाऱ्यांनी दस्तावेज तसेच डिजिटल उपकरणे ताब्यात घेतली.

**कारवाईत अडथळा बेकायदेशीर**

ईडीने निवेदनात म्हटले की, आर्थिक अनियमिततेशी संबंधित एका प्रकरणात प्रतीक जैन यांच्यावर छापे टाकण्यात आले. मात्र, कारवाईत अडथळा आणून ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणाशी संबंधित पुरावे हिसकावून नेले. हा प्रकार बेकायदेशीर आहे. याप्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. यावर शुक्रवारी सुनावणी निश्चित करण्यात आली.

**ईडीविरुद्ध चोरीचा आरोप**

आय-पीएसी प्रमुख प्रतीक जैन यांच्या पत्नीने शेक्सपियर सरणी पोलिस ठाण्यात ईडीवर चोरीचा आरोप करीत तक्रार दाखल केली आहे. छापे टाकताना घरातून महत्त्वाची कागदपत्रे चोरीला गेल्याचा आरोप त्यांनी केला. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आम्हाला ईडीविरुद्ध चोरीची तक्रार मिळाली आहे आणि या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर गुन्हा दाखल केला जाईल

(वृत्तसंस्था)

> केंद्र सरकारच्या आदेशावरून निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर ईडीने कारवाई केली. पक्षाशी संबंधित सर्व महत्त्वाची माहिती मिळविण्यासाठी आमच्या रणनीतीकारांच्या कार्यालयावर छापेमारी केली. लोकशाहीला चिरडण्याचा आणि विरोधकांना संपविण्याचा हा प्रकार आहे. केंद्रीय गृहमंत्रालय आणि तपास यंत्रणा देशाप्रती आपली जबाबदारी विसरल्या आहेत.
>
> **ममता बॅनर्जी**
> मुख्यमंत्री, पश्चिम बंगाल



> छाप्याच्या ठिकाणी गोंधळ घालून दस्तावेज पळविणे असंवैधानिक आहे. ईडीने मुख्यमंत्र्यांवर कारवाई करायला हवी. ममता यांना कशाची भीती आहे? घोटाळेबाजांना संरक्षण देण्यासाठी त्यांनी हा प्रकार केला.
>
> **शुभेंदू अधिकारी**
> प. बंगालचे विरोधी पक्षनेते

**कारवाई कशासाठी?**

सरकारी नोकऱ्यांशी संबंधित घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात ईडीने सहा राज्यांमधील १५ शहरांमध्ये छापे टाकले. एका संघटित टोळीने सरकारी नोकऱ्यांचे आश्वासन देऊन लोकांना फसवले. ते बनावट नियुक्तीपत्रे द्यायचे. भारतीय रेल्वे आणि इतर ४० सरकारी विभागांमध्ये भरतीच्या नावाखाली हा घोटाळा करण्यात आल्याचे उघड झाल्याने छापे टाकण्यात आले.

# ट्रम्प भारतावर लादणार ५०० टक्के शुल्क

**रशिया, चीन आणि ब्राझीलचाही समावेश | पुढील आठवड्यात विधेयकावर मतदान**

**वॉशिंग्टन, ८ जानेवारी**

रशियाविरोधात कठोर निर्बंधाचा भाग म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत, रशिया, चीन आणि ब्राझीलवर ५०० टक्के व्यापार शुल्क लादण्याची तरतूद असलेल्या विधेयकाला बुधवारी मंजुरी दिली. पुढील आठवड्यात अमेरिकी काँग्रेसमध्ये विधेयकावर मतदान होणार आहे.

रिपब्लिकन सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी सांगितले की, ट्रम्प यांनी रशियाविरुद्ध कठोर निर्बंधांशी संबंधित एका विधेयकाला मंजुरी दिली आहे. या विधेयकात रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर, विशेषतः भारत, चीन आणि ब्राझीलवर ५०० टक्क्यापर्यंत व्यापार शुल्क लादण्याची तरतूद आहे. व्हाईट हाऊसमध्ये या विधेयकासंदर्भात ट्रम्प यांच्या अध्यक्षतेत बैठक झाली. चर्चेअंती त्यांनी विधेयक सादर करण्यास मंजुरी दिली.



हे विधेयक गेल्या अनेक महिन्यांपासून तयार केले जात होते आणि ते पुढील आठवड्यात संसदेत मतदानासाठी आणले जाईल. विधेयकाच्या बाजूने मतदान झाल्यास रशिया, चीन, भारत आणि ब्राझीलवर ५०० टक्के व्यापार शुल्क लादण्याचा मार्ग मोकळा होईल. या विधेयकाचे नाव 'सँक्शनिंग ऑफ रशिया ॲक्ट-२०२५' असे आहे.

**व्यापार करार झाल्यास विचार करणार**

ग्राहम म्हणाले, भारतासोबत अद्याप व्यापार करार झालेला नाही. त्यासाठी दोन्ही देशांतील शिष्टमंडळ वाटाघाटी करीत आहे. व्यापार करार झाल्यास नवीन शुल्क लावण्यासंदर्भात विचार केला जाईल. दुसरीकडे चीनवरील शुल्कवाढीला अटी-शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली. मात्र, ट्रम्प यांनी मंजुरी दिलेले विधेयक संसदेत मंजूर झाल्यास संबंधित देशांवर नवीन शुल्क लादले जाईल. विशेष असे की, अमेरिकेने भारातावर आधीच ५० टक्के शुल्क लादलेले आहे. (वृत्तसंस्था)

**अमेरिकेची ६६ आंतरराष्ट्रीय संस्थांपासून फारकत**

## महत्त्वाचे

### सलग घसरणीने बाजार हादरला

**मुंबई** : अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा टॅरिफ वाढविण्याची धमकी दिल्याने जगभरातील बाजार धास्तावले. याचा परिणाम गुंतवणूकदारांवर होऊन देशांतर्गत बाजारातही मंदीची त्सुनामी आली. दिवसभरात निर्देशांक आणि निफ्टीत जवळपास एक टक्क्याने घसरण झाली. दिवसअखेर निर्देशांक ७८० अंकांनी खाली येत ८४,१८१ वर बंद झाला तर, निफ्टीत २६४ अंकांची मोठी घसरण झाली. तो २५,८७७ वर स्थिरावला.

### नार्वेकरांनी धमकाविल्याबद्दल पोलीस ठाण्यात तक्रार

**मुंबई** : एका माजी खासदारांचे पोलीस संरक्षण काढून टाकण्याची धमकी देत असल्याबद्दल व्हायरल झालेल्या व्हिडीओ मुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर आता एका अपक्ष महिला उमेदवाराने दंड थोपटले आहेत. कुलाबा वार्ड क्रमांक २२६ मधून उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी मला व माझ्या पतीला नार्वेकर व त्यांच्या पीएने पैस्याचे आमिष दाखवण्याबरोबरच धमाविले होते, असा गंभीर आरोप कुलाब्यातील वार्ड क्र. २२६ मधील अपक्ष उमेदवार तेजल पवार यांनी केला आहे.याबाबत पोलिसांकडे तक्रार केली आहे. या वार्डमध्ये केवळ दोनच उमेदवार रिंगणात आहेत. तेजल पवार यांची लढत नार्वेकर यांचे बंधू व महायुतीचे उमेदवार मकरंद नार्वेकर यांच्याबरोबर लढत होत असून त्यांना शिवसेना ठाकरे गट, मनसे व काँग्रेस यांनी पाठिंबा दिला आहे. गुरुवारी त्यांनी खा. अरविंद सावंत व पती दीपक पवार यांच्यासह पत्रकार परिषद घेऊन राहुल नार्वेकर यांच्याकडून आलेल्या धमकीबाबत माहिती दिली. त्या म्हणाल्या, ३१ डिसेंबर रोजी छाननी प्रक्रियेत माझा अर्ज वैध ठरल्यानंतर भायखळा परिसरात मकरंद नार्वेकर यांच्या कार्यकर्त्यांनी माझ्या पतीला एका कारमध्ये बसवून नेले.त्याम ध्ये मकरंद नार्वेकर आणि राहुल नार्वेकर उपस्थित होते.

# पद्मभूषण डॉ. माधव गाडगीळ कालवश

## पर्यावरण क्षेत्राची मोठी हानी

**पुणे, ८ जानेवारी**

देशातील ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ, पश्चिम घाट तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष, नामवंत विचारवंत आणि निसर्गप्रेमी पद्मभूषण डॉ. माधव गाडगीळ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांनी पुण्यातील डॉ. शिरीष प्रयाग हॉस्पिटल येथे ७ जानेवारी रोजी रात्री ११ वाजता अखेरचा श्वास घेतला. डॉ. गाडगीळ यांच्या निधनाने पर्यावरण, जैवविविधता आणि परिसंस्था संवर्धनासाठी आयुष्यभर झटणारा एक प्रखर आवाज, अभ्यासू मार्गदर्शक आणि संवेदनशील शास्त्रज्ञ देशाने गमावला आहे.



डॉ. माधव गाडगीळ हे भारतातील पर्यावरणशास्त्राच्या क्षेत्रातील एक अत्यंत मान्यवर नाव होते. पश्चिम घाटातील जैवविविधता, निसर्गसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि स्थानिक समुदायांच्या सहभागावर आधारित विकासाचा त्यांनी सातत्याने आग्रह धरला. पश्चिम घाट संवर्धनासाठी स्थापन करण्यात आलेल्या गाडगीळ समितीच्या अहवालामुळे देशभरात मोठी चर्चा झाली होती.

**कार्य व योगदान**

डॉ. माधव गाडगीळ यांनी लोकसंख्या जीवशास्त्र, मानवी पर्यावरणशास्त्र, संवर्धन जीवशास्त्र तसेच नैसर्गिक संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापन या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये मूलभूत आणि दिशादर्शक संशोधन केले. त्यांच्या अभ्यासामुळे पर्यावरणीय समस्या समजून घेण्यास वैज्ञानिक अधिष्ठान मिळाले. ते भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. (वृत्तसंस्था)

**प्रमुख सन्मान व पुरस्कार**

पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले.
**• पद्मश्री पुरस्कार (१९८१) • पद्मभूषण पुरस्कार (२००६) • शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (१९८६) • टाइलर पुरस्कार (२०१५) • संयुक्त राष्ट्रांचा 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' पुरस्कार (२०२४)**

# जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी

**नवी दिल्ली, ८ जानेवारी**

भारतात एप्रिल २०२६ पासून पहिली डिजिटल जनगणना सुरू होत आहे. यामध्ये जातीची माहिती देखील गोळा केली जाईल. जवळजवळ ९० वर्षांनंतर देशातील संपूर्ण जातीबद्दलची माहीती पुन्हा एकदा उपलब्ध होणार आहे. केंद्र सरकारने जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी केली आहे.

१ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये घरांची यादी तयार केली जाईल. यामध्ये घर पक्के आहे की कच्चे, वीज, पाणी, शौचालयाची सुविधा आणि घरात राहणाऱ्यांची संख्या याची माहिती मोबाईल ॲप आणि टॅब्लेटद्वारे गोळा केली जाईल. जनगणनेचा दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये सुरू होईल. यामध्ये प्रत्येक व्यक्तीचे वय, शिक्षण, व्यवसाय, धर्म आणि जाती यांची माहीती नोंदवली जाईल.

बर्फवृष्टीच्या भागांमध्ये, जसे की जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड, घरांची माहीती २०२६ च्या सप्टेंबरमध्ये आणि वैयक्तिक माहिती १ ऑक्टोबर २०२६ पासून गोळा केली जाईल. पूर्वीच्या कागदी पद्धतीच्या ऐवजी ही जनगणना पूर्णपणे डिजिटल असल्याने माहिती त्वरित सर्व्हरवर हस्तांतरित होईल. एकाच व्यक्तीची दुसऱ्यांदा होणाऱ्या नोंद टाळता येईल आणि चुका कमी होतील. विशेष म्हणजे 'रिअल-टाइम'मध्ये माहिती लवकर उपलब्ध करून देणे शक्य होईल. (वृत्तसंस्था)

# 'त्या' १२ नगरसेवकांनी हाती घेतले कमळ

**मुंबई, दि. ८ डिसेंबर:**

महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असताना कट्टर विरोधक असलेल्या भाजपा व काँग्रेसने अंबरनाथ नगरपालिकेत एकत्र येऊन सत्ता स्थापन केल्याने एकच खळबळ उडाली होती.

त्याबाबत काँग्रेसने कारवाईचा बडगा दाखवित बडतर्फ केलेल्या आपल्या १२ नगरसेवकांना भाजपाने आपल्या पक्षात घेऊन गेम पलटवला आहे. त्यांच्या या खेळीमुळे काँग्रेसबरोबरच शिवसेना शिंदे गटालाही जबर धक्का बसला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत गुरुवारी नवी मुंबई येथे हा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम झाला. गेल्या महिन्यात झालेल्या अंबरनाथ नगरपरिषदेच्या निवडणुकीत ५८ जागा पैकी सत्तारूढ शिवसेनेचे सर्वाधिक २७ नगरसेवक निवडून आले. त्या खालोखाल भाजपचे १४, काँग्रेसचे १२, राष्ट्रवादीचे ४ आणि अपक्ष १ विजयी झाले होते. मात्र शिंदेंच्या शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजपने या ठिकाणी ऑपरेशन लोटस करीत भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादीचे आणि अपक्ष असे ३१ नगरसेवक एकत्र करुन अंबरनाथ विकास आघाडी स्थापन करीत बहुमत मिळविले. भाजपा -काँग्रेस सत्तेसाठी एकत्र आल्याचे वृत्त महाराष्ट्र नव्हे तर देशात चर्चे चा विषय बनला. टीका होऊ लागल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी आघाडी मान्य नसल्याचे जाहीर करीत त्याबाबत कारवाई करणार असल्याचे जाहीर केले.






# अपघातग्रस्तांसाठी लवकरच 'कॅशलेस' उपचार सुविधा आणणार

**• नितीन गडकरी यांची माहिती • जखमींवरील उपचारासाठी दीड लाख रुपये**

**नवी दिल्ली, ८ जानेवारी**

'कॅशलेस' उपचार योजनेचा शुभारंभ लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केला जाणार असल्याची माहिती केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी दिली.

विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील परिवहन मंत्र्यांच्या भारतमंडपममध्ये झालेल्या वार्षिक बैठकीनंतर आयोजित पत्रपरिषदेत गडकरी बोलत होते. यावेळी मंत्रालयाचे राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा आणि अजय टम्टा तसेच सचिव उमाशंकर उपस्थित होते. या योजनेत राष्ट्रीय महामार्गासह देशातील कोणत्याही रस्त्यावर झालेल्या अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीचा कमाल सात दिवसांचा दीड लाख रुपयांपर्यंतच्या उपचाराचा खर्च सरकार करणार आहे. पोलिस तसेच अन्य कारणामुळे आधी अपघातात जखमी झालेल्यांना रुग्णालयात न्यायला लोक तयार होत नव्हते, यामुळे वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे अनेक जखमींचा मृत्यू व्हायचा. याला आळा घालण्यासाठी अपघातातील जखमींना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी भरती करणाऱ्याला २५ हजार रुपयांचा 'राहवीर' पुरस्कार दिला जाणार आहे, असे गडकरी यांनी सांगितले.

आसाम, पंजाब, हरयाणा, चंदीगड, उत्तराखंड आणि उत्तरप्रदेशमध्ये १५ जानेवारी २०२५ रोजी प्रायोगिक तत्त्वावर ही योजना राबवण्यात आली होती. मिळालेल्या प्रतिसादामुळे ही योजना आता देशभर लागू केली जाईल. योजनेचे नाव अद्याप ठरले नसले तरी, नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या योजनेचे उदघाटन केले जाईल. 'हिट ॲण्ड रन'च्या देशभरात १ लाख ८५ हजार घटना घडल्या, यात नुकसानभरपाई मागण्याची १८,६४२ प्रकरणे आली, त्यातील १२,२७३ प्रकरणातच नुकसान भरपाई देण्यात आली. नुकसानभरपाई देण्याचे प्रमाण वाढवण्याच्या सूचना राज्यांना दिल्याचे गडकरींनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

> **हिट ॲण्ड रन'च्या घटनेत जखमी झालेल्यांना आधी १२,५०० रुपये नुकसानभरपाई दिली जात होती. आम्ही ती वाढवून ५० हजार रुपये केली. गंभीर जखमींना आधी २५ हजार रुपये नुकसान भरपाई मिळत होती, ती वाढवून आम्ही दोन लाख रुपये केली**
>
> **नितीन गडकरी**, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री



**१०२१ चालक प्रशिक्षण केंद्र सुरू करणार**

रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी चालकांना प्रशिक्षण देण्याची (ड्रायव्हर ट्रेनिंग सेंटर) योजना सरकारने आखली होती. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात मागील एक वर्षात ४४ नवीन चालक प्रशिक्षण केंद्र सुरू केले. आणखी ८७ केंद्रांसाठी प्रक्रिया सुरू आहे. देशात १०२१ चालक प्रशिक्षण केंद्र सुरू केली जाणार आहेत. ९८ प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येतील. याशिवाय पाच इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग ॲण्ड रीसर्च सुरू करण्याचीही सरकारची योजना आहे, असे गडकरी म्हणाले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# 'लेन'च्या बेशिस्तीचा बीमोड

शिस्त, संयम आणि एक निश्चित ध्येय हे कोणत्याही वाटचालीचे वैशिष्ट्य असावे लागते. शिस्त बिघडली की अपघाताची शक्यता अधिक, संयम संपला की ध्येयाविषयीचा संभ्रम वाढण्याची शक्यता अधिक आणि ध्येयाचा विसर पडला की भरकटण्याची शक्यता अधिक असते. म्हणूनच काही साध्या सूचनांही कधी कधी सुविचाराएवढ्या उपयुक्त आणि महान ठरतात. महामार्गांवर किंवा लहान-मोठ्या मार्गांवर अलिकडे एक सूचना हमखास पाहावयास मिळते. 'लेनची शिस्त पाळा' हे त्या सूचनेचे शब्द वाटचालीच्या पुढच्या प्रत्येक टप्प्यावरील धोक्याची जाणीव करून देतात आणि सावधगिरीही शिकवतात. अशा साध्या सूचनांमधील श्रेष्ठ सुविचार समजून घेण्याची क्षमता समाजामध्ये आली की, शिस्त बिघडण्यामुळे होणाऱ्या अपघातांचे आणि त्यामुळे होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या हानीचे प्रमाण कमी होऊ शकते. साहित्य असो, कला असो, क्रीडा किंवा सामाजिक काम, राजकारण किंवा अर्थकारण या प्रत्येक क्षेत्राच्या वाटचालीत काही शिस्तबद्धपणा असणे गरजेचे असते. त्या त्या क्षेत्रामध्ये निर्धारित करून दिलेल्या मार्गिकेवरून चालत राहिल्यास त्या क्षेत्रातील वाटचालीचे ध्येय गाठणे सोपे होत असते. यालाच त्या क्षेत्रातील 'लेनची शिस्त पाळणे' असे म्हणता येईल. रस्त्यावरील साध्या सूचनेतून सूचित केल्या जाणाऱ्या या सुविचाराची जेव्हा कोणत्याही क्षेत्रातील वाटचालीदरम्यान पायमल्ली होते, तेव्हा त्याची दिशा भरकटते. ध्येय साध्य करणे तर दूरच; भलत्याच परिणामांना सामोरे जाण्याची शक्यता बळावत असते. म्हणूनच कोणताही विचार सामान्य नसतो. केवळ थोरामोठ्यांनी मांडलेल्या सामान्य विचारासच सुविचार समजण्याऐवजी, सामान्य विचारातील श्रेष्ठ सुविचार समजून घेऊन त्याचे पालन केले, तर अविचारामुळे निर्माण होणाऱ्या समस्या टाळता येतात. कदाचित अविचारामुळे लेनची शिस्त सोडून एखादा 'शॉर्टकट' म्हणजे सोपा मार्ग शोधावयास गेले, तर एखादे वळण वाचविता येणे शक्य होतही असेल, पण असे शॉर्टकट पुढे काही समस्यादेखील निर्माण करू शकतात. विशेषतः प्रसिद्धी मिळविण्यासाठी किंवा एखाद्या क्षेत्रातील आपल्या श्रेष्ठत्वाची जाणीव जगाला करून देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या शॉर्टकटमधून समस्या कशा निर्माण होतात आणि त्या प्रतिमानिर्मितीऐवजी प्रतिमाभंजनाच्या अवस्थेस कशा कारणीभूत होतात, याचे सुरस उदाहरण जेम्स लेन नावाच्या स्वतःस इतिहास संशोधक म्हणविणाऱ्या लेखकाच्या पुस्तकामुळे सिद्ध झाले आहे. या पुस्तकाने तब्बल दोन दशकांहून अधिक काळ भारतात अक्षरशः वैचारिक अराजक माजविले, अनेक वाद निर्माण केले आणि त्यातून सामाजिक सौहार्दाच्या समस्याही निर्माण झाल्या. 'लेन' नावाच्या व्यक्तीने 'लेनची शिस्त' पाळण्याच्या सामान्य सूचनेकडे दुर्लक्ष करून इतिहासाच्या क्षेत्रात केलेल्या या शॉर्टकट वाटचालीमुळे हा सामान्य विचार आता साहित्य आणि इतिहास संशोधनाच्या क्षेत्रातही सुविचाराएवढाच महत्त्वाचा ठरला आहे.

गेल्या शतकातील अखेरच्या दशकाच्या, म्हणजे १९९० च्या दशकात भारतात आलेल्या या लेखकाच्या पुस्तकामुळे माजलेल्या एका वादाचे गेल्या दोन दशकांमधून घोंघावणारे वादळ आणि त्या वादळाचे देशात धुमसत राहिलेले पडसाद हे सारे जाणून घेण्याआधी, ज्याच्यामुळे हे वादळ घोंघावत राहिले त्या जेम्स लेन नावाच्या अमेरिकन लेखकाविषयी जाणून घ्यायला हवे. ९० च्या दशकात भारतात आलेल्या या लेखकाची इतिहास संशोधक अशी ओळख होती. महाभारत या महाकाव्याचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर अधिक संशोधन करण्यासाठी हे लेखकराव भारतात दाखल झाले. त्यासाठी पुणे येथील संदर्भांनी समृद्ध असलेल्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत तळ ठोकला. पुणे आणि महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांविषयी असलेली भावना, संवेदनशीलता आणि आदरभाव पाहून लेन महाशयांना छत्रपतींच्या चरित्राचा अभ्यास करण्याच्या जाणिवांनी पछाडले व त्यांनी शिवचरित्राचा अभ्यास सुरू केला. येथपर्यंत सारे काही ठीकच होते. छत्रपती शिवरायांचे जीवन हा जागतिक स्तरावर जिज्ञासूंच्या अभ्यासाचा विषय आहे. त्यांच्या चरित्र व कर्तृत्वाच्या इतिहासाने जगातील अनेक नेतेही प्रभावित झालेले आहेत. त्यामुळे लेन नावाच्या या लेखकाने शिवछत्रपतींच्या इतिहासाचा अभ्यास सुरू केला. झालेल्या आकलनानुसार त्याने एक पुस्तक लिहून काढले. पण पुस्तके लिहिणे आणि इतिहासाचे संशोधन करून त्यातील समृद्धीची स्थळे शोधणे यात फरक असतो. लेनने लिहिलेल्या पुस्तकात इतिहास कमी होताच, पण त्याच्या हेतुविषयीच शंका यावी असा मजकूरच अधिक असल्याचा आक्षेप होता. मुळात पुस्तके लिहिणे, साहित्यनिर्मिती करणे आणि संशोधनातून सिद्ध होणाऱ्या इतिहासाचा भाष्य करणे या भिन्न बाबी आहेत; त्या या वाटेवरून चालणाऱ्यांकरिता एक निश्चित मार्गिका आखून दिली गेलेली आहे. लेन महाशयांना बहुधा त्याचा विसर पडला. त्यांनी लेनवरून चालणाऱ्या शिस्तीला छेद देऊन आपला मार्ग निवडला. 'शिवाजी द हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' नावाने त्याने लिहिलेले पुस्तक ऑक्सफर्ड इंडिया प्रेसने प्रकाशित केले आणि लेनची शिस्त बिघडल्याच्या जाणिवेने शिवभक्त महाराष्ट्रात वादळ उठले. सोयीस्कर मोडतोड करून इतिहासाचे विकृतीकरण करणारे हे पुस्तक मागे घ्यावे व या पुस्तकावर बंदी घालावी, अशी मागणी वाढू लागली आणि महाराष्ट्र उसळून उठला. जेम्सच्या पुस्तकातील तथाकथित ऐतिहासिक आधारावर प्रश्नचिन्हे उमटून पुण्यातील भांडारकर संशोधन संस्थेची मोडतोड झाली. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना काळे फासले गेले. राज्यात सामाजिक तेढ पसरली आणि अनेक ठिकाणी तर कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न उभे राहिले. त्यातच या वादात राजकारणाने उडी घेतली आणि काही राजकीय पक्षांनी या वादाचे भांडवल करून थेट निवडणुकांच्या रिंगणात तो वाद उभा केला. तेव्हापासून लेनचे वादग्रस्त पुस्तक आणि त्यातून उमटलेल्या वादाचे पडसाद आजपर्यंत महाराष्ट्रात धुमसत राहिले आहेत. या वादातून राजकारण तापले असले, तरी समाजकारण मात्र नाहक दूषित झाल्याचे पाहावयास मिळत होते. त्यामुळे या वादाचे निराकरण व्हावे आणि जेम्स लेन याच्या पुस्तकातील वादग्रस्ततेमुळे महाराष्ट्रात निर्माण झालेली अस्वस्थता संपुष्टात यावी यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांस अखेर आता यश आले आहे. राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून असे वाद शमले तर सामाजिक सौहार्द टिकून राहते. याच काळात पुढे जवळपास २० वर्षे जेम्स लेन हा लेखक मात्र मूग गिळून गप्प राहिला होता. २० वर्षांनंतर २०२२ मध्ये लेन याने देशातील एका नियतकालिकास मुलाखत देऊन, या पुस्तकात आपण ऐतिहासिक तथ्ये मांडलेली नाहीत, असा खुलासा केला. आता या पुस्तकाच्या प्रकाशक असलेल्या ऑक्सफर्ड इंडिया प्रेसने या पुस्तकातील वादग्रस्त मजकुराविषयी जाहीर माफी मागितली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि माता जिजाऊ यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर छापल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणारे पत्र या प्रकाशन संस्थेने शिवाजी महाराजांचे वंशज खासदार उदयनराजे भोसले यांना पाठविले असून माफी मागितली आहे. या प्रकाशन संस्थेने १३ फेब्रुवारी २००३ या दिवशी हे पुस्तक प्रकाशित करून प्रसिद्ध केल्यापासून महाराष्ट्रात घोंघावणाऱ्या एका अस्वस्थ वादळाची अखेर झाली असून इतिहासाची मोडतोड करणाऱ्या विकृतीपासून महाराष्ट्राची मुक्तता झाली आहे. लेनच्या त्या वादग्रस्त पुस्तकाचे परिणाम तब्बल दोन दशकांहून अधिक काळापासून शिवभक्त महाराष्ट्राला भोगावे लागले आहे. या विकृत लेखनामुळे राज्यात सामाजिक तेढ पसरली, विद्वेषाचे वारे वाहू लागले, राजकारणाचे रण तापले आणि या सगळ्यास कारणीभूत असलेला तो जेम्स व त्याच्या पुस्तकाचा प्रकाशक संस्थेत मात्र शांततच होते. या आक्षेपार्ह मजकुरामुळे महाराष्ट्राच्या संवेदनांना धक्का पोहोचला असून शिवभक्तांच्या भावना दुखावल्या, याची कबुली प्रकाशन संस्थेने दिली आहे. शिवाजी महाराजांविषयी केलेली विधाने कोणत्याही योग्य पडताळणीशिवाय प्रकाशित केल्याची चूकही या प्रकाशकाने मान्य केली आहे. २२ वर्षांनंतर अखेर विकृतीचा बीमोड झाला आहे आणि वाटचाल भरकटण्यानंतर होणाऱ्या हानीची जाणीव संबंधितांस झाली आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांचे चरित्र आता निर्विवादपणे अधिक उजळले आहे.

## प्रासंगिक

# निवडणूक, नेता, नैतिकता, निराशा, उपाय

डॉ. विलास देशपांडे

निवडणूक म्हटली की मग ती लोकसभेची असो, विधानसभेची असो, महानगरपालिकेची असो, जिल्हा परिषदेची असो वा ग्रामपंचायतीची असो, आपल्या देशात एक उत्सवच असतो. सर्व राजकीय पक्ष आपापल्या क्षमतेनुसार निवडणुकीत भाग घेतात. सत्तेतून समाज परिवर्तन घडविता येते असे मानतात. सत्तेतून देशात विविध विकास प्रकल्प राबविले जातात. जनसामान्यांकरिता जीवन सुखकर होईल अशी अनेक कामे केली जाऊ शकतात. सत्ता आपल्या हातात असली, म्हणजे कुठल्या कामांना प्राधान्य द्यावयाचे व तेथे निधी कसा उपलब्ध करून द्यायचा हे ठरविता येते. म्हणूनच दिल्लीपासून गल्लीपर्यंतच्या सर्व निवडणुका महत्त्वाच्या असतात. आणि म्हणून त्यात साम-दाम-दंड-भेद वापरून आपण किंवा आपला पक्ष कसे विजयी होऊ याकरिता सर्व जण प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतात. निवडणूक जाहीर झाल्यापासून तर त्याचा निकाल लागेपर्यंत सर्व संबंधित यंत्रणा (निवडणूक आयोग, सरकारी अधिकारी आणि सरकारी कर्मचारी) फार तणावाखाली असतात. सरकारी यंत्रणांनी कितीही पारदर्शकपणे कामे केली, तरीही सत्ता पक्षाला अनुकूल निर्णय तसेच त्यांच्या सोयीसाठी योजना आखल्याचा आरोप कायम होत असतो तर विरोधी पक्षांची मुस्कटदाबी किंवा गैरसोय मुद्दामून केल्याचे आरोपसुद्धा होत असतात. एस. आय. आर. म्हणजे 'मतदार याद्या सुधार प्रकल्प' सरकार करीत आहे. त्याला सहकार्य करणे तर दूरच पण विरोधी पक्ष त्याच्याही विरुद्ध देशभर आंदोलन करीत आहे.

**नेता** : निवडणूक म्हणजे नेत्यांकरिता सणच असतो. त्यांच्या डोक्यात २४ तास राजकारण (अपवादाने समाजकारण) चालू असते. अधूनमधून त्यांना शक्तिप्रदर्शन पण करावे लागते. कसेही करून आपण सत्तेत राहिले पाहिजे ही गोष्ट नेत्यांना फार छान जमते. जास्तीत जास्त संस्थांमध्ये आपण स्वतः किंवा आपल्या परिवारातील अन्य सदस्य प्रमुख पदांवर ठेवण्याचा बहुतांश नेत्यांचा आग्रह असतो. नेत्यांना कायम आपल्या कार्यकर्त्यांच्या घोळक्यात राहणे प्रचंड आवडते. पहिली निवडणूक लढण्यापूर्वीची त्यांची आर्थिक स्थिती व तदनंतर दरवर्षी प्रचंड वेगाने सुधारणारी आर्थिक स्थिती अनाकलनीय आहे.

**नैतिकता** : सध्याची राजकीय परिस्थिती, निवडणुकांमध्ये होणाऱ्या भाषणांचा खालावलेला स्तर, एकमेकांवर केले जाणारे गलिच्छ आरोप-प्रत्यारोप, पैसा व सत्तेचा गैरवापर या सगळ्याचे कारण म्हणजे नैतिकतेचा अभाव. सर्वत्र बोकाळलेला भ्रष्टाचार, नेत्यांनी वाम मार्गाने मिळविलेला पैसा, अमाप संपत्ती हे सामान्य माणसाला चकित करणारे आहे. सध्या वैयक्तिक, पक्षीय, राजकीय स्वार्थालाच अधिक महत्त्व दिले जाते. देशहिताला क्वचितच प्राधान्य दिले जाते. नेत्यांच्या घरातील दोन-तीन लोकांना तिकीट देताना सामान्य कार्यकर्ते जे अनेक वर्षे आपले काम करतात त्यांना डावलले जाते. गुन्हेगारांना निवडणुकीत तिकीट देऊ नये असे सर्वच पक्ष सांगतात पण प्रत्यक्षात मात्र त्यांना तिकीट देतात व त्यांच्यामार्फत आपल्या पक्षाचा व आपला प्रचार करतात. नंतर तेच गुन्हेगार अथवा गुंड प्रवृत्तीचे लोक निवडून येतात व आपली आधीची कामे चालू ठेवतात. त्यांना राजकीय संरक्षण देणारी मंडळी तयार असतातच.

**निराशा** : आज आपण ज्याला मतदान केले ती व्यक्ती उद्या निवडून आल्यानंतर आपली निष्ठा बदलते व सत्ता पक्षात सामील होते म्हणूनच मतदानाचा टक्का ६० च्या वर सहसा जात नाही. एखाद्या घराण्यात जन्म घेतल्याने सर्व राजकीय पदे त्यालाच मिळाली पाहिजेत असा गैरसमज सध्या सर्व राजकारण्यांचा आहे. आपल्या मुलाच्या जन्माच्या आधीपासून निष्ठेने काम करणाऱ्या, योग्य अशा अनेक कार्यकर्त्यांना डावलून त्यांच्यापेक्षा वयाने अतिशय लहान, आपल्या मुलाला, खासदारकी किंवा आमदारकी देताना, नेत्यांना काहीही अनैतिक वाटत नाही. प्रत्येक पक्षात अनेक सामान्य कार्यकर्ते निष्ठेने पक्षाची कामे ३०-४० वर्षे करत असतात. असे कार्यकर्ते कितीही योग्य असले तरी, त्यांचे क्वचितच मोल ठेवले जाते. नेत्यांच्या बायका, मुले, मुली, सुना, जावई व दुसऱ्या पक्षातून आपल्याकडे निवडणुकीपूर्वी आलेल्या कार्यकर्त्यांना तिकीट वाटपात प्राधान्य दिले जाते. निवडून आल्यानंतर तो पैसा कसा जमवायचा याचाच सर्व प्रकारे प्रयत्न केला जातो म्हणून सामान्य नागरिक निराश झालेला दिसतो. ही परिस्थिती कधीच सुधारणार नाही असे सर्वांना वाटते.

**उपाय** : अलिकडच्या काळात आपण बघतो की देशहिताला जास्त प्राधान्य दिले जात आहे. 'आत्मनिर्भर भारत', 'स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन' तसेच 'नवीन तंत्रज्ञान विकसित करणे' या योजनांमुळे देशाचा सर्वच क्षेत्रांत सर्वांत जास्त विकास झाला आहे.

खालील उपायांवर काम केल्यास, सर्व परिस्थितीत आमूलाग्र बदल लवकरच आपल्याला दिसेल -

१. आपल्या देशातील सर्वोच्च नेता जेव्हा म्हणतो ''ना मैं खाऊंगा ना किसी को खाने दूंगा'', तर त्याचे अनुकरण सर्व राजकीय नेते मंडळींनी करावयास हवे. २. राजकारणात टीका करताना सर्वांनी मर्यादा पाळावयास हव्यात, तसेच आपल्या भाषेचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न करावा. ३. प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या पक्षातील प्रामाणिक कार्यकर्त्यांनाच निवडणुकीत तिकीट द्यावे. ४. एका घरात एकाच व्यक्तीला तिकीट द्यावे. ५. पक्षनिष्ठा, तत्त्वनिष्ठा, प्रामाणिकपणा व सेवाभाव असलेल्या कार्यकर्त्याला प्राधान्य देऊन सर्वांनी निवडून आणावे. ६. निवडून आल्यानंतर, पक्ष बदल केल्यास त्या उमेदवाराची निवड रद्द करून पुढील पाच वर्षांकरिता त्याला निवडणूक प्रक्रियेतून बाद करण्यात यावे. ७. प्रत्येक पक्षाला आपापला पक्ष वाढविण्याचा अधिकार आहे म्हणून स्थानिक पातळीवरच्या निवडणुका जसे ग्रामपंचायत, जिल्हा परिषद या निवडणुकांमध्ये आपल्या जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना भाग घेता यावा म्हणून त्यांनी स्वबळावर या निवडणुका लढवाव्यात. ८. राज्य व देश पातळीवर दुसऱ्या पक्षांशी निवडणूकपूर्व युती करावी. ही युती देशहिताला प्राधान्य देणारी असावी. ९. कुठल्याही पक्षाने गुन्हेगार अथवा भ्रष्टाचारी व्यक्तीला निवडणुकीत तिकीट देऊ नये. १०. निवडणुकीपूर्वी कुठल्याही पक्षाने अशा घोषणा करू नयेत ज्यामुळे राज्याच्या व देशाच्या आर्थिक तिजोरीवर भार पडेल. ११. 'एक देश एक निवडणूक' योजना ताबडतोब अंमलात आणावी. त्यामुळे वेळ, पैसा व ऊर्जा या सर्वांची बचत होऊन ते दुसऱ्या चांगल्या विधायक कामांवर खर्च करता येतील. १२. सर्व निवडून आलेल्या नेते मंडळींनी आपली स्थावर व जंगम मालमत्ता दरवर्षी जाहीर करावी. केंद्रीय कर्मचाऱ्यांना हे दरवर्षी जाहीर करावे लागते व ही माहिती त्यांच्या संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते. १३. कुठल्याही आमदार, खासदारांना निवृत्ती वेतन देऊ नये. १४. बहुतांश आमदार, खासदारांची आर्थिक स्थिती बघता त्यांना देण्यात येणाऱ्या मोफतच्या सवलती सरकारने ताबडतोब बंद कराव्या.

९८२२२४०६०५

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# इथे ओशाळला मृत्यू

चंद्रपूर जिल्ह्यात किडनी विक्री प्रकरण ताजेच आहे. खाजगी रुग्णालयात रुग्ण भरती करण्यापूर्वीच ॲडव्हॉन्स पैसे घेणे किंवा रुग्ण दगावल्यानंतर पैसे मिळाल्याशिवाय नातेवाईकांना शव न देणे ही सर्व उदाहरणं वानगीदाखल आहेत. समाजात क्रौर्याची सीमारेषा राहिलेली नाही. पैसा-संपत्तीसाठी नाती तुडवली जातात. आई-वडिलांना घराबाहेर काढणारी बेशरम पिढी आम्हीच डोळ्याने बघतो आहे. एकंदरीत समाज व्यवस्था दिशाहीन झाली आहे. अशा नात्यागोत्याच्या कडक उन्हात जातपात, समाजाची चौकट तोडून थंड हवेची एक झुळूक वर्धेत आली. कदाचित ही समाज व्यवस्था पुन्हा सुदृढ होण्याची नांदीच म्हणावी लागेल. त्यासाठी एकाला प्राणाची बाजी लावावी लागली. एका घटनेने समाज एकसंध होऊन त्याला पाझर फुटणार असेल तर प्राणाची बाजी लावणारा पहिला जिगरबाज ठरेल तो वर्धेतील अनिल दाऊतखानी! त्याच्या एकाच्या जाण्याने अख्खा समाज हळहळला, नव्हे अनेकांचे डोळे डबडबले. कोण असेल बरं हा अनिल दाऊतखानी? मोठा समाजसेवक, दाता, मार्गदर्शक वगैरे... यातील काही नाही. तो फक्त 'तबला' बोलका करणारा होता. जुजबी कमाईतून तो आपला संस्कार अगदी आनंदात सांभाळत होता. हृदयविकाराच्या झटक्याचे निमित्त करून देव त्याला देवाघरी घेऊन गेला. वर्धेतील अनिल दाऊतखानी यांचा मृत्यू म्हणजे केवळ एका व्यक्तीचे जाणे नव्हे, तर अख्ख्या वर्धेच्या मनावर उमटलेला खोल घाव आहे. अनिल गेला? असा प्रश्न समाजमाध्यमांवर विचारला जात आहे. सत्य स्वीकारायला आजही वर्धेचं मन तयार नाही. वर्धेच्या गल्लीबोळांत, कार्यक्रमांच्या पायऱ्यांवर, देवळांच्या प्रांगणात आणि घराघरांत त्यांच्या तबल्याच्या ठेक्यांसोबत जे हास्य गुंजायचं ते अचानक थांबलं आणि त्या शांततेनं शहरातील अनेकांना चटका लावून गेला.



त्याला घेऊन जाणारा यमराज आपले कर्तव्य पार पाडून गेला असेल. नियतीच्या वहीत लिहिलेलं पान त्यानं उलटवलं असेल. पण, वर्धेकरांचे अनिलवर असलेलं प्रेम पाहून मृत्यूही ओशाळला असेल! त्याचा प्राण निघाला आणि पुढे काय असा प्रश्न निर्माण आला. परिचितांनी व्हॉट्सॲपवर फक्त एक पोस्ट टाकली आणि ५०० ते ५००० हजार असे मदत करणारे हात पुढे आले. एवढेच नव्हे, तर एका नगरसेवकाने त्या परिवाराला आयुष्यभर अर्धा लिटर दूध देण्याचे सांगितले. गहू, तांदूळ आणि डाळही पोहोचविली. क्रिया कर्म करण्यासाठी पुरोहितांनी एकही रुपयाही न घेण्याचा निर्णय घेतला. इतकं प्रेम, इतकी आपुलकी, इतकी हळवी आठवण क्वचितच कोणाच्या वाट्याला येते. माणूस जातो तेव्हा त्याच्यासोबत आठवणी उरतात. पण, अनिल गेला तेव्हा आठवणींसोबत हळहळ राहिली. घरची परिस्थिती मोजकीच नव्हे तर तोलाची होती. रोजचा दिवस म्हणजे संघर्ष. पण तो संघर्ष त्याने कधी कोणाला जाणवू दिला नाही. अशा परिस्थितीत अनेक जण तुटून जातात. पण, अनिल तसा नव्हता. त्यांच्या चेहऱ्यावर कायम शांत हास्य असायचं, डोळ्यांत समाधान आणि मनात आपली कला जपण्याचा अभिमान. तबला त्याचा छंद नव्हता; तोच त्यांचा श्वास होता! तबल्याच्या ठेक्यात त्याची मेहनत होती, घरची जबाबदारी होती, मुलांच्या भविष्याची चिंता होती. वर्धेतील कितीतरी धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम त्यांच्या तबल्याशिवाय अपुरे वाटायचे. मी कलाकार असा आव आणला नाही.

असलेल्या परिस्थितीत कुटुंब कसं सांभाळायचं याचा परिपाठ त्याने घालून दिला. दहावीतील मुलगी आणि त्यापेक्षा छोटा मुलगा येत्या आठवड्यात परिसरातील कार्यक्रमाच्या निमित्ताने हॉटेलमध्ये जेवायला जाणार होते. मुलं पहिल्यांदा हॉटेलमध्ये जेवायला जाणार असल्याचा आनंद बापाला झाला होता. त्याच्या कुटुंबासाठी हा आघात असह्य आहे. आधाराचा खांदा अचानक निखळावा, अशी ही वेळ. पण, अनिलने आयुष्यभर कमावलेली माणसांची साथ, प्रेम आणि आदर हेच त्याच्या कुटुंबासाठी खरी संपत्ती ठरली. हे तो गेल्यानंतर उघड झाले. त्याच्यावर अन्त्यसंस्कार कसे होतील असा प्रश्न असताना वर्धेकरांनी सढळ हातांनी निःस्वार्थपणे मदत केली आणि मदतीचा ओघ सुरू आहे. जो त्या वेटाळात राहतो त्या भागातील रहिवासांनी मुलांच्या भविष्याची तरतूद करण्याची तयारी सुरू केली. आर्ट ऑफ लिव्हिंगचा तो सदस्य असल्याने या परिवाराने लाखोंत मदत करण्याचा निर्णय घेतला. संस्कार भारतीसह विविध सामाजिक संघटनांशिवाय व्यक्तिगतही मदत करणारे हात पुढे आले. माणूस किती कमावतो यापेक्षा तो किती माणसं जोडतो हे महत्त्वाचं असतं; तो या परीक्षेत उत्तीर्ण झाला. त्याने गरिबीचा कधी बाऊ केला नाही. गावातील राजकारणी किंवा मानवाईक गेल्यावर जशी श्रद्धांजली सभा घेतली जाते तशी श्रद्धांजली सभा झाली. हा सारा गोतावळा आणि माणुसकीचे जिवंत उदाहरण पाहून मृत्यूही ओशाळाला नसेल तर नवलच!


९८८१९०३७६५

## दखल

# 'ठाकरे ब्रॅण्ड'चा बँड वाजणार!

मोरेश्वर बडगे

राज्यातल्या २९ महापालिकांच्या निवडणुकीला आता अवघे सहा दिवस उरले आहेत. १५ जानेवारीला मतदान होईल. १६ जानेवारीला मतमोजणी होऊन दुपारपर्यंत निकाल हाती येतील. प्रचाराला राजकीय पक्षांकडे आता मोजके चार दिवस उरले आहेत. पण अजून निवडणूक ज्वर म्हणावा तसा तापलाच नाही. कसा तापणार? प्रबळ विरोधी पक्षच आखाड्यात दिसत नाही. कसा दिसणार? विरोधी पक्षांची लढायची इच्छाशक्तीच संपली आहे. निवडणुका लढायच्या म्हणून लढायच्या आणि हरायचे, असा मामला आहे. महिन्यापूर्वी झालेल्या नगर परिषदांच्या निवडणुका महायुतीने जिंकल्या. विरोधकांचा सुपडासाफ झाला. तसलेच वातावरण पुन्हा पाहायला मिळत आहे. ही तसलीच निवडणूक आहे. 'युद्ध' पुन्हा खेळले जात आहे. तुम्ही पहा. सगळ्या जागी भाजपा आणि त्यांची महायुती मजबुतीने उभी दिसत आहे. निवडणुकीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छाप आहे. देवाभाऊंचा चेहरा पुढे करून भाजपा लढते आहे. जोडीला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा 'बोनस' आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड येथे थोडीफार चुरस दिसते. तेथे महायुतीतील मित्रपक्ष अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाशी लढतो आहे. कुठूनही निवडून या, निकालानंतर महायुतीतच यायचे असल्याने टेन्शन नाही. कोकणातल्या कणकवली नगर परिषद निवडणुकीत नितेश आणि नीलेश या दोन राणे बंधूंमध्ये तुंबळ युद्ध झाले. मात्र, निकालानंतर दोन्ही भाऊ एकत्र आल्याचे उदाहरण ताजे आहे. मुंबईत काट्याची टक्कर आहे. गेली ३० वर्षे मुंबई महापालिका ठाकरे कुटुंबाच्या हातात राहिली. यंदा त्यांना प्रथमच भाजपाचे कडवे आव्हान आहे. उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही राजकीय अस्तित्वाची लढाई आहे. त्यासाठी त्यांनी आपल्या चुलत भावाला म्हणजे राज ठाकरेंना सोबत घेतले आहे. भाजपा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी तर ही प्रतिष्ठेची लढाई आहे. काय होणार यापेक्षा सध्या काय सुरू आहे? १६ तारखेचा निकाल कसा असेल? याचे ट्रेलर आताच पाहायला मिळाले. राज्यात महायुतीचे ६८ नगरसेवक महापालिकेवर बिनविरोध निवडून आले आहेत. प्रतिस्पर्धी उमेदवारांनी माघार घेतल्याने हा चमत्कार घडला. मुंबईत एकूण २२७ जागा आहेत. त्यातल्या किमान १५० जागा जिंकून महायुती धमाल करणार आहे. उमेदवार कोण? हा मुद्दा गौण आहे. लोकसभेत 'मोदी' उमदेवार होते. इथे सगळ्या जागी 'देवाभाऊ' उभे आहेत. इथे पक्षांमध्ये फाईट नाही. सामान्य मतदार 'देवाभाऊ'साठी मतदान केंद्रांवर रांगा लावणार आहेत. तुम्ही लिहून ठेवा. गाजावाजा झालेल्या 'ठाकरे ब्रँड'चा बँड वाजणार आहे.



ठाकरे बंधूंनी काढलेला 'सत्याचा मोर्चा' तुम्हाला आठवत असेल. मतदार याद्यांमध्ये घोळ आहे. दुबार मतदार आहेत, आधी याद्या शुद्ध करा आणि नंतर निवडणुका घ्या, अशी मागणी करत ठाकरे बंधूंनी हा मोर्चा काढला होता. मतदार याद्या दुरुस्त झाल्याशिवाय निवडणुका होऊ देणार नाही, अशी धमकी राज ठाकरे यांनी दिली होती. उद्धव ठाकरे यांनी तर कोर्टात जाण्याची भाषा केली होती. मात्र प्रत्यक्षात काय झाले? महापालिका निवडणुका जाहीर होताच सारे गुपचूप कामाला लागले. याचा अर्थ त्यांच्या आरोपांमध्ये दम नव्हता. प्रत्येक निवडणुकीत अशाच याद्या तयार होत आल्या. आताही तशाच झाल्या. मात्र कसेही करून आपल्या संभाव्य पराभवाची कारणं तयार ठेवायची ही विरोधकांची जुनी खोड आहे. विरोधकांकडे आहे काय? 'ठाकरे ब्रँड' नावाने त्यांनी फुगवलेला पत्त्यांचा बंगला कोसळतो आहे. बाळासाहेब ठाकरे जिवंत होते तोपर्यंत ठाकरे हा मुंबईत ब्रँड होता. भाजपाला हरवायला निघाले आहेत हे. पण तयारी काय? ठाकरे बंधूंची कुठलीही तयारी नाही. फक्त तोंडाच्या वाफा दवडणे सुरू आहे. आता महायुतीचे ६८ उमेदवार अविरोध निवडून आले. कारण त्यांच्याविरोधात उभ्या उमेदवारांनी आपापले अर्ज मागे घेतले. निवडणूक म्हटले की सगळ्या गोष्टींची तयारी करावी लागते. आपली माणसं माघार घेणार नाहीत याची काळजी कोणी घ्यायची असते? नेते झोपून राहिले आणि आता ओरडा करत आहेत. 'लोकशाहीची हत्या झाली, पैसाच खेळ झाला,' 'नोटा'चा अधिकार हिरावून घेतला जातोय' असे म्हणून छाती बडवणे सुरू आहे. पण माघार घेणाऱ्या एकाही उमेदवाराने तशी तक्रार केलेली नाही. त्यांच्यात ताकद नव्हती, त्यांना ताकद देणारे नेतृत्व नव्हते. त्यामुळे ते बाजूला झाले. जिथे विरोधी नेत्यांमध्ये ताकद होती तिथे हे प्रकार घडले नाहीत. राज ठाकरे म्हणाले त्याप्रमाणे कुठेही उमेदवार पळवणारी टोळी आलेली नाही. तुम्हाला तुमचे उमेदवार सांभाळता आले नाहीत हे का लपवता? या आधी पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडले गेले, बोगस मतदारांमुळे आम्ही हरलो, असे विरोधक म्हणायचे. आता त्यांना पुढच्या पराभवासाठी हे नवं कारण मिळालं आहे. पण हे प्रथमच घडलं अशातला भाग नाही. अनेक दशकांपासून हे सुरू आहे. २०१८ मध्ये पश्चिम बंगालमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये २० हजार उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. या घटनेची सुप्रीम कोर्टाला दखल घ्यावी लागली होती. त्यामुळे आपल्याकडे काही नवं घडलं असे समजायचे कारण नाही. याकडे बोट दाखवायचं तर मग २०१९ मध्ये काय घडलं होतं? जनतेने भाजपा-शिवसेना युतीच्या बाजूने बहुमताचा कौल दिला असताना उद्धव ठाकरेंनी शरद पवारांसोबत जाऊन मुख्यमंत्री पदाची हौस भागवली. त्यावेळी लोकशाहीची हत्या झाली नव्हती का? जनतेने भाजपासोबत बसायला सांगितले असताना महाविकास आघाडीसोबत बसणारे उद्धव 'गद्दार' होत नाहीत का? राज्यात २९ महापालिकांसाठी निवडणुका होत आहेत. मात्र त्यातल्या सर्वात श्रीमंत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे लक्ष आहे. राजकारणाची दिशा ठरवणारी ही निवडणूक आहे. ही निवडणूक हरले तर ठाकरे बंधू संपले. ठाकरे बंधूंनी मराठी आणि महाराष्ट्राचे हित हा या निमित्ताने अस्मितेचा मुद्दा बनवला आहे. महाराष्ट्र हितासाठी आम्ही भाऊ एकत्र आलो असे राज ठाकरे म्हणत आहेत. पण तसे आहे तर मग २० वर्षे महाराष्ट्र तुडवण्यासाठी राज ठाकरे हे उद्धव ठाकरेंपासून वेगळे झाले होते का? १४ महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला २९ टक्के तर शिंदे सेनेला १७ टक्के मतं मिळाली होती. ठाकरे सेना २३ टक्क्यावर थांबली होती. दोघांमध्ये १६ टक्क्यांचा फरक आहे. या १६ टक्क्यासाठी आता संघर्ष आहे. त्यामुळे या निवडणुकीत काय होणार हे आताच स्पष्ट आहे. ठाकरे ब्रँड म्हणजे कडवट हिंदुत्व. तेच त्यांनी सोडले, त्यामुळे ठाकरे ब्रँडचे ग्लॅमर हरपले आहे. उद्धव ठाकरेंनी कट्टर हिंदुत्वाची ठेव गमावली आहे. त्यांनी मुस्लिमांना जवळ केले. त्याच फटका त्यांना बसणार. ठाकरे स्वतःची नवी व्होट बँक निर्माण करू शकले नाहीत. राज ठाकरे त्यांना फार मदतीचे ठरणार नाहीत. 'ममू' म्हणजे मराठी माणूस आणि मुस्लिम मतं हा फॅक्टर यावेळी महत्त्वाचा ठरणार आहे. ठाकरेंची मराठी मतं शिंदेंचे उमेदवार खातील. लोकांना भावनिक करून निवडणुका जिंकायच्या, निवडणूक आली की मुंबई तोडायला निघाले म्हणून बोंब ठोकायची हा उद्धव यांचा नेहमीच खाक्या राहिला आहे. तब्बल २५ वर्षे ठाकरेंची सत्ता होती. मग मराठी माणूस मुंबईबाहेर का फेकला गेला, याचे काय उत्तर आहे ठाकरेंकडे? मराठी माणूस आता शहाणा झाला आहे. भाजपाने उभी केलेली विकासाची कामं त्याला खुणावत आहेत.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## विमा व्यवसायासाठीच्या कायद्यात आमूलाग्र सुधारणा

देशात विमा व्यवसायाला चालना देण्यासाठी सर्वांसाठी विमा आणि सर्वांची सुरक्षा विधेयक २०२५ संसदेने नुकतेच पारित केले. या सुधारणा विधेयकामुळे पूर्वीचे विमाविषयक ७१ कायदे गोठविले गेले. इन्शुरन्स कायदा १९३८, एलआयसी कायदा १९५६, आयआरडीए १९९९ इ. मध्ये सुधारणा करून हे विधेयक तयार करण्यात आले आहे. विमा क्षेत्रातील सध्याच्या ८२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत वाढ करणे तसेच विमा नियामक प्रक्रिया करणे यासाठी परकीय विमा कंपन्यांना १०० टक्के गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली आहे. देशातील प्रत्येक माणसाला विम्याचा फायदा मिळवून देण्यासाठी या सुधारणा करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. सध्या देशात विमा व्यवसायात केवळ २५ कंपन्या कार्यरत आहेत. त्यामुळे देशात सर्वत्र पोहोचणे शक्य होत नाही. विमा म्हणजे आर्थिक नुकसानीपासून संरक्षण मिळविण्याचे एक साधन. विमाधारक व्यक्ती विमा कंपनीला ठरावीक हप्ता म्हणजे प्रीमियम भरतो. आकस्मिक नुकसान झाल्यास त्या बदल्यात विमा कंपनीकडून भरपाई मिळते. पूर्वी आपल्याकडे आंतरराष्ट्रीय कंपन्यांना विमा क्षेत्रात काम करण्यास आणि गुंतवणुकीला केवळ २६ टक्केच अशा कंपन्यांना कायद्यानुसार परवानगी होती. काही कालावधीनंतर या व्यवसायात येण्यासाठी ७६ टक्के अशा परकीय कंपन्यांना गुंतवणूक करण्यास परवानगी मिळाली. विमा क्षेत्राचा आणखी विकास व्हावा, ग्रामीण भागापर्यंत विम्याचे महत्त्व जनतेला समजावे म्हणून १०० टक्के परकीय विमा कंपन्यांना भांडवल गुंतविण्यास या कायद्याने परवानगी दिली आहे. यामुळे तरुणांना नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. स्पर्धा वाढल्याने ग्राहकांना कार्यक्षम सेवा मिळेल. विम्याचा हप्ता कमी होईल. आरोग्य विम्यामध्ये नवीन पर्याय ग्राहकांना उपलब्ध होतील. विमा क्षेत्रात मूलभूत बदल करण्याचे वचन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी दिले होते. त्याची पूर्तता या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे होणार आहे. परकीय गुंतवणूक वाढल्याने देशातील अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. विमा व्यवसायात मोठी गुंतवणूक दीर्घ मुदतीसाठी करण्यासाठी परकीय कंपन्यांना संधी उपलब्ध करून दिल्याने रुपया मजबूत होईल. विमा क्षेत्र हे आशिया खंडात मोठे आणि वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. प्रगत तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण उत्पादने आणि कार्यक्षम ग्राहकसेवा याचा उपयोग देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आपल्या देशाने विमा व्यवसायात परदेशी गुंतवणूकदारांना मुक्तपणे संचार करण्यास दिल्यामुळे विकासाला गती मिळणार आहे. देशातील प्रत्येक माणसापर्यंत विम्याचे संरक्षण पोहोविल्याने जनतेला दिलासा मिळणार आहे.

**ॲड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

## वाचक पत्रे

## बांगला देशातील हिंदूंच्या हत्या

गेल्या महिन्याच्या काळात बांगला देशात हिंदूंच्या निदान सहा ज्ञात अमानुष हत्या झाल्याचे वृत्त आले. प्रकाशात न आलेल्या घटना किती असतील! भारताशिवाय हिंदूंना आश्रय देणारा दुसरा समर्थ देश जगात नाही. बांगला देश सरकारने हिंदूंवरील अत्याचाराच्या बातम्यांना फारसे महत्त्व देऊ नये, असा फतवा काढल्याची बातमी आहे. 'हिंदू मानव नाहीत' अशी त्या सरकारची धारणा असावी, असे वाटते. हिंदू धर्मीयांविषयी भारतालासुद्धा काही सोयरसुतक नसाव, असे दिसते. एरवी बहुसंख्य अतिरेकी विचारसरणी असलेल्या धर्मीयांविरुद्ध बातमी जरी आली तरी चवताळून उठणारे भारतातील विरोधी पक्ष, हिंदूंवरील अत्याचारांबद्दल मात्र मूग गिळून बसले आहेत. भारतातील काही हिंदूंना मात्र काळजी वाटत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी त्यांच्या शेजारच्या व्हेनेझ्युएला देशातील राज्यकर्त्यांविरुद्ध कारवाई करून भारताला अप्रत्यक्षपणे मार्ग सुचविला आहे. अशी कारवाई भारताने बांगला देशाविरुद्ध करून असहिष्णू हिंदू समाजाला न्याय द्यावा अशी भारतीयांची रास्त मागणी आहे. भविष्यात जगात केवळ हिंदू- जैन- बौद्ध- शीख भारतात जन्मलेले धर्मच शांतीचा संदेश देत अहिंसेची भावना वाढीस लावून मानव जातीचेच नव्हे तर निष्पाप प्राणिमात्रांचे शाश्वत कल्याण साधू शकतात, यात दुमत नसावे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## मकरसंक्रांत आणि नायलॉन मांजा

'तीळगूळ घ्या, गोड गोड बोला' असे सांगणारी मकरसंक्रांत आनंद, आपुलकी आणि ऋतुबदलाचा संदेश देणारा सण आहे. भारतातील प्रत्येक राज्यात मकरसंक्रांत विविध नावांनी आणि वेगवेगळ्या पद्धतींनी साजरी केली जाते. या सणातील एक महत्त्वाची परंपरा म्हणजे पतंग उडवणे! पतंग उडवणे म्हणजे एक प्रकारे आकाशासोबत नाते जोडले जाणे. इतकेच नव्हे, दुचाकीस्वारांचे गळे चिरले जाण्याच्या, गळ्याभोवती मांजा आवळल्याने वाहनावरून खाली पडण्याच्या अनेक गंभीर घटना घडतात. बरेचदा पतंग उडवल्यानंतर मांजा झाडांवर, विजेच्या तारांवर अडकून राहतो. त्यामुळे धोका निर्माण होतो. म्हणूनच नायलॉन मांज्याच्या वापरावर कठोर बंदी घालणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने अशा मांज्याची विक्री, साठवणूक आणि वापर यांवर कठोर दंड आणि कारावासाची कारवाई अमलात आणली पाहिजे. केवळ कायदे करून थांबणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. तसेच, एक सुज्ञ नागरिक म्हणून 'खरेच पतंग उडवणे किती आवश्यक आहे?' याचाही आत्मपरीक्षणपूर्वक विचार करायला हवा. आपल्या मुलांना योग्य मार्गदर्शन करून निसर्ग, पक्षी आणि माणसांच्या जीवाचे महत्त्व पटवून देणे ही आजची गरज आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मेहता प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन थाटामाटात

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ हुतात्मा स्मृती मंदिर येथे विद्याभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांत शिशु वाटिका सहप्रमुख सविता कुलकर्णी व शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर, सुनेत्रा मोहोळकर, योगेश सरवदे, अक्षय अंदोरे यांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका कोरवलीकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख अतिथींचा परिचय मयुरी दुरूगकर यांनी करुन दिला. विद्यार्थीनी प्रतिनिधी वैभवी अचलेरे हिने गुलाबपुष्प देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. कार्याध्यक्षा सुनेत्रा मोहोळकर यांनी अहवालवाचन केले. विद्यार्थी प्रतिनिधी वेदांत वरेकर यांने आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शि. प्र. मंडळीच्या सोलापूरातील सर्व शाखांचे मुख्याध्यापक व पुण्याहून सुनिल जोशी आवर्जून उपस्थित होते. सूत्रसंचालन शितल जालीमिंचे यांनी केले. योगेश सरवदे यांनी आभार मानले.

# दोन गटाने एकमेकांना बडतर्फ केले

## महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटना फूट प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

महाराष्ट्रातील सर्वात मोठी संघटना (सुमारे दोन हजार कॉलेज व ३५ हजार कर्मचारी) म्हणून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघात फूट पडली असून आता यात दोन गट झाले असून या दोन गटातील पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना बडतर्फ केले आहे.

महासंघाचे सरचिटणीस डॉ. आर.बी. सिंह यांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव डॉ. सुजित सिंग यांच्या सरचिटणीस पदाला विरोध झाल्यामुळे मुंबई येथे नुकतीच सात विभागीय संघटनांची बैठक झाली. महासंघाचे अध्यक्ष रा.जा. बढे व कार्याध्यक्ष गोविंद जोशी यांनी महासंघाच्या सरचिटणीसपदी डॉ. सुजित सिंह यांची निवड केली आहे. डॉ. सिंह हे शिक्षकेतर संवर्गातील नसल्यामुळे ते महासंघाचे पदाधिकारी होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांची ही बेकायदेशीर निवड अमान्य करण्यात आली. महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचा हक्कभंग झाल्यामुळे अध्यक्ष बढे व कार्याध्यक्ष जोशी यांना महासंघातून बडतर्फ करण्यात आले. त्यांच्या रिक्त जागी सर्वानुमते उपाध्यक्ष जी. वाय. पाटील यांची अध्यक्ष म्हणून तर उपाध्यक्ष ज्ञानेश्वर बारस्कर यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. उपाध्यक्ष एम. के. राऊळ यांची सरचिटणीस म्हणून या बैठकीत निवड करण्यात आली. पाटील यांची अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे ऋषिकेश चित्तम यांची उपाध्यक्षपदी व बारस्कर यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड झाल्यामुळे प्रशांत देशमुख यांची उपाध्यक्षपदी तर राऊळ यांची सचिटणीसपदी निवड झाल्यामुळे प्रविण खामकर यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यानंतर महासंघातील संघटनेतील मूळ पदाधिकाऱ्यांची रविवार ४ जानेवारी २०२६ रोजी कल्याण येथे सर्वसाधारण सभा झाली. कर्मचाऱ्यांच्या हितास वारंवार बाधा निर्माण करून महासंघाच्या विरुद्ध कारवाया केल्यामुळे घटना नियम १४ अन्वये गैरकृत्य केल्याच्या अनुषंगाने माधव राऊळ, चंद्रकांत धनावडे, गोपीचंद पाटील, ज्ञानेश्वर बारस्कर, निंबा पाटील, एंथोनी थॉमस, सोनाली लब्धे, सुदर्शन आंग्रे, संजय पाटील व संजय पोळ या सर्व सदस्यांना बहुमताने महासंघातून त्यांच्या त्यांच्या पदावरून व संघटनेच्या सदस्य पदावरून बडतर्फ करण्यात आले आहे. त्यांचा महासंघाशी भविष्यात कुठलाही संबंध राहणार नाही. तसेच महासंघाची साधन सामुग्री, नाव, शिक्का व महासंघाचे चिन्ह याचा गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अध्यक्ष रा. जा. बडे, कार्याध्यक्ष एस. एस. कामठे, कार्याध्यक्ष गोविंद जोशी, सरचिटणीस डॉ. सुजीत सिंह यांनी पत्रक काढले आहे.



### कर्मचाऱ्यांच्या हितासाठी चारही संघटनांनी एकत्र यावे

सोलापूरचे पदाधिकारी महासंघाच्या दोन्हीही बैठकीस उपस्थित नव्हते. या मोठ्या संघटनेबरोबरच राज्यात आता महाविद्यालयाच्या चार संघटना झाल्या आहेत. शासन दरबारी आपल्या मागण्या मान्य होणे आता अजून कठीण जाणार आहे. कर्मचाऱ्यांच्या हितासाठी या चारही संघटनांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

**- दत्ता भोसले, अध्यक्ष सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियन**

# भावसार व्हिजनच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी शिवाजी उपरे, गिरीष पुकाळे सचिव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

नुकत्याच बंगलोर येथे झालेल्या भावसार व्हिजनच्या अधिवेशनात येथील भावसार व्हिजनचे माजी अध्यक्ष शिवाजी उपरे यांची २०२७च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी तसेच क्लबचे माजी अध्यक्ष गिरीष पुकाळे यांची राष्ट्रीय सचिवपदी निवड झाली आहे.





श्री उपरे हे भावसार व्हिजनचे संस्थापक सदस्य असून पुकाळे हेही भावसार व्हिजन मध्ये २००९ पासून कार्यरत आहेत. श्री. उपरे हे भावसार व्हिजन शिवाय रोटरी क्लब, सोलापूर फिल्म सोसायटी व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरी शाखा व मराठी साहित्य परिषदेचे सदस्य आहेत. २०१५मध्ये सोलापूर भावसार व्हिजन क्लबचे अध्यक्ष असताना पहिल्यांदा त्यांनी क्लबला राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ठ क्लबचा सन्मान मिळवून दिला. श्री उपरे हे इन्शुरन्स क्षेत्रात कार्यरत असून याशिवाय ते एक प्रमुख नाट्य वितरक आणि व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. २०१९मध्ये पहिल्यांदा श्री पुकाळे यांना राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ठ अध्यक्ष या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. श्री. पुकाळे हे ऑटोमोबाईल इंजिनीअर असून, सोलापुर महानगरपालिकेत वाहन विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर दुष्कर्म केल्याप्रकरणी युवकास जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८जानेवारी-**

अल्पवयीन मुलीवर दुष्कर्म केल्याप्रकरणी अभिजीत संतोष काशीद रा. साडे, ता- करमाळा, जि- सोलापूर यास कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिघे यांनी जामीन मंजूर केला.



यात हकीकत अशी की, दि. ३१ जुलै २०२५ रोजी पिडिता ही शाळेत गेली असता, शिक्षकांनी तिच्या आईस शाळेत बोलावून घेतले, त्यावेळेस शिक्षकांनी तिच्या आईस सांगितले की, तिच्याकडे आक्षेपार्य वस्तू मिळून आलेली आहे, तिची विश्वासात घेऊन चौकशी करा त्यावेळी पीडिताने तिच्या आईस सांगितले की, तीन ते चार महिने पूर्वी अभिजीत काशीद याने घरात कोन्ही नसताना जबरदस्तीने दुष्कर्म केले व त्यानंतर तिची बदनामी करतो म्हणून चार ते पाच वेळा दुष्कर्म केले. त्यावरून पीडितेच्या आईने करमाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावर आरोपीस अटक केली होती.आपणास जामीन मिळवा म्हणून आरोपी अभिजीत याने जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी येथे अर्ज दाखल केला होता, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता.

आरोपी अभिजीत याने एडवोकेट रितेश थोबडे यांच्यामार्फत जामीन मिळणेसाठी कोल्हापूर उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. अर्जाच्या सुनावणीच्या वेळी ॲड. रितेश थोबडे यांनी आपले युक्तिवादात, गुन्ह्यात दाखल झालेली फिर्यादी ही उशिराने दाखल झालेली असून गुन्ह्याचा तपास हा पूर्णत्वात आलेला आहे, असा युक्तिवाद मांडला, त्यावरून न्यायमूर्तींनी २० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अर्जदार/आरोपीस जामीन मंजूर केला.यात अर्जदार आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे, ॲड. निखिल पाटील तर सरकारतर्फे ॲड. पी.पी देवकर यांनी काम पाहिले.

### सावधानतेची जाहीर नोटीस

तमांस लोकांना विशेषतः सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः डि व सब डि सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील व मुस्ती ग्रामपंचायत हद्दीतील मौजे मुस्ती येथील शेतजमीन यांसी गट नं. ८५ याचे एकूण क्षेत्र ७.७१.०० हे. आर चौ.मी. आकार रुपये ३.२५ यापैकी लिहून यांचे मालकीचे क्षेत्र २.५७.०० हे. आर चौ.मी. आकार रुपये १.०६ पैसे इतके आहे. यांसी चतुःसिमा :- पुर्वेस : गट नं. ८४, दक्षिणेस : सदर गटातील उर्वरित शेतजमीन व १५ फुटी शिवरस्ता, पश्चिमेस : गट नं. ८६, उत्तरेस : गट नं. ४३ व गावातील क्षेत्र. येणेप्रमाणे चतुः सिमेतील शेतजमीन व यातील दगड, माती, बांध, उरळया, ताली, वगैरे तद्गभूत वस्तुसह.

वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही श्री. धोंडीबा यमनप्पा पांढरे वगैरे १, रा. सोलापूर मिळकत असून, वर कलम १ मध्ये नमूद सदरची मिळकत हे आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे मान्य व कबूल करुन आमचे अशिलाकडून इसारा म्हणून काही रक्कम स्विकारुन वर नमूद मालकांनी आमचे अशिलास दिनांक १८/०८/२०२५ रोजी इसारा पावती करारपत्र लिहून दिलेली आहे. सदर इसारा पावतीमधील अटी व शर्तीप्रमाणे श्री. धोंडीबा यमनप्पा पांढरे वगैरे १, हे खरेदीखतापूर्वी शासकीय मोजणी करुन हद्दीखुणा कायम करुन देऊ असा ठरल्याप्रमाणे कोणतेही काम यांनी केलेले नाही. सदर श्री. धोंडीबा यमनप्पा पांढरे वगैरे १, यांना आमचे अशिल यांनी प्रत्यक्ष भेटून शासकीय मोजणी कधी करुन देता तसेच हद्दीखुणा कायम करुन देण्याबाबत बोलणी विचारपूस केले असता हे निरनिराळी कारणे सांगून उडवाउडवीची उत्तरे दिलेले नाही. तरी आमचे अशिल हे उपरोक्त नमूद झालेले इसारा पावती करारपत्र व रक्कमबाबत कायदेशीर इलाज करणार आहेत.

तरी या सावधानेतीची जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर कलम १ मधील नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही विकत घेऊ नये. त्याबाबत कोणत्याही प्रकारचे करार, मदार, इसारा पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, किंवा अन्य कोणतेही व्यवहार करु नये आणि कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची सावधानतेची जाहीर नोटीस देत आहे. सदरचा व्यवहार हा आमचे अशिलावर व वर नमुद मिळकतीवर बंधकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही सावधानतेची नोटीस दिली ता. ०९/०१/२०२५.

**सही/-**
**ॲड. सागर एस. बासुतकर**
**रा. १६१४, कुचन नगर, दाजी पेठ, सोलापूर. मो.नं. ७५०७५४७५६७**

**CHANGE IN NAME**

I AM CHANGING MY NAME FROM " ASHOK JIVRAJ JAIN KANKARIYA " TO " ASHOK JIVRAJ JAIN " RESIDING AT A2/224, MANTRI CHANDAK NAGAR, BHAVANI PETH, SOLAPUR, MAHARASHTRA-413002. FOR PASSPORT ISSUANCE.

**CHANGE IN NAME**

I Sattar Babu Kureshi am changing my child's Name from **Maheen Abdul Sattar Kureshi** To **Maheen sattar kureshi** for passport issuance.
Add.: 126 Valsang, Tel. South solapur, Dist Solapur- 413228

**CHANGE IN NAME**

I am chinging my Name from **Abdul Sattar kureshi** to **Sattar Babu Kureshi** for passport issuance.
Add.: 126 Valsang, Tel. South solapur, Dist Solapur- 413228

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **farjana Abdul Sattar Kureshi** to **Farzana Sattar Kureshi** for passport issuance.
Add.: 126 Valsang, Tel. South solapur, Dist Solapur- 413228

**CHANGE IN NAME**

I here by declare that my old name **Gaibi Saheb Rukamoddin Shaikh** has been changing To New name **Gaibisab Rukmoddin Shaikh.** Hence for the passport. issuance and this declaration in future I will use this name The same name will be used by all document.
Address - At Post Kumbhari Tal south solapur

# भारतीय मानक ब्युरोची मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये कार्यशाळा

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे एलसी-८४३७ भारतीय मानक ब्युरो पुणे विभाग यांच्या वतीने एलएसव्हीएस लर्निंग सायन्स वाया स्टँडर्ड ही एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत बीआयएस क्लबचे की रिसोर्स पर्सन म्हणून तेजश्री देवरे उपस्थित होत्या. प्रिया पसारे यांनी शाळेत अंतर्गत घेण्यात येणाऱ्या सर्व ॲक्टिव्हिटी ची माहिती दिली.



जेष्ठ शिक्षिका अनिता हौदे यांनी शाल व ग्रंथ देऊन तेजश्री देवरे मॅडम यांचा सत्कार केला. यानंतर तेजश्री देवरे यांनी प्लायवुड आणि इलेक्ट्रॉनिक या साधनांमध्ये वापरण्यात येणारे, यांची माहिती आणि व्हिडिओद्वारे दिली. हॉलमार्किंग, लर्निंग सायन्स वाया स्टँडर्ड याचा उपयोग अभ्यासक्रमात कसा करता येईल याबद्दल माहिती दिली. अतिशय उपयुक्त अशा प्रकारची एक दिवसीय कार्यशाळा विद्यालयात संपन्न झाली. चे विज्ञान शिक्षिका प्रिया पसारे यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यशाळेसाठी प्र.मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, अनिलकुमार गावडे,प्रतीक्षा बिडवे यांची विशेष उपस्थिती होती.

## ग्रामपंचायत उंदरगाव, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत उंदरगाव तालुका माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

### लेखाशिर्ष :- १५ वा वित्त आयोग

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत महिन्यांमध्ये | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गावांतर्गत बोळ रस्ते कॉंक्रिटीकरण करण | २,७५,०००/- | - | १००/- | ६ महिने | सु.बे.अ. |
| २ | डॉ. आंबेडकर नगर व अण्णाभाऊ साठे नगर पेव्हिंग बसवणे | १,२०,०००/- | | | | |
| ३ | पाणीपुरवठा दुरुस्ती व विद्युत पंप खरेदी करणे व आवश्यक साहित्य खरेदी करणे | ३,७०,०००/- | | | | |

**टीप -**
१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि. ०९/०१/२०२६ सकाळी १०.०० पासून
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक १२/०१/२०२६ पर्यंत सकाळी १०.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय उंदरगाव
३) निविदा उघडण्याचा दिनांक १२/०१/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता
४) निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५) निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत उंदरगाव, ता. माढा**

**सही/-**
**रतनबाई माणिक लवटे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत उंदरगाव, ता. माढा**

## ग्रामपंचायत महतपूर, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत महतपूर तालुका माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

### लेखाशिर्ष :- १५ वा वित्त आयोग

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत महिन्यांमध्ये | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे व मुतारी बांधकाम करणे | ९९,६१४/- | - | १००/- | ३ महिने | खुला |

**टीप -**
१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि. ०८/०१/२०२६ सकाळी ११.०० पासून
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक १४/०१/२०२६ पर्यंत सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय महतपूर
३) निविदा उघडण्याचा दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता
४) निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५) निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत महतपूर ता. माढा**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १३२ यासी नविन सर्व्हे नं. १३० यापैकी सुर्या नगर म्हणून ओळखले जाणारे येथील प्लॉट नं. ९० याचे क्षेत्र ५६.४२ चौ. मीटर इतकी आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस - न.म. पैकी ७.५ मी., दक्षिणोत्तर - सामाईक चालीचा रस्ता, पश्चिमेस - स.नं. १३० पैकी शिल्लक जागा,दक्षिणेस - न.म. पैकी प्लॉट नं. ८९, उत्तरेस :- न.म.पैकी प्लॉट नं. ९१ येणेप्रमाणे चतुःसीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह.

ही प्लॉट जागा - रुक्साना ईब्राहिम शेख, रा. जेऊर रोड, समता नगर, अक्कलकोट, सोलापूर यांचे मालकीची असून ही प्लॉट जागा आमचे अशिल खरेदीने घेणार आहेत. तरीही नमूद प्लॉट जागेवर अथवा मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०८/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑफिस - १६२८, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी कि. अर्ज नं. ६५/२०२५
पुढील नेमली ता. १०/०२/२०२६ नि. ५

#### बार्शी येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर साहेब यांचे कोर्टात
**(आर. पी. बागडे सो कोर्ट)**

**श्रीमती चित्रा आप्पासाहेब संकपाळ,**
वय - ६० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. जनता वसाहत, पर्वतीपायथा
वागजाई मंदिराजवळ, पुणे ता.जि. पुणे
— **अर्जदार**

विरुध्द

**उमाकांत आप्पासाहेब संकपाळ**
वय - ४० वर्षे, धंदा - खासगी नौकरी,
रा. जनता वसाहत, पर्वतीपायथा
वागजाई मंदिराजवळ, पुणे ता.जि. पुणे
— **सामनेवाला**

**अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट ९ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता**

ज्याअर्थी, यातील अर्जदार सध्या सदरील ठिकाणी राहत असून अर्जदार व सामनेवालेचे मुळ गाव झरेगाव, ता. बार्शी हे असून अर्जदाराचे पती आप्पासाहेब राजाराम संकपाळ यांचे गावे मौजे झरेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे जमिन गट नंबर १७४ व जमिन गट नंबर १ व जमिन गट नंबर १७९ अशी सामाईकात जमिन आहे. यातील अर्जदाराचे पती आप्पासाहेब राजाराम संकपाळ हे ता. २८/०९/२०१८ रोजी मौजे बाणेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. त्याचे पश्चात त्यांना वारस अर्जादार ही पतनी या नात्याने सामनेवाला मुलगा या नात्याने वारस होते व आहेत. यातील अर्जदाराचे पती मयत झालेनंतर दिनांक २६/११/२०१८ रोजी संबंधीत तलाठी यांचेकडे तिचे पतीचे नाव कमी करुन यातील अर्जदाराचे व सामनेवालाचे नाव सदरील जमिनीस लावणेकामी अर्ज दिला होता. त्यावेळी संबंधीत तलाठ्यांनी नाव लावणेस नकार देऊन दिवाणी कोर्टातून वारस दाखला आणणेकामी सांगितले. म्हणून यातील अर्जदाराने सदरचा अर्ज मयत आप्पासाहेब राजराम संकपाळ यांचे वारस यातील अर्जदार या सामनेवाला असलेमुळे त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे. यातील अर्जदाराने यापुर्वी दिवाणी कि. अर्ज नं. ६९/२०१७ या अर्ज मे.सि.ज.सि.डी. बार्शी यांचे न्यायालयात दाखल केला होता. त्यावेळी मे. कोर्टांनी रे.मु.नं. २१४/२०१५ या दाव्याचा निकाल लागलेनंतर सदरचा अर्ज दाखल केरावा आस आदेश मे. कोर्टाने केले होते. रे.मु. नंबर २१४/२०१५ हा दावा ता. ११/०३/२०२५ रोजी निकाली निघालेला आहे. त्यामुळे यातील अर्जदाराने परत मे. कोर्टाचे आदेशाप्रमाणे सदरचा अर्ज या मे. कोर्टात पुन्हा दाखल केला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदारास अर्जास नमुद केलेप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत व तक्रार असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली तारीख १०/०२/२०२६ रोजीपर्यंत आपल्या हरकत नोंदवाव्यात, कोणाची हरकत न आलेस पुढील यथायोग्य आदेश करतील हे जाहीर प्रसिध्दीकरण न्यायालय, कोर्टाच्या सह्या शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीख ०३/०१/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय क स्तर, बार्शी**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे कासारवाडी व बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

मौजे - कासारवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील खुली प्लॉट जागा तिचा गट नं. ३४९ पैकी प्लॉट नं. २० व प्लॉट नं. १९ पैकी क्षेत्रफळ ०.०३ आर., यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - सदर गट नंबरपैकी क्षिरसागर यांची जमीन, दक्षिणेस रस्ता, पश्चिमेस - सदर गट नंबरपैकी धनगर प्लॉट व उत्तरेस - राजाभाऊ गुंड यांची जमीन, येणेप्रमाणे आतील तदंगभूत वस्तुसह प्लॉट जागा.

सदरची प्लॉट जागा ही प्लॉट मालक श्री. मधुकर मन्मय कदम, रा. शेलगांव (मा.), ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे खरेदी मालकीची आहे. सदर प्लॉट जागा ही जागा मालकाने निर्वेध व निजोखमी व बिनबोजाची असलेची हमी व खात्री आमचे अशिलास दिलेली आहे. त्यामुळे सदर प्लॉट जागा खरेदी घेणेचे ठरवून आमचे अशिलांनी जागा मालकाशी व्यवहाराची बोलणी केलेली आहे आणि इसारादाखल रक्कम रु. २५,०००/- दि. ०३/०१/२०२६ रोजी दिलेली आहे.

तरी, सदर प्लॉट जागेविषयी कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार असल्यास तसेच सदर प्लॉट जागेवर गहाणखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, टाच, बोजा आणि तत्सम स्वरुपाचा आर्थीक व्यवहार असतील, लिज, पेंडन्सी असेल तर, सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर कागदपत्रानिशी हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आलेस सदर जागा निजोखमी, बिन-बोजाची आहे, असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. ०८/०१/२०२६.

**सही/-**
**अशिल**
**श्री. मारुती भाऊराव देशमुख**

**सही/-**
**ॲड. श्री. संतोष गोपीनाथ गायकवाड**
**बी.ए., एल.एल.बी.,**
**उपळाई रोड, चव्हाण प्लॉट,**
**बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर**
**मो.नं. ९८५०५८७७१५**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३१/२०२५
पुढील नेमली ता. २४/०२/२०२६ निशाणी नं. ५

#### बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश सो यांचे न्यायालयात

१) **अल्फिया सुभान शेख,**
वय - १६ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. गुळसडी, ता. करमाळा जि. सोलापूर
२) **सोफिया सुभान शेख,**
वय - १४ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **सरताज सुभान उर्फ सुबान शेख,**
वय - ८ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
(अर्जदार नं. १ ते ३ यांचे तर्फे
अपाक आई अर्जदार नं. ४ रिजवाना सुभान शेख)
४) **रिजवाना सुभान शेख,**
वय - ३५ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. सदर
— **अर्जदार**

विरुध्द

१) **महाराष्ट्र शासन, (सदरची नोटीस मा. जिल्हा सरकारी वकिल यांचेवर बजावण्यात यावी.)**
२) **मुन्ताज राजू पठाण,**
वय - ४४ वर्षे, धंदा - शेती,
रा. वडगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर
३) **शबाना करीम मुजावर,**
वय - ३४ वर्षे, धंदा - शेती,
रा. डोंजा, ता. परांडा, जि. धाराशिव
४) **रुबीना फारूख शेख,**
वय - ४७ वर्षे, धंदा - शेती,
रा. देवळाली, ता. करमाळा, जि. सोलापूर
— **सामनेवाला**

ज्याअर्थी डि सोलापूर सब डि व ता. करमाळा पैकी मौजे गुळसडी ग्रामपंचायत हददीतील जमिन गट नं. १५६ पैकी सामाईक हिश्याची मालकीची जमिन याचे क्षेत्र ०० हे. १५ आर याचा आकार रु. ००-२४ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - श्री. विनायक देवराव पाटील यांची जमिन, दक्षिणेस - दत्तात्रय गायकवाड यांची जमिन, पश्चिमेस - हारुन कासम शेख यांची जमिन, व उत्तरेस - रुपचंद उत्तम बागल-पाटील यांची जमिन.

वर नमूद मिळकत मुळची अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल व अर्जदार नं. ४ चे पती सुभान नजीर शेख यांचे मालकी कब्जेवहिवाटीची अशी मिळकत होती. सदर सुभान नजीर शेख हे दि. २६/०४/२०२१ रोजी मयत झालेने त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार नं. १ ते ४ यांचे नावाची नोंद सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी वारसा हक्काने झालेली आहे. सदर अज्ञानाचे भविष्यकालीन प्रगतीसाठी व पुढील शिक्षण घेण्यासाठी बराच खर्च येणार आहे. त्यामुळे अज्ञानाचे नावे असलेली वर नमूद मिळकत विक्री करणेस परवानगी मिळणेकामी यातील अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार हे सदर मिळकतीचे मालक, हक्कदार नाहीत अथवा मिळकतीत कोणाचे हितसंबंध असतील तर या जाहिर प्रसिध्दीकरणाचे तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख २४/०२/२०२६ रोजीपर्यंत त्याने या कोर्टात स्वतः किंवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न नोंदविल्यास, तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू अज्ञानाची मिळकत विक्रीची परवानगी देण्यात येईल. हे प्रसिध्दीकरण आमचे सही निशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे ता. ०१/०१/२०२६.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**हुकुमावरून**
**अक्षीक्षक,**
**जिल्हा न्यायालय, बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मनुष शाह सकारात्मक सुरुवात करण्यास सज्ज



**बडोदा** : जागतिक क्रमवारीत ७५ व्या क्रमांकावर असून आणि सहसा सर्किटच्या उच्च स्तरावरील स्पर्धांमध्ये खेळण्यास प्राधान्य देत असूनही, मनुषने घरच्या प्रेक्षकांसमोर खेळण्याची संधी मिळाल्यामुळे जागतिक टेबल टेनिस (डब्ल्यूटीटी) फीडर स्पर्धेत खेळण्याचा निर्णय घेतला. त्याने २०२५ ची सुरुवात आपल्या मूळ गावापासून सुमारे १५० किमी अंतरावर असलेल्या सुरतमध्ये आपले पहिले वरिष्ठ राष्ट्रीय एकेरी विजेतेपद जिंकून केली. २०२६ ची सुरुवात होत असताना, मनुष शाह या वर्षी आणखी यशस्वी सुरुवात करण्याचे ध्येय बाळगत आहे. मनुषने मिश्र दुहेरीतील जोडीदार दिया चितळेसोबत डब्ल्यूटीटी फायनल्ससाठी पात्र ठरणारी पहिली भारतीय जोडी होण्याचा मान मिळवला आहे. ही हंगामाच्या शेवटी होणारी स्पर्धा आहे. या स्पर्धेत प्रत्येक श्रेणीतील अव्वल आठ खेळाडू सहभागी होतात. तो शुक्रवारी सामा इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये पुरुष एकेरीमध्ये अव्वल मानांकित खेळाडू म्हणून ड़ब्लूटीटी फीडर स्पर्धेतील आपल्या मोहिमेला सुरुवात करेल.

### रांची रॉयल्सचा एसजी पायपर्सचा ५-२ ने विजय

**रांची** : रांची रॉयल्सने आपल्या शेवटच्या महिला हॉकी इंडिया लीग (एचआयएल) २०२५-२६ सामन्यात एसजी पायपर्सचा ५-२ ने पराभव करत एक प्रभावी अष्टपैलू कामगिरी केली. चौथ्या चरणातील उत्स्फूर्त खेळाने हा विजय निश्चित केला आणि यजमान संघाने स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले. रॉयल्ससाठी लुसिना वॉन डेर हेडे (दुसऱ्या मिननिटाला व ४७ व्या मिनिटाला), संगीता कुमारी (२४ व्या मिनिटाला) आणि हॅना कॉटरने (५५ व्या मिनिटाला, ६० व्या मिनिटाला) गोल केले, तर नवनीत कौरने (१० व्या मिनिटाला, ५८ व्या मिनिटाला) पायपर्ससाठी दोन गोल केले. पायपर्स संघाने यापूर्वीच स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. एसजी पायपर्सने सामन्याची सुरुवात आक्रमक खेळाने केली, परंतु रांची रॉयल्सने लवकरच सामन्यावर नियंत्रण मिळवले आणि पहिल्याच मिनिटात पेनॉल्टी कॉर्नर मिळवला. ड्रॅग-फ्लिक विशेषज्ञ लुसिना वॉन डेर हेडेने कोणतीही चूक न करता, दुसऱ्या मिनिटात गोल करून रॉयल्सला सुरुवातीची आघाडी मिळवून दिली. या गोलमुळे रांची रॉयल्सला पुढील काही मिनिटे खेळावर वर्चस्व गाजवता आले, परंतु त्यानंतर एसजी पायपर्सने कर्णधार नवनीत कौरच्या माध्यमातून जोरदार प्रत्युत्तर दिले. तिने गोल करून बरोबरी साधली. दोन्ही संघांनी गोलची देवाणघेवाण केल्यामुळे, पहिला चरण १-१ असा बरोबरीत आटोपला. संगीता कुमारीने गोल करून यजमान संघाला पुन्हा आघाडी मिळवून दिली. आघाडी पुन्हा आपल्या बाजूने आल्यानंतर, रॉयल्सने शेवटच्या टप्प्यात खेळावर नियंत्रण ठेवले आणि २-१ अशी आघाडी कायम ठेवली.

### युपी वॉरियर्स सर्वात मजबूत संघ : अंजुम

**नवी दिल्ली** : शुक्रवारी नवी मुंबईत सुरू होणाऱ्या २०२६ च्या महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) स्पर्धेपूर्वी युपी वॉरियर्स संघ सर्वात मजबूत दिसत आहे, असे मत माजी भारतीय कर्णधार अंजुम चोप्रा हिने व्यक्त केले आहे. त्याच वेळी ५ फेब्रुवारी रोजी बडोदा येथे होणाऱ्या स्पर्धेचा विजेता शेवटी मैदानातील कामगिरीवरच ठरेल, असेही ती म्हणाली. गत वर्षीच्या मेगा लिलावापूर्वी युपी वॉरियर्सने सर्व खेळाडूंना करारमुक्त केले आणि केवळ अनकॅप्ड दिल्लीची फलंदाज श्वेता सेहरावतला कायम ठेवले. अभिषेक नायर यांच्या रूपाने नवीन मुख्य प्रशिक्षक मिळाल्यानंतर युपी संघाला महिला क्रिकेटमधील सर्वात डावपेचात्मकदृष्ट्या कुशल कर्णधार असलेल्या मेग लॅनिंगच्या रूपात नवीन कर्णधार मिळाली आहे. दीप्ती शर्मा, सोफी एक्लेस्टोन, क्रांती गौड आणि किरण नवगिरे यांना पुन्हा संघात सामील करण्याशिवाय संघात शिखा पांडे, डिएंड्रा डॉटिन, क्लो ट्रायॉन आणि फोबी लिचफिल्डसारख्या सामना-विजेत्या खेळाडू आहेत, ज्यांच्या जोरावर ते पहिल्यांदा जिंकण्याचे लक्ष्य ठेवत आहेत.

### मीनाक्षी, निखत, हितेश उपांत्य फेरीत

**नवी दिल्ली, ८ जानेवारी-** विश्वविजेती मीनाक्षी हुडा, दोन वेळची विश्वविजेती निखत झरीन, विश्व मुष्टियुद्ध चषक सुवर्णपदक विजेता हितेश गुलिया आणि इतर देशातील अव्वल बॉक्सरनी गुरुवारी ग्रेटर नोएडा येथील गौतम बुद्ध विद्यापीठात झालेल्या आपापल्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतींमध्ये सहज विजय मिळवून एलिट पुरुष आणि महिला राष्ट्रीय मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

# विदर्भ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र

### विजय हजारे चषक क्रिकेट

**राजकोट, ८ जानेवारी**

रविकुमार समर्थच्या नाबाद ९४ धावांच्या दमदार खेळीच्या बळावर विदर्भने आसामवर १६० धावांनी विजय मिळविला आणि विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेत ब गटातून उपांत्यपूर्व फेरीसाठी आपली पात्रता सिद्ध केली.

विदर्भने १६० धावांनी मोठा विजय मिळविल्याने चांगल्या नेट रन रेटच्या आधारावर पुढील फेरीत स्थान मिळवले.

आसामने नाणेफेक जिंकून विदर्भाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. विदर्भने ५० षटकांत ७ बाद ३०८ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना आसामचा संपूर्ण संघ ३५ षटकांत १४८ धावांतच गारद झाला.

विदर्भाकडून सलामीवीर अथर्व तायडेने ८८ चेंडूंत ६ चौरकार व ३ षट्कारांच्या मदतीने ८० धावांचे योगदान दिले. ध्रुव शोरीने ५६ चेंडूंत ४० धावांची, तर यश कदमने ४१ व नचिकेत भुतेने ३३ धावांची भर घातली. रविकुमार समर्थने एकाकी झुंज देत ७६ चेंडूंत नाबाद ९४ धावांची खेळी केली, यात त्याने ७ चौकार व एक षट्कार ठोकला.



सामनावीर रविकुमार समर्थ

आसामच्या संपूर्ण संघाला झटपट गुंडाळताना विदर्भाच्या पार्थ रेखडेने ४ बळी, यश ठाकूरने २ बळी, तर अथर्व तायडे, नचिकेत भुते व हर्ष दुबेने एक बळी टिपला.

गट ब मधून उत्तर प्रदेशने आधीच बाद फेरीसाठी पात्रता मिळविली आहे.

गट अ मधून कर्नाटक आणि मध्य प्रदेश पात्र ठरला. कर्नाटकचा मध्य प्रदेशकडून एकतर्फी सामन्यात पराभव झाला आणि जरी कर्नाटक आधीच पात्र ठरला होता, तरी या विजयामुळे मध्य प्रदेशनेही पुढील फेरीत स्थान मिळवले.

गट क मधून पंजाब आणि मुंबई पात्र ठरला. पंजाब आणि मुंबई यांच्यादरम्यान स्पर्धेतील सर्वात रोमांचक सामन्यांपैकी एक सामना खेळला. पंजाबने एक धावेने विजय मिळविला.

गट ड मधून दिल्ली आणि सौराष्ट्र पात्र ठरला. या गटातून तीन संघांमध्ये चुरस होती. हरयाणाचा धुव्वा उडवून दिल्ली पात्र ठरला, तर सौराष्ट्रने गुजरातविरुद्ध ४ गडी गमावून ३८३ धावा केल्या आणि १४५ धावांनी विजय मिळवून पुढील फेरीत स्थान मिळवले. (वृत्तसंस्था)

**असे होणार उपांत्यपूर्व सामने**

१२ जानेवारी
**कर्नाटक विरुद्ध मुंबई**
१२ जानेवारी
**उत्तर प्रदेश विरुद्ध सौराष्ट्र**
१३ जानेवारी
**दिल्ली विरुद्ध विदर्भ**
१३ जानेवारी
**पंजाब विरुद्ध मध्य प्रदेश**

# मुंबई इंडियन्सला बंगळुरू, दिल्ली रोखणार?



### महिला प्रीमियर लीग क्रिकेट आजपासून

**मुंबई, ८ जानेवारी**

आपल्या पहिल्या एकदिवसीय विश्वचषक विजयाच्या वैभवात रमलेल्या भारताच्या उत्साही महिला क्रिकेटपटू शुक्रवारपासून नवी मुंबईत सुरू होणाऱ्या महिला प्रीमियर लीग २०२६ मध्ये स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये परतणार आहेत आणि या वर्षीच्या टी-२० विश्वचषकासाठीच्या तयारीची सुरुवात करणार आहेत.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील दोन वेळच्या विजेत्या आणि गतविजेत्या मुंबई इंडियन्सचा सामना, डी. वाय. पाटील स्टेडियमवर स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात, स्मृती मंधानाच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूशी (आरसीबी) होईल. , आरसीबी हा डब्ल्यूपीएलमधील एकमेव दुसरा विजेतेपद जिंकणारा संघ आहे.

महिला प्रीमियर लीगची चौथी आवृत्ती नवी मुंबई आणि वडोदा येथे दोन टप्प्यांत आयोजित केली जाणार आहे. त्यामुळे जगभरातील खेळाडूंना सर्वोत्तम खेळाडूंविरुद्ध खेळण्याची आणि इंग्लंडमध्ये जून-जुलैमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी आपली तयारी वाढवण्याची संधी मिळेल.

हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सकडे कागदावर सर्वोत्तम संघ आहे. यात इंग्लंड (नॅट सायव्हर-ब्रण्ट) आणि वेस्ट इंडीजच्या (हेली मॅथ्यूज) कर्णधारांचाही समावेश आहे.

आपल्या संघातील बहुतेक खेळाडूंना कायम ठेवल्यामुळे, न्यूझीलंडच्या अमेलिया केर, आशादायक ऑस्ट्रेलियन मिली इलिंगवर्थ आणि भारताच्या विश्वासार्ह अमनजोत कौर यांच्यामुळे मजबूत झालेल्या त्यांच्या जबरदस्त फलंदाजीमुळे मुंबई इंडियन्स हा हरवण्यासाठी सर्वात कठीण संघ असेल. जी. कमलिनी शीर्षस्थानी असल्याने, उपलब्ध प्रतिभेमुळे मुंबई इंडियन्स संघालाही खेळाडूंच्या निवडीची डोकेदुखी होऊ शकते.

शबनीम इस्माईल गोलंदाजी आक्रमणाचे नेतृत्व करेल, यात सायका इशाकचाही समावेश आहे. मेग लॅनिंग युपी वॉरियर्सकडे गेल्यामुळे भारतीय संघाची धडाकेबाज फलंदाज जेमिमाह रॉड्रिग्जने दिल्ली कॅपिटल्स संघाची धुरा सांभाळली आहे.

दिल्ली कॅपिटल्सकडे एक धोकादायक संघ आहे आणि जर सर्व काही जुळून आले, तर हा संघ विजेतेपद पटकावू शकतो.

भारतीय खेळाडूंमध्ये, दिल्ली संघात विश्वचषक विजेत्या व सध्या फॉर्मात असलेल्या सलामीवीर शेफाली वर्मा, स्नेह राणा आणि श्री चरणी यांचा समावेश आहे, तर देशांतर्गत प्रतिभेमध्ये निकी प्रसाद, भारतीय खेळाडू मिन्नू मणी व उजव्या हाताची वेगवान गोलंदाज नंदिनी शर्मा यांचा समावेश आहे. नंदिनी या संघामधील एकमेव भारतीय वेगवान गोलंदाज आहे.

ऑस्ट्रेलियाची फलंदाज जॉर्जिया वोल, अष्टपैलू ग्रेस हॅरिस आणि दक्षिण आफ्रिकेची झुंजार अष्टपैलू नादिन डी क्लर्क फलंदाजीची जबाबदारी सांभाळतील. यष्टिरक्षणामागे आरसीबीकडे स्फोटक ऋचा घोष आहे. भारताची अरुंधती रेड्डी, पूजा वस्त्रकार आणि इंग्लंडची लॉरेन बेल या आरसीबीच्या प्रमुख वेगवान गोलंदाजांपैकी आहेत, तसेच त्यांच्याकडे इंग्लंडची लिन्से स्मिथ, भारताची राधा यादव आणि श्रेयांका पाटील यांच्यासारख्या दर्जेदार फिरकी गोलंदाजही आहेत.

गुजरात जायण्ट्सने गत वर्षी प्लेऑफमध्ये स्थान मिळवले होते आणि यावर्षी ते आणखी चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करतील. परंतु ॲशले गार्डनरच्या नेतृत्वाखालील संघासाठी, परदेशी खेळाडूंनाच मोठी जबाबदारी उचलावी लागेल. (वृत्तसंस्था)

# हिंगणघाटच्या क्रीडा विश्वाचा विराट विक्रम

### विदर्भ १४ वर्षाखालील क्रिकेट संघाच्या उपकर्णधारपदी विराट भोयर

**हिंगणघाट, ८ जानेवारी**

विदर्भ क्रिकेट संघाच्या १४ वर्षाखालील क्रिकेट संघात हिंगणघाटचा खेळाडू विराट भोयर याची संघाचा उपकर्णधार म्हणून निवड झाली.

विराट येथील येथील गिमा टेक्समधील अधिकारी कैलास भोयर यांचा मुलगा असून तो सेंट जॉन विद्यालय येथे आठव्या वर्गात शिकत आहे. तो येथील पॅसीफिक क्रिकेट क्लबचा खेळाडू असून त्याचे प्रशिक्षक मन्नान आहेत. विराट वयाच्या सहाव्या वर्षापासून क्रिकेट खेळत आहे. विशेष म्हणजे वयाच्या पाचव्या वर्षापासून एनसीए क्रिकेट अकादमी नागपूर येथे पाच वर्ष जाणे- येणे करून सराव केला. विराटने दोन वेळा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.



यापूर्वी येथील चंद्रशेखर आत्राम याची १९ वर्षाखालील भारतीय संघात निवड झालेली होती. त्यावेळी त्या भारतीय संघातील चंद्रशेखर आत्राम याने अंतिम षटकातील शेवटल्या दोन चेंडूवर षट्कार व चौकार मारून भारतीय संघाला विजयश्री प्राप्त करून दिली होती. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी विराटची १४ वर्षाखालील संघात निवड झाली आहे. भारतीय क्रिकेट संघांचे माजी अध्यक्ष राजसिंग डुंगरपूर यांच्या नावाने खेळविल्या जाणाऱ्या चषकासाठी या संघात विराटची निवड झालेली असून या स्पर्धा १५ ते ३० जानेवारी दरम्यान इंदोर ( मध्यप्रदेश ) येथे होणार आहेत. (तभा वृत्तसेवा)

### मंद्रूपच्या शुभम कारंजेची विद्यापीठ कुस्ती संघात निवड

**मंद्रूप, दि. ८ जानेवारी-**

पंजाबमधील मोहाली येथील चंदीगड विद्यापीठात ५ ते ९ जानेवारीदरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धे साठी संतोष भीमराव पाटील महाविद्यालयातील बीएस्सी भाग दोनम धील शुभम कारंजे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संघात निवड झाली. त्याला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. एस. एस. तोरवी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेचे अध्यक्ष पी. एल. कोळी, उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे, सचिव एम. डी. कमळे, खजिनदार प्रा. व्ही. के. पाटील, सहसचिव प्रा. सुबोध कोळी, प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.



### श्रीकृष्ण मेटकरीला राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत रौप्य

**वेळापूर, दि. ८ जानेवारी-**

येथील इंग्लिश स्कूल वेळापूर व सुवर्ण संकल्प स्पोर्ट्स शूटिंग क्लबचा विद्यार्थी श्रीकृष्ण ज्योति बापू मेटकरी याने भोपाळ (मध्य प्रदेश) येथे सुरू असणाऱ्या शालेय राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात १० मी ओपन साइड रायफल प्रकारात रौप्य पदक पटकाविले. त्यास राष्ट्रीय प्रशिक्षक अक्षय राऊत, व सतीश कदम यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे आमदार उत्तमराव जानकर, माजी जि प सदस्य सतीशराव माने देशमुख, सरपंच रजनीश बनसोडे, माजी उपसरपंच शंकरराव काकूळे, जावेद मुलाणी, संस्था अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संचालिका डॉ. म िनाक्षी कदम, सचिवा डॉ. प्रियदर्शनी म हाडिक, तेजस्विनी कदम, शाळा समिती चेअरमन प्रतापराव पाटील, प्राचार्य आर . बी. पवार , उपमुख्याध्यापक पठान शिवशरण, पर्यवेक्षक बी एस सावळे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष अमोल मंडलिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप जगदाळे, उपाध्यक्ष प्रियंका पोरे, आदींनी अभिनंदन केले.





# विभागीय क्रीडा महोत्सवास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

इतर मागास बहुजन कल्याण सोलापूर अंतर्गत मध्य विभागीय क्रीडा महोत्सवास सुरवात झाली. याचे उद्घाटन सिंहगड इन्स्टिट्यूट कडेगांव येथे इतर मागास बहुजन कल्याण सोलापूर सहायक संचालक गणेश सोनटक्के यांच्या हस्ते झाले.यावेळी आश्रमशाळा तळेहिप्परगा शाळेचे सचिव दत्तात्रय गणेशकर, आश्रम शाळा पाकणीचे प्राचार्य दत्ता शिंदे, माध्यमिक आश्रमशाळा लांबोटीचे मुख्याध्यापक संदिप गायकवाड, मा सिंहगड इंजिनिअर कॉलेज सोलापूर प्राचार्य शंकर नवले, सिंहगड पब्लिक स्कूल केगावचे प्राचार्य साईन आदी उपस्थित होते

# बीच सॉकरमध्ये महाराष्ट्राची उपांत्य फेरीत मुसंडी

## दुसरी खेलो इंडिया बीच स्पर्धा : पेंचक सिलटमध्ये २ रौप्य





**दीव, दि. ८ जानेवारी-**

खेलो इंडिया बीच स्पर्धेतील पुरूषांच्या बीच सॉकरमध्ये अंदमान आणि निकोबारला हरवून म हाराष्ट्राने उपांत्य फेरी मुसंडी मारली आहे. पेंचक सिलटमधील रेगु प्रकारात महाराष्ट्राने २ रौप्य पदकाची कमाई करीत दिवस गाजविला.

दीवमधील घोघला समुद्र किनाऱ्यावर रंगलेल्या बीच बीच सॉकर मैदानात महाराष्ट्राच्या मुलांनी सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. अंदमान आणि निकोबारवर संघावर १४-५ गोलने दणदणीत विजय संपादन पदकासह उपांत्य फेरीतील प्रवेश निश्चित केला. कवीश दवणेसह सागर सिंगने तुफानी ३ गोल नोंदवून मैदान गाजवले. सिध्दार्थ कांबळे, साहिल डोंगरे, धवल तामोरे यांनी प्रत्येकी २ गोल तर मानस तामोरे, प्रतिक वापीलकर यांनी प्रत्येकी १ गोल करून महाराष्ट्राला दणदणीत विजय मिळवून दिला.

अंदमान आणि निकोबारवर विरूध्द महाराष्ट्राने सुरूवातपासून आक्रमक खेळाचे प्रदर्शन घडवित ४-१ गोलने आघाडी घेतली होती. दुसऱ्या व तिसऱ्या टप्यातही अचूक पासिंग करीत ५-५ गोल नोंदवून स्पर्धेतील सलग दुसऱ्या विजयाचर शिक्कामोर्तब केले. सलामीच्या लढतीत . महाराष्ट्राच्या पुरूष संघाने अरूणाचल प्रदेशला ६-३ गोलने पराभव केले होते. तिसरा साखळी सामना गोवा विरूध्द रंगणार आहे.

पेंचक सिलटमधील रेगु प्रकारात महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने रूपेरी यश संपादन केले. महिलांच्या सांघिक प्रकारात ओरीसाकडून ५८०-५७६ गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. महाराष्ट्राच्या जयश्री शेटे, क्रिनाशी येवले व अशिता यादवने रौप्य पदक मिळवले. पुरूषांच्या सांघिक प्रकारात तामिळनाडूने ६०६ गुण तर महाराष्ट्राने ५७५ गुण संपादून अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदके जिंकली. महाराष्ट्राकडून अंशुल कांबळे, अनुज सरनाईक व मुकेश चौधरीने रूपेरी यशावर नाव कोरले,

### खेलो इंडियाच्या संयोजनात मराठी पाऊलखुणा



सलग दुसऱ्या वर्षी दीवमध्ये खेलो इंडिया बीच स्पर्धेच्या संयोजनात मराठी पाऊलखुणा उमटल्या आहेत. परभणी येथील अक्षय कोटलवार या दीव व दमण शासनामधील युवा क्रीडा अधिकाऱ्याने खेलो इंडिया बीच स्पर्धेची संकल्पना यशस्वी करून दाखवली आहे. कोटलवार हे राष्ट्रीय टेबलटेनिसचे खेळाडू असून दीव येथे आल्यानंतर त्यांनी बीच स्पर्धेसाठी प्रत्यक्ष मैदानात उतरून साकर केली आहे. महाराष्ट्रसह संपूर्ण देशातून आलेल्या खेळाडूंना ते विशेष पाहुणचार देत असल्याने त्याचे कौतुक होत आहे. खेलो इंडिया बीच स्पर्धे नंतर आशियाई बीच स्पर्धा दीवमध्ये घेण्यासाठी कोटलवार यांचे ध्येय आहे.



# महाराष्ट्र शुटिंगबॉल संघात पाच खेळाडू; माळशिरसचा काझी सातव्यांदा कर्णधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी येथील ३ पुरुष व २ महिला संघाची महाराष्ट्र संघात निवड झाली. महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी माळशिरसच्या अमीर काझी यांची सातव्यांदा कर्णधारपदी निवड झाली आहे.

परभणी येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत सोलापूर संघाने प्रथम व महिला संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. या कामगिरीवर त्यांची निवड झाली. त्यांचा सत्कार समृद्धी स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष प्रा. राजू प्याटी व धाराशिवचे क्रीडाधिकारी गणेश पवार यांच्या हस्ते करण्यात आला. सर्व खेळाडूंचे असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत, उपाध्यक्ष अलीम शेख, सचिव फैज अहमद बेगमपूरे, रशीद बागवान, रफी दिवाण, श्रीनिवास कामुर्ती, सलीम करणकोट, इकबाल दलाल, तौसिफ बागवान, आमीर कुम ठे, प्रमोद कुरकुळळी, कलीम करणकोट, फरहान लालकोट यांनी अभिनंदन केले.

**निवडलेले खेळाडू : पुरुष-** आमीर काझी, शोएब बेगम, विनायक नाळे. **महिला-** अनम रंगरेज, नौशिन चांदा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## खत कंपनीच्या मालकाला खतात बुडवून शेतकरी मारतील : गायकवाड

**बार्शी, दि. ८ जानेवारी,**

टेंभुर्णी, (ता. माढा) येथील क्रेटा सुपर फॉस्फेट या दाणेदार चुकीच्या, बोगस व भेसळ युक्त दाणेदार खतामुळे बार्शी व माढा तालुक्यातील अनेक द्राक्ष व कांदा उत्पादक शेतकऱ्यांनीं वर्षभर प्रचंड खर्च करुन, हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेण्याचे काम झाले आहे. तयार झालेला कांदा व द्राक्ष बागा जळून खाक झालेल्या आहेत. या बागा पुन्हा या अवस्थेत येण्यासाठी तीन वर्षाच्या पुढील कालावधी लागणार आहे. शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपये नुकसान या चुकीच्या क्रेटा कंपनीच्या खतामुळे झालेले आहे. या खत कंपनीचे मालक टेंभुर्णी येथील येवले यांनी, मागील २५ दिवसांपासून होत असलेल्या माढा व बार्शी तालुक्यातील कापसी, यावली या भागातील शेतकऱ्यांचे शेतावर जाऊन शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड, स्वाभिमानीचे शरद भालेकर, समाधान भालेकर व जनहित शेतकरी संघटनेचे राज्य प्रवक्ते रामभाऊ काटे यांनी जळालेल्या कांदा उत्पादक व द्राक्ष बागांची पाहणी केली. यावेळी बोलताना शंकर गायकवाड म्हणाले की, २५ दिवस होत आले तरी अद्यापपर्यंत या शेतकऱ्यांचे शेकडो कोटींचे नुकसान होऊनही या शेतकऱ्यांना एक रुपयाची सुद्धा मदत या खत कंपनीने केलेली नाही. या क्रेटा कंपनीच्या मालकाने स्वतः शेतावरती जाऊन पाहणी करावी व तात्काळ या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अन्यथा लवकरच या कंपनीवर व त्या मालकाच्या घरावर आंदोलन करु. त्यावेळी वैतागलेले शेतकरी खत व औषध कंपनीच्या मालकाला खतात बुडवून मारतील, असा इशारा शेतकरी संघटनेचे राज्याध्यक्ष शंकर गायकवाड यांनी दिला. त्याचबरोबर कृषी आयुक्त पुणे आणि कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांनीही तात्काळ या गोष्टीकडे लक्ष देऊन या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यास भाग पाडावे अन्यथा त्यांच्याही घर व कार्यालयासमोर आंदोलने केली जातील, असाही इशारा गायकवाड यांनी दिला. त्यावेळी नुकसान झालेल्या बार्शी व माढा तालुक्यातील कापशी व यावली गावचे शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिवाजी पॉलीटेक्निकचे हिवाळी परीक्षेत घवघवीत यश

**सांगोला, दि. ८ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या अभियांत्रिकी पदविका हिवाळी परीक्षेत सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यामध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविकेचा निकाल ९५ टक्के, द्वितीय वर्षाचा ६७.४६ टक्के तर अंतिम वर्षाचा ८९.९१ टक्के लागला आहे. अंतिम वर्षातील अभियांत्रिकीचा यशराज देशमुख प्रथम, स्वप्नाली



दिवसे द्वितीय, शुभम माने तृतीय तसेच द्वितीय वर्षातील अभियांत्रिकी पदविकेच्या अमृता मिसाळ प्रथम, मृदुला पाटील द्वितीय, तेजस्विनी खांडेकर तृतीय व प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविकेच्या सबा इनामदार प्रथम, आरती गंगाधरे द्वितीय, आदित्य खटकाळे तृतीय क्रमांक मिळवला. बेसिक मॅथेमॅटिक्स या विषयात प्रणवी देशमुखे, आरती गंगाधरे, शुभम पवार, आदिती भोसले, मयुरी शिंदे, श्वेता गायकवाड, धनश्री माने, आरती सूर्यवंशी, मनिष भोसले, प्रणव नलवडे आणि ओंकार जाधव या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून कॉलेजचा नाव लौकिक वाढवला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, विश्वस्त मंडळ, प्राचार्य यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले विद्यार्थी

ज्योती सूर्यवंशी, गौरी मोरे, मयुरी शिंदे, सना इनामदार, मोहित शिंदे, आरती सूर्यवंशी, आदिती भोसले, धनश्री माने, सुरेशराजे इंगवले, संस्कार भोसले, शितल साळुंखे, अक्षदा आहेरकर, अक्षरा आहेरकर, श्वेता गायकवाड, स्नेहा जाधव, स्वरूप शिंदे, प्रणव नलवडे, नेहा लेंडवे, सुशांत व्हनमाने, साक्षी शेटे, सृष्टी काशीद, गौरी जाधव, तनुजा मोरे, कोमल बिले, संस्कृती दिवसे, ऋषिकेश शेंडगे, वैष्णवी भोसले, आदिती माने, साक्षी मेखले, अविनाश गव्हाणे, शुभम वलेकर, स्वप्नाली शिंदे, संचिता मेटकरी, तहुरा मुल्ला, गुरुप्रसाद कदम, मेहुल शिंदे, शाहिद मुजावर, गौरी काटे, प्रीती घाडगे, तनुजा मेटकरी, अपूर्वा झांबरे, श्रद्धा भाकरे, पूजा राजगे, रणजित देवकते, वैष्णवी गायकवाड, सौरभ खटकाळे, सर्वज्ञ पांडे, सानिका साळुंखे, सविता बिले, प्रणाली पाटील, गणेश चव्हाण, नम्रता खटकाळे, माधुरी खटकाळे, कार्तिक चव्हाण, गणेश कोरे, ऋतुजा चव्हाण, सानिका पवार, चारुशीला नरळे, शितल सावंत, आशुतोष कोडग

## निधन वृत्त...

### योगेश सोनलकर



**पंढरपूर, दि.८ जानेवारी -**

येथील योगेश अशोक सोनलकर (वय ४४) यांचे सांगली येथे बुधवारी (दि.७ ) दुपारी एक वाजता हृदयविकाराने निधन झाले. येथील वैकुंठ स्मशानभूमीत बुधवारी रात्री उशिरा त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, वडील, तीन भाऊ, पुतणे असा परिवार आहे. पंढरपूर येथील विवेक वर्धिनी विद्यालयातील माजी प्राध्यापक अशोक सोनलकर यांचे ते सर्वात लहान चिरंजीव होत. कोल्हापूर जिल्हा परिषदेत वरिष्ठ कार्यकारी अभियंता शैलेंद्र सोनलकर यांचे ते बंधू होते. ऑटोमोबाईल इंजिनिअर असलेले योगेश सोनलकर हे सांगली येथील एका नामांकित कंपनीत सेवा करीत होते.

# बार्शीत अवैध गर्भलिंग निदान रॅकेटचा पर्दाफाश; डॉक्टरच्या तक्रारीवरुन एकास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जानेवारी -**

पोलिसांनी बार्शी तालुक्यातील जामगाव शिवारात अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपाताचे रॅकेट उघडकीस आणले आहे. ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी ३६ वर्षीय अजित सुरेश मस्तूद या व्यक्तीला अटक केली असून त्याच्याकडून सोनोग्राफी मशीन, गर्भपाताच्या गोळ्या आणि इतर वैद्यकीय साहित्य जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई ७ जानेवारी दुपारी ४.४० वाजता करण्यात आली असून, प्रकरणात गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व रोग निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ च्या कलम ३(अ), १८ आणि २३ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

डॉ. शिंदे यांनी दिलेल्या जबाबानुसार, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांच्या सूचनेनुसार ते आणि त्यांचा बार्शी तालुका पोलीस स्टेशनमधील स्टाफ जामगाव शिवारातील वाणेवाडी रोडवरील एका पडीक शेतात पोहोचले असता. तेथे क्रेटा कंपनीची चारचाकी गाडी (एमएच ४५ एझेड २१६६) उभी असल्याचे दिसले. गाडीत दोन काळ्या रंगाच्या सॅकमध्ये संशयास्पद वस्तू सापडल्या. पंच तुषार गडदे आणि राज पेटाडे यांच्या साक्षीने तपासणी केली असता, झोनकेअर कंपनीची सोनोग्राफी मशीन (किंमत ३ लाख रुपये), चार्जर (३ हजार रुपये), गेस्टा प्रो कंपनीच्या १४४ सीलबंद गोळ्या ( मिफेप्रिस्टोन आणि मिसोप्रोस्टॉल असलेल्या), ५१ रिकाम्या गोळ्या, रक्ताळलेली क्युरेटेज, पॉज इंजेक्शन (५), सलाइन बाटल्या (आरएल २, एनएस ४, डीएनएस १), अँटीबायोटिक इंजेक्शन झोन, इकोकेअर जेल (२), ग्लोव्हज (२ बॉक्स नवे, २५ वापरलेले), डेटॉल बाटली, सिरिंज (२.५ एमएल बॉक्स, ५ एमएल ५, २ एमएल ४), स्कॅल्पवेन सुया (२२ क्र. ६, २१ क्र. २), कात्री, सलाइन पाईप, ओंडेम इंजेक्शन (३), चिकटपट्टी (२), कापूस बॉक्स आणि दोन काळ्या सॅक जप्त करण्यात आल्या. याशिवाय १५ लाख रुपयांची क्रेटा गाडी आणि ५० हजार रुपयांचा सॅमसंग एस२५ अल्ट्रा मोबाइलही हस्तगत करण्यात आला.

अजित मस्तूद हा रोपळे (ता. माढा, जि. सोलापूर) येथील रहिवासी असून, त्याने चौकशीत स्वतः अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपात करत असल्याचे कबूल केले. त्याच्याकडे कोणताही वैध परवाना नव्हता. डॉ. शिंदे यांनी सांगितले की, या आरोपीने यापूर्वीही अनेक महिलांचे गर्भलिंग निदान करुन गर्भपात केले असण्याची शक्यता आहे. पोलिसांनी सर्व वस्तू सीलबंद करुन जप्त केल्या असून, उपअधीक्षक अशोक सायकर यांच्या नेतृत्वात तपास सुरु आहे. या प्रकरणाने ग्रामीण भागातील अवैध वैद्यकीय प्रक्रियांच्या धोक्याकडे लक्ष वेधले आहे. पोलिसांनी या रॅकेटशी संबंधित इतर व्यक्तींचा शोध घेण्याचे संकेत दिले आहेत.

## मुलीने लग्नास नकार दिल्याच्या रागातून आई,आजीला कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि ८ जानेवारी -**

मुलीच्या लग्नासाठी दाखवलेल्या फोटोवर तिने कोणताही प्रतिसाद न दिल्याच्या रागातून पित्याने अमानुष मारहाण केल्याची तसेच मुलीला वाचविण्यासाठी मध्ये पडलेल्या आई व आजीलाही कुऱ्हाडीच्या लाकडी दांड्याने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना बार्शी तालुक्यातील शेलगाव (मा.) येथे घडली आहे.

या प्रकरणी पीडित विवाहिता शमा फिरोज शेख (वय ३५, रा. शेलगाव मा., ता. बार्शी) यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून त्यावरुन पती फिरोज खाजा शेख, सासू लैला खाजा शेख आणि सासरे खाजा वजीर शेख (सर्व रा. शेलगाव मा.) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शमा शेख व फिरोज शेख यांचा २००९ साली आंतरजातीय विवाह झाला असून त्यांना पाच मुले आहेत. मंगळवारी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास फिरोज शेख यांनी मोठी मुलगी सानिया हिच्या विवाहासाठी मोबाईलमध्ये एका तरुणाचा फोटो दाखवला. मात्र मुलीने त्या फोटोवर 'हो' किंवा 'नाही' असे कोणतेही उत्तर न देता मौन पाळले. याच कारणावरुन संतप्त झालेल्या फिरोज यांनी मुलीला हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. हे पाहून शमा शेख या मध्ये पडल्या असता, सासू-सासऱ्यांनी 'मुलीच्या लग्नाला नकार का देतेस?' असे म्हणत त्यांना पकडून ठेवले. सासूने केस ओढले, तर सासऱ्यांनी हात धरुन ठेवला. याच वेळी पती फिरोज याने कुऱ्हाडीच्या लाकडी दांड्याने शमा यांच्या उजव्या हाताच्या दंडावर, मनगटावर व पाठीवर जोरदार वार करत गंभीर मारहाण केली. यानंतर शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकीही देण्यात आली.

जखमी शमा शेख यांनी बार्शी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## रस्ता महाराष्ट्रातच आहे का? प्रवाशांना प्रश्न

### करमाळा-जामखेड रस्त्याची प्रचंड दुरवस्था; दररोज होताहेत अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.८ जानेवारी-**

करमाळा-जामखेड रस्त्याची आळजापूरपर्यंत अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्याने वाहने घेऊन जाणे अवघड झाले आहे. परिणामतः रोज एक अपघात घडत आहे. त्यामुळे हा रस्ता महाराष्ट्रातच आहे का असा प्रश्न या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यांना पडत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असल्याची तक्रार राष्ट्रीय समाज पक्षाचे तालुकाध्यक्ष अंगद देवकाते यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे. या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अनेक वाहनांचे नुकसान होत आहे हा प्रश्न सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ सोडवावा व रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी करण्यात येत आहे.



करमाळा-जामखेड रस्ता हा आळजापूर पर्यंत अत्यंत खराब झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देऊन ही काम पूर्ण होत नाही.येथे रोज अपघात व वाहनांचे प्रचंड नुकसान होत आहे. सध्या आम्ही लोकसहभागातून खड्डे बुजवत आहोत.

**- अंगद देवकते, रासप तालुकाध्यक्ष, करमाळा.**

पुराच्या पाण्यामुळे रस्ता खराब झालेला आहे. सदर रस्त्याची दुरवस्था मान्य आहे. मात्र आचारसंहितेमुळे टेंडर निघत नव्हते. उद्या यंत्रणा पाठवून रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेत आहोत.

**-अभिषेक पवार**, उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, करमाळा.

## प्राथमिक गटात महर्षी प्रशाला शंकरनगर प्रथम

### अकलूज येथे लेझीम स्पर्धेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ जानेवारी-**

अकलूज येथे संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विसाव्या भव्य लेझीम स्पर्धेला दिमाखात प्रारंभ झाला. स्पर्धेतील प्राथमिक गटात महर्षी प्रशाला प्राथमिक विभाग शंकरनगर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक विभागाने द्वितीय व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्राथमिक विद्यालय मांडवे यांनी तृतीय क्रमांक संपादिला.

विजय चौक अकलूज येथे या स्पर्धेचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील व अकलूजचे नूतन नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील यांचे हस्ते झाले. मैदान पूजन नगराध्यक्षा रेश्मा अडगळे यांच्या हस्ते झाले. या वेळी दिपकराव खराडे पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव माने देशमुख, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव



अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेव अंधारे, कारखान्याचे संचालक लक्ष्मण शिंदे, गोविंद पवार, रामचंद्र ठवरे, बाळासाहेब देशमुख, शि.प्र.मंडळाचे संचालक सुभाष दळवी, नारायण फुले, वसंत जाधव, बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे, निशा गिरमे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात सचिव संजय राऊत म्हणाले, सहकार महर्षी शंकरराव म ोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त या स्पर्धेचे आयोजन केले आहे. ग्रामीण खेळ,व कलेचे जतन व संवर्धन करणारे जयसिंह मोहिते पाटील व मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळांने आजपर्यंत ७० हजार पेक्षा अधिक लेझीम खेळाडू, प्रशिक्षक निर्माण केले आहेत.

ग्रीनिज वर्ल्ड बुक मध्येही अकलूजच्या लेझीम खेळाची नोंद झाली आहे. या स्पर्धेत प्राथमिकचे ५, मुलांचे ३१ व मुलींचे २२ असे एकूण ५८ संघांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेचा प्रारंभ सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्राथमिक संघाने खेळ सादर करुन झाला. सुत्रसंचलन किरण सूर्यवंशी व विशाल दळवी यांनी केले.




## विद्यार्थ्यांनी समाजसेवेत सहभाग घ्यावा : प्राचार्य डॉ. शेख

### उपळाई (ठों) येथे रासेयो शिबिराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जानेवारी -**

ग्रामीण भागातील समस्यांची माहिती घेऊन विद्यार्थ्यांनी समाजसेवेत सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने उपळाई (ठों) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. दिपक गुंड, सरपंच मधुकर वैद्य, ग्रामविकास अधिकार दत्तात्रय दराडे, माजी उपसपंच विजय ठोंगे, कृषी अधिकारी सुरेश मोरे, नाबार्ड अधिकारी अंबऋशी लोकरे, मुख्याध्यापक अनिल काळे, मुख्याध्यापक पांडुरंग कांबळे, मुख्याध्यापक सुहास वाघमारे, डॉ. श्रीराम वैद्य, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज चिकराम, प्रा. निकीता घोडके आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. गुंड यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्वाचा विकास होतो. तसेच गावकऱ्यांच्या अनेक समस्या लक्षात घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करता येतात असे प्रतिपादन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आसावरी फरताडे यांनी सूत्रसंचालन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. समाधान लोंढे यांनी आभार मानले.

## जि.प. शाळा मुंडफणेवस्ती शाळेस ब्रिमासागर कारखान्याच्यावतीने संगणक भेट

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ८ जानेवारी-**

महाळुंग (ता. माळशिरस) येथील जिल्हा परिषद मुंडफणेवस्ती शाळेस ब्रिमासागर महाराष्ट्र डिस्टलरीज लिमिटेड, श्रीपूर यांचे वतीने कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर भरतकुमार सेठिया यांच्या हस्ते संगणक भेट देण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक वाघ, शिक्षक मुलाणी, सहकार महर्षी कारखान्याचे संचालक व नगरसेवक नानासाहेब मुंडफणे, कारखान्याचे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर, डेप्युटी मॅनेजर चंद्रकांत भागवत, संगणक तज्ञ योगेश जोशी उपस्थित होते.

लहान वयातच संगणकाचे प्राथमिक ज्ञान मिळाल्यास विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढेल असे यावेळी श्री.सेठिया यांनी सांगितले. त्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणेच संधी मिळावी, या भावनेतून ब्रिमासागर कारखान्याच्या वतीने ही छोटीशी मदत देत असल्याचे ते म्हणाले. तर नानासाहेब मुंडकणे यांनी ब्रिमा सागर कंपनीच्या सामाजीक उपक्रमाचे आभार मानले .



# प्रा. शिक्षक विशाल रेपाळ यांच्या गणित शाळेची राज्यस्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.८ जानेवारी-**

दिनांक ५ व ६ जानेवारी रोजी स्वेरी कॉलेज गोपाळपूर येथे ५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले.या प्रदर्शनात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अलंकापुरी,करकंब येथील प्राथमिक शिक्षक विशाल रेपाळ यांनी शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेत प्राथमिक शिक्षक गटातून पंढरपूर तालुक्याचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी तयार केलेल्या 'माझी गणित शाळा' या साहित्यास जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळाल्याने त्यांची नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाकरिता निवड झाली आहे.

घोकमपट्टीपेक्षा प्रत्यक्ष पाहण्यातून,




गतवर्षीही प्राथमिक शिक्षक विशाल रेपाळ यांच्या बहुउद्देशीय विदूषक या साहित्याची राज्यस्तरावर निवड झाली होती.पाचव्यांदा त्यांच्या साहित्याची राज्यस्तरावर निवड झाली आहे.नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात ते सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

कृतीतून घेतलेले ज्ञान हे चिरंतन टिकते. हा विचार समोर ठेवून विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या अडचणी व त्यांची आवड लक्षात घेऊन त्यांना कृतीतून समजण्यास सोपे जाईल अशा विविध संकल्पना या गणित शाळेत आहेत. इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना अवघड वाटणारे गणिताचे सर्व संबोध,संकल्पना,स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या क्लृप्त्या विद्यार्थ्यांना हसत,खेळत मनोरंजक पद्धतीने अधिक सोपे करून शिक्षकांना शिकवता येईल व सर्व विद्यार्थ्यांनाही आनंदाने शिकता येईल असे विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य या एकाचं साहित्यात पाहायला मिळते.त्यामुळे बाहेरून प्रदर्शन पाहायला आलेले आणि सहभागी असलेले सर्व विद्यार्थी व शिक्षकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ही गणित शाळा ठरली. एवढेच नव्हे तर परीक्षकांनासुद्धा या शैक्षणिक साहित्याने भुरळ घातली.जादुई पेटार्याप्रमाणे एकात एक असलेल्या नाविन्यपूर्ण संकल्पना तितक्याच कल्पकतेने, सृजनशीलतेने, कलात्मकपणे मांडल्यामुळे सर्व संकल्पना उत्साहात,प्रश्न उत्तरांची देवाण-घेवाण करत परीक्षकांनी बारकाईने परीक्षण केले आणि राज्यस्तराकरीता निवड केली.प्रदर्शनातील या यशाबद्दल सोलापूर जिल्ह्याचे माध्यमिक उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन शिक्षक विशाल रेपाळ यांचा सन्मान करण्यात आला. पंढरपूर तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी मारुती लिगाडे,जिल्हा विज्ञान मंडळाचे पदाधिकारी पेहे केंद्राचे केंद्रप्रमुख दशरथ मोरे,करकंब केंद्र तसेच तालुक्यातील शिक्षकांनी त्यांचे कौतुक करून अभिनंदन करून राज्यस्तरीय प्रदर्शनाकरिता शुभेच्छा दिल्या.

# ‘वंचित’चे अर्धे उमेदवार भीतीपोटी अर्ज भरायला आले नाहीत

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा आरोप

## बिनविरोधसाठी सुशीलकुमार शिंदेंनीही केले होते प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

भाजपकडून दबावाचे, धमक्याचे राजकारण सुरु आहे. महाराष्ट्र राज्य ‘बिहार’च्या दिशेने चालला आहे. आता मारण्यापर्यंत ते विकत घेण्यापर्यंत प्रकार सुरु आहेत. वंचित बहुजन आघाडीचे अर्धे उमेदवार हे ‘भीती’पोटी अर्ज भरायला आले नाहीत, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सोलापुरात आले असता ते पुढे म्हणाले की, तत्व सोडून, विचार सोडून अभद्र युती बघायला मिळत आहेत. अनैतिकतेने वागणाऱ्यांना मतदारांनी सत्तेपासून दूर केले पाहिजे. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही सोलापुरातील त्यांच्या एका निवडणुकीत बिनविरोध निवडून येण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र, पक्षाचे उमेदवार मल्लप्पा शिंदे हे टिकून राहिले होते. राज्यात अभद्र युती पाहायला मिळेल, असे मी यापुर्वीच सांगितलो होतो. यंदाच्या या निवडणुकीत भाजपा व एमआयएम, भाजपा व काँग्रेस यांच्यात



झालेल्या युतीवरुन आपले भाकीत खरे ठरल्याचे स्पष्ट होते. अभद्र युती प्रकरणी काँग्रेसने कारवाई केली मात्र २४ तास उलटूनही भाजपाने कारवाई केली नसल्याचे दिसून येते. राजकारणात पक्ष, विचार यापेक्षा सत्ता आणि त्यातून मिळणारे टेंडर महत्वाचे झाले आहे.

सन २०१४ पासून आम्हाला दूर ठेवणाऱ्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांची अवस्था भाजपा सांगेल तसे नाचण्यासारखी स्थिती झाली आहे. त्या सगळ्यांची रिपाइं झालेली आहे, अशी टीका ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना केली. यावेळी सोमनाथ साळुंखे, अरुण जाधव, डॉ.नितीन ढेपे, चंद्रशेखर मडिखांबे, महेश जाधव, आतिश बनसोडे आदी उपस्थित होते.

### ड्रग्ज प्रकरणी मोदी, शहा यांनी खुलासा करावा

‘मनसे’चे नेते राज ठाकरे यांनी ड्रग्ज प्रकरणी केलेल्या विधानासंदर्भात विचारले असता ॲड.प्रकाश आंबेडकर म्हणाले, केंद्रीय गृहमंत्र्यांच्या देखरेखीखाली हा विभाग असताना असे घडले कसे? याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी खुलासा करावा, असे आवाहनही डॉ.आंबेडकर यांनी केले.

### दोन्ही पवारांनी भाजपला उल्लू बनवले

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोघेही वेगळे नाहीत. ते एकत्र आहेत. त्यांनी मिळून भाजपाला उल्लू बनविले आहे. दोघांचीही चौकशी थांबविण्यासाठी त्यांनी तसं केले. आतापर्यंत त्यांची केस भाजपाने दाबून का ठेवली? याचे उत्तर भाजपाने दिले पाहिजे, असेही ॲड.आंबेडकर यांनी सांगितले.

### कुणाच्या रक्तात किती भाजप आहे? ते लवकरच दिसेल



सोलापुरात युवा नेते सुजात आंबेडकर यांनी काँग्रेसच्या खा.प्रणिती शिंदे यांच्यावर आरोप केला. त्यानंतर खा.प्रणिती शिंदे यांनी माझ्या रक्तात काँग्रेस आहे, असे म्हटले आहे. यासंदर्भात बोलताना ॲड.आंबेडकर म्हणाले, कोणाच्या रक्तात किती भाजप आहे? ते लवकरच दिसेल? दूध का दूध पाणी का पाणी बघायला मिळेल.



सोलापूर : सोलापूरचे ग्रामदैवत सिध्देश्वर यात्रेतील मानकरी यांच्या घरी दिवा प्रज्वलित करुन यात्रेला प्रारंभ करण्यात आला. धुम्मा कुटुंबीय व मुस्तारे कुटुंबीय यांच्या घरी टिपलेले छायाचित्र.


# मतदानासाठी कामगारांना पगारी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत मिळणार

**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

जिल्ह्यातील खाजगी आस्थापना चालकांनी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६ करिता मतदारांना १५ जानेवारी २०२६ रोजी मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याचे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त अति. मंगेश झोले यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना, मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहिल. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादीच्या मालकांनी / व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी.

## महत्वाचे...



### मानकरी सिध्देश थोबडे यांच्या वाड्यात दिवे प्रज्ज्वलित

**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

ग्रामदैवत सिध्दरामेश्वर यात्रेतील प्रमुख मानकरी सिध्देश महेश उर्फ मुन्ना थोबडेंच्या उत्तर कसबा येथील थोबडे वाड्यात सिध्देश थोबडे व सुप्रिया सिध्देश थोबडे यांनी ग्रामदैवत सिद्धरामेश्वरांच्या प्रतिमेचे विधिवत पुजन करुन दिवे प्रज्वलित केले. आजपासून पाच दिवस हे दिवे प्रज्वलित करण्यात येतात. ही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असल्याची माहिती सिध्देश थोबडे यांनी दिली आहे.



### सोशल उर्दू हायस्कूलच्या मुख्याध्यापकपदी रसूल चौधरी

**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

सोलापूर सोशल असोसिएशन उर्दू हायस्कूलमधील ज्येष्ठ शिक्षक रसूल चौधरी यांची मुख्याध्यापकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रभारी मुख्याध्यापक रिजवान शेख यांनी रसुल चौधरी यांच्याकडे पदभार सोपविला. संस्थेचे अध्यक्ष डॉ.अखलाक अहमद वडवान यांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे विश्वस्त दाऊद मंगलगिरी, अशपाक अहमद सातखेड, प्रायमरीचे मुख्याध्यापक डॉ.आसिफ इक्बाल, उपमुख्यद्यापक इम्तियाज शाब्दि, पर्यवेक्षक अल्ताफ कुमठे, परिवेक्षिका यास्मिन खैरदी, संचालक सरफराज पठाण आदी उपस्थित होते.



### तीन सोसायट्यांतील मतदारांचा महापालिका निवडणुक मतदानावर बहिष्कार; आयुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

गणेश बिल्डर्स स्कीम नंबर ३, अमोल नगर व लोखंडवाला पार्क येथील समस्त नागरिकांनी महानगरपालिका निवडणूकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी आज महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांना दिले. गेले ३० वर्षे रस्ता व ड्रेनेज लाईन, पाण्याची पाईपलाईन यासाठी येथील नागरिकांची मागणी आहे. सोलापूर महापालिका आयुक्त, नगररचना अधिकारी, आमदार, खासदारांना वारंवार भेटून देखील कोणीही दखल घेत नाहीत. नगर रचना अधिकाऱ्यांनी येथे येऊन स्वतः पाहणी देखील केली आहे. परंतु अद्याप रस्ता व ड्रेनेज लाईन झालेली नाही. त्यामुळे येथील नागरिकांनी यंदाच्या १५ जानेवारीला होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचे ठरविले असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. यावेळी आयुक्तांनी नगररचना विभागातील अधिकाऱ्यांना त्वरीत कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. निवेदन देताना अध्यक्षा ॲड. नीता जोशी, गोपाळ कुलकर्णी, सुनिल जमदाडे, नंदू जोशी, अमोल राठोड, चंद्रकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते.



# उमेदवारांच्या ‘निवडणूक खर्च’ बँक स्टेटमेंटची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणूकच्या अनुषंगाने निवडणूक खर्च समितीच्या वतीने इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय येथे उमेदवार खर्चाची प्रथम तपासणी व ताळमेळ सत्र यशस्वीरित्या पार पडले. उमेदवारांनी आतापर्यंत केलेल्या निवडणूक खर्चाचा तपशील व संबंधित बँक स्टेटमेंटची तपासणी करण्यात आली.

मुख्य लेखाधिकारी तथा नोडल अधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर आणि सहनोडल अधिकारी सदानंद वाघमोडे यांनी उमेदवारांना खर्च नोंदवही भरण्याची पध्दत, खर्चाचे वर्गीकरण, पावत्या व बिलांचे जतन, बँक स्टेटमेंटचा ताळमेळ आणि खर्च मर्यादेचे पालन याबाबत मार्गदर्शन केले. खर्च वेळेत व अचूक सादर न केल्यास कारवाई होऊ शकते, असेही सांगण्यात आले.

विविध प्रभागांतील उमेदवार व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक उमेदवाराने खर्चाची स्वतंत्र नोंद ठेवणे, नोंदवही अद्ययावत ठेवणे आणि सर्व खर्च अधिकृत बँक खात्यातूनच करणे बंधनकारक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. निवडणूक खर्च समितीच्या वतीने दुसरा तपासणी कॅम्प दि. १२ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी जयंत क्षीरसागर, अमर काळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# आ.कोठे, आ.कल्याणशेट्टी जोडीने जिंकली नागरिकांची मने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

रस्ते, ड्रेनेज, पाणी अशा विकासकामांसाठी प्रभाग क्रमांक ११ मध्ये १२ कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. भविष्यातही प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी भरघोस निधी आणण्यात येईल; या आमदार देवेंद्र कोठे व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या जोडीने दिलेल्या अभिवचनाने नागरिकांची मने जिंकली.

प्रभाग क्रमांक ११ मधील राजीव नगर येथे नागरिकांच्या प्रचंड प्रतिसादात सभा झाली. व्यासपीठावर आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, गुरुशांत धुत्तरगावकर, उमेदवार युवराज सरवदे, शारदाबाई रामपुरे, मीनाक्षी कडगंची, अजय पोन्नम, राजकुमार हंचाटे, प्रकाश म्हंता, गणेश चवरे उपस्थित होते.

आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी कन्नड भाषेतून नागरिकांशी संवाद साधताना म्हणाले, आमदार देवेंद्र कोठे यांनी प्रभाग क्रमांक ११ सह शहर मध्य मतदारसंघात मोठा विकास केला आहे. सोलापुरासाठी विमानसेवा, आयटी पार्क, समांतर जलवाहिनी, समतोल पाणीपुरवठ्यासाठी ८९२ कोटी रुपयांची योजना यांसारखी विकासकामे झाली आहेत.

आ.देवेंद्र कोठे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे शहर मध्य विधानसभा मतदारसंघात १४७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. काँग्रेसच्या तत्कालीन आमदार प्रणिती शिंदे यांच्या १५ वर्षांच्या कार्यकाळात देखील इतका निधी मिळाला नाही. प्रभाग क्रमांक ११ मध्ये ९० लाख रुपयांचा तरी निधी दिला आहे का?

प्रभाग क्रमांक ११ मधील सभेला प्रचंड प्रतिसाद



### अंगणातील तुळस, देवळावरील कळस सुरक्षित

एमआयएम सारख्या पक्षाला डोक्यावर बसवून घेणे आपल्याला परवडणारे नाही. त्यामुळे मतदारांनी भाजपच्या चारही उमेदवारांना प्रचंड मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे. आपण संघटित झालो तर अंगणातील तुळस आणि देवळावरील कळस सुरक्षित राहणार आहे, असे सांगायलाही आमदार देवेंद्र कोठे हे विसरले नाहीत.

### लाडक्या बहिणींना २१०० रु. देण्याची मागणी

लाडकी बहीण योजना बंद होईल, असा खोटा प्रचार काँग्रेससह विरोधकांकडून केला जात होता. परंतु ही योजना भविष्यातही सुरु राहणार आहे. सोलापूर महानगरपालिकेवर सत्ता आल्यानंतर लाडक्या बहिणींना १ हजार ५०० ऐवजी २ हजार १०० करण्याची मागणी करण्यात येणार आहे, असेही आ.देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

## अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने

# कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शाहू महाराजांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ जानेवारी-**

कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज यांच्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या वतीने महाराजांचा सन्मान करण्यात आला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ पालखी पादुका परिक्रमाचे मुख्य संयोजक व विश्वस्त संतोष भोसले यांच्या हस्ते कोल्हापूर पॅलेस येथे हा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी भ्रमणध्वनीवरून मानाचा मुजरा करुन, अभीष्टचिंतन केले.



# वाहन विक्री संदर्भात हस्तांतरणाची प्रक्रिया मुदतीत करणे अनिवार्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**



मोटार वाहन कायद्यानुसार वाहन विक्री केल्यानंतर ठराविक मुदतीत त्याची मालकी बदलणे कायदेशीररित्या अनिवार्य आहे.

अनेकदा वाहन विकल्यानंतरही नवीन मालकाच्या नावावर हस्तांतरण केले जात नाही, ज्यामुळे जुन्या मालकावर कायदेशीर आणि आर्थिक अडचणी येऊ शकतात. यामुळे जिल्ह्यातील वाहन खरेदी-विक्री करणाऱ्या नागरिकांनी कायदेशीर गुंतागुंत टाळण्यासाठी त्वरित मालकी हक्क हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. हस्तांतरणाची मुदतः वाहन विक्री केल्यापासून ३० दिवसांच्या आत आणि इतर राज्यात विक्री झाल्यास ४५ दिवसांच्या आत संबंधित आरटीओ कार्यालयात अर्ज करणे आवश्यक आहे.

# श्री सिध्देश्वर यात्रेच्या बैठकीस महापालिका अधिकाऱ्यांची दांडी

## जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी व्यक्त केली नाराजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर यात्रा दि.१२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत भरणार आहे. या यात्रेच्या तयारीच्या अनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत गुरुवार, ८ जानेवारी रोजी बोलाविण्यात आलेल्या बैठकीस महापालिका अधिकाऱ्यांनी दांडी मारली होती. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नाराजी व्यक्त केली.

श्री सिध्देश्वर यात्रेत होणारी गर्दी लक्षात घेता करावयाच्या उपाययोजना आणि यात्रा निर्विघ्नपणे पार पाडण्याकामी घ्यावयाची दक्षता आदींविषयी चर्चा करुन निर्णय घेण्याच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन भवन येथे बैठक बोलाविण्यात आली होती. मात्र दुपारी ३.३० वाजेपर्यंत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, नगर अभियंता यापैकी एकही अधिकारी आलेले नव्हते.

महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करत आजची बैठक रहित करण्यात येत असल्याचे जाहीर केले. दरम्यान, याबाबतचा अहवाल राज्याचे मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव गृह विभाग आणि संचालक, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना पाठवण्याबाबतचे निर्देश दिले.



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

दि.६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास पिकअप वाहन क्र. एमएच २५ एजे ०१२५ मधून गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करत असल्याची कारवाई बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली.

सदर वाहनामधून गोवंशीय जातीचे तीन खोंड व एक गाय (अंदाजे किंमत ६५,००० रुपये) यांची कोणतीही चारा-पाण्याची व्यवस्था न करता, निर्दयतेने कत्तलीसाठी वाहतूक करण्यात येत असल्याचे आढळून आले. बेंबळी पोलिसांना ही बाब निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ कारवाई केली. या प्रकरणी सरकारतर्फे संबंधित व्यक्तींविरुद्ध प्राण्यास क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ (१) (डी), ११ (१) (ई), ११ (१) (के) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.





## संक्षिप्त वृत्त...



### लोकमंगल मल्टिस्टेटकडून दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान

**अणदूर, दि.८ जानेवारी -**

लोकमंगल मल्टिस्टेट ही संस्था केवळ आर्थिक हित जपत नसून समाजाचे आपल्यावर काहीतरी देणे लागते या भावनेतून सातत्याने सामाजिक उपक्रम राबवत आहे. लोकशाहीचा चौथा खांब असलेल्या पत्रकारांचा सन्मान करणे ही समाजाभिमुख भूमिका असून, अशा उपक्रमाबद्दल लोकमंगल मल्टिस्टेटचे कौतुक करावे तेवढे कमी आहे, असे प्रतिपादन महादेवप्पा नरे यांनी केले. ते अणदूर येथे लोकमंगल मल्टिस्टेटच्या वतीने दर्पण दिनानिमित्त आयोजित पत्रकार सन्मान सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमास लोकमंगलचे रिजनल अधिकारी रतन सुरवसे, शाखाधिकारी प्रशांत जाधव, रोखपाल गुंडया स्वामी, शीला माळी, ऋषिकेश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पत्रकार राजकुमार स्वामी व शिवशंकर तिरगुळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात राजकुमार स्वामी, अजय अणदूरकर, चंद्रकांत हगलगुंडे, चंद्रकांत गुड्डु, दयानंद काळुंके, शिवशंकर तिरगुळे, संजीव आलुरे, लक्ष्मण दुपारगुडे, सचिन तोगी, राहुल कांबळे, किरण कांबळे, विजय राठोड अशा एकूण १२ पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.



### नगरपरिषदेत पत्रकार दिन साजरा, पत्रकारांचा गौरव

**परंडा, दि.८ जानेवारी -**

लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारितेचा आणि समाजाचे प्रश्न निर्भीडपणे मांडणाऱ्या पत्रकारांचा गौरव करण्याच्या उद्देशाने दि.६ जानेवारी रोजी परंडा नगरपरिषद कार्यालयात पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात लोकनियुक्त नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांच्या हस्ते दैनिक तरुण भारतचे तालुका प्रतिनिधी आप्पासाहेब शिंदे यांच्यासह परंडा शहरातील पत्रकारांना सन्मानित करून त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमास प्रामुख्याने वाजिदभाई दखनी, नगरसेवक बच्चन गायकवाड, माजी नगरसेवक रत्नकांत शिंदे, इरफान शेख, बब्बू जिनेरी, अमजद मुजावर, राजकुमार माने, मदन दीक्षित, दिलीप रणभोर, खय्युम तुटके, दत्ता महाराज रणभोर, ड. संदीप शेळके, तनवीर मुजावर, कदीर जिनेरी, वामन शिंदे यांच्यासह शिवसेना (शिंदे गट) चे पदाधिकारी, नगरपरिषदेचे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

# दिर-भावजयीच्या अनैतिक संबंधात अडसर ठरलेल्या १३ वर्षीय मुलाची कुऱ्हाडीने हत्या

### तुळजापूर तालुक्यात धक्कादायक घटना...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी साठवण तलावाजवळ ५ जानेवारी २०२६ रोजी एका १३ वर्षीय मुलाचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दिर-भावजयीच्या अनैतिक संबंधात अडसर ठरत असल्याने मुलाचा कुऱ्हाडीने घाव घालून खून करून मृतदेह तलावाजवळील गवताखाली फेकून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०४/२०२६ अन्वये भा.न्या.सं. कलम १०३ (१) अंतर्गत दि.६ जानेवारी २०२६ रोजी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गालगत तामलवाडी शिवारात कदम यांची शेती असून ती दत्ता कोरे हा बटईने करत होता. याच ठिकाणी उमरगा तालुक्यातील कोळसुर येथील ओमकार देवीदास कांबळे हा आपल्या भावजयी ज्योती कांबळे हिला घेऊन सालगडी म्हणून काम करत होता. ज्योती कांबळे यांचा १३ वर्षांचा मुलगा कृष्णा सदानंद कांबळे हा कधी वडिलांकडे तर कधी आईकडे राहत होता. कृष्णा याला आई व चुलत्यामधील अनैतिक संबंधांची माहिती असून तो ही बाब वडील सदानंद कांबळे यांना सांगत असल्याने आरोपी ओमकार कांबळे याला राग आला. त्यामुळे कृष्णा हा त्यांच्या संबंधात अडसर ठरत होता. १ जानेवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास विद्युत पंपाचा पाईप बसवण्याच्या बहाण्याने ओमकार कांबळे याने कृष्णा याला तामलवाडी साठवण तलावात नेले. तेथे त्याने कुऱ्हाडीने घाव घालून कृष्णा याची हत्या केली व मृतदेह गवतामध्ये फेकून देऊन तो फरार झाला. तामलवाडी पोलिसांनी प्रथम अकस्मात मृत्यू क्रमांक ०२/२०२६ भा.न्या.प्र.सं. कलम १९४ अन्वये नोंद करून मृताची ओळख पटवली. त्यानंतर गुन्हा दाखल करून गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी ओमकार देवीदास कांबळे याला उमरगा तालुक्यातील कोळसुर गावातून ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

ही कारवाई सपोनि. गोकुळ ठाकुर, पोहवा. जुबेर काझी, दिनकर तोगे, सुरज नरवडे, उमेश माने, नजीर बागवान, तुराब शेख, हनमंत कोरे, नितीन भोसले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



### आरोपीला उमरग्यातून अटक



## पत्रकार दिनानिमित्त परवेज मुल्ला यांना 'आदर्श दर्पण सेवा गौरव २०२६' पुरस्कार जाहीर




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.८ जानेवारी -**

६ जानेवारी हा आचार्य बाळकृष्ण जांभेकर यांची जयंती तसेच दर्पण दिन - पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने कळंब येथील सेवा पुरस्कार समितीच्या वतीने दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व अध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय व जबाबदार वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना आदर्श दर्पण पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

यावर्षी आदर्श दर्पण सेवा गौरव २०२६ पुरस्कार परवेज कलीमोद्दीन मुल्ला (दैनिक तरुण भारत, कळंब तालुका प्रतिनिधी) यांना जाहीर करण्यात आला आहे. सदर पुरस्काराचे वितरण मान्यवर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते लवकरच होणार असून कार्यक्रमाची सविस्तर माहिती पुढील काळात जाहीर करण्यात येणार आहे.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सेवा पुरस्कार समितीचे अध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांनी पुरस्कारप्राप्त पत्रकार परवेज मुल्ला यांचे अभिनंदन केले आहे.

यापूर्वी पत्रकार दिनानिमित्त कळंबचे तहसीलदार हेमंत ढोकले यांच्या हस्ते परवेज मुल्ला यांचा सत्कार करण्यात आला होता. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे, विश्वस्त सतीश बप्पा टोणगे, बप्पा आडसूळ, शितलकुमार घोंगडे आदी उपस्थित होते. तसेच कळंब नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. सुनंदाताई कापसे व नगरसेवक शितल चोंदे यांच्या हस्तेही त्यांचा सत्कार करण्यात आला होता.

परवेज मुल्ला यांच्या या सन्मानाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ३४ लाखांचा प्रतिबंधित पान मसाला जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई, सुमारे...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी जिल्ह्यात गुटखा व प्रतिबंधित पान मसाल्याच्या विक्रीविरोधात कडक कारवाईचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार (स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव) यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. सुदर्शन कासार व पथक गस्त घालत असताना धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून एक टाटा टेम्पो वाहन महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला पान मसाला घेऊन धाराशिवकडे येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

त्यानुसार पथकाने महामार्गावर गस्त वाढवली असता तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज, धाराशिव परिसरात सदर वाहन दिसून आले.



संशय आल्याने चालकाने वाहन वेगाने पळवण्याचा प्रयत्न केला.

आनंदनगर पोलीस ठाण्याच्या पथकाच्या मदतीने डी-मार्ट, धाराशिव समोर सदर वाहन शिताफीने थांबवण्यात आले. चालकाकडे चौकशी केली असता त्याने आपले नाव दीपक दिगंबर पुरी (रा. शिरपूर, ता. मंठा, जि. जालना) असे सांगितले. तपासणीदरम्यान वाहनामध्ये 'सागर २०००' हा महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला पान मसाला आढळून आला.

पोलिसांनी पंचनामा करून १८,९५,८८० रुपये किमतीचा सागर २००० पान मसाला व टाटा टेम्पो वाहनासह एकूण ३३,९५,८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कारवाईसाठी आरोपी व मुद्देमाल आनंदनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि. सुदर्शन कासार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार शौकत पठाण, जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण, चालक रत्नदीप डोंगरे तसेच आनंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक खांडेकर, सपोनि. परमेश्वर सोगे व पथकाने केली.

## तेर नगरीत गोरोबा काकांच्या कथेचा व अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.८ जानेवारी -**

'प्रति पंढरपूर' म्हणून ओळख असलेल्या आणि संत गोरोबा काकांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तेर नगरीत, तेरणा नदीच्या काठावर असलेल्या गोरोबा काकांच्या समाधीस्थळी गोरोबा काकांच्या कथेचा व अखंड हरिनाम सप्ताहाचा भक्तिमय सोहळा तेर ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.

दि.९ जानेवारी ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या या सप्ताहाला यंदा बारा वर्षे पूर्ण होत आहेत.

या कालावधीत दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत संतकथा प्रवक्ते हभप. दीपक महाराज खरात यांच्या मधुर वाणीतून संगीतमय, झांकी दृश्यांसह गोरोबा काकांच्या कथेचे रसाळ निरूपण होणार आहे.

दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची हरिकीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे.

दि.९ (शुक्रवार) हभप. गणेश महाराज भगत, दि.१० हभप. श्रीगुरु कान्होबा महाराज देहूकर, दि.११ हभप. दत्ता महाराज आंबीरकर, दि.१२ हभप. डॉ. अमृत महाराज जोशी, दि.१३ हभप. संदीपान महाराज हासेगावकर, दि.१४ हभप. डॉ. जयवंत महाराज बोधले, दि.१५ हभप. संजय महाराज पाचपोर. सप्ताहाची सांगता दि.१६ जानेवारी रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत कुठ अभंग प्रवक्ते महादेव महाराज राऊत यांच्या काल्याच्या हरिकीर्तनाने होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

तरी भाविकांनी या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन तेर ग्रामस्थ व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## उसाला आग लावून १.५ लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

वडगाव (सि.) ता.जि. धाराशिव येथे दि.६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ ते १ वाजण्याच्या सुमारास शेत गट नं. १०३ मधील ४० गुंटे उसाला आग लावून जाळल्याची घटना घडली. या प्रकरणी गणेश हरी वाडकर (रा. वडगाव सि.) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी नवनाथ गणपती घायाळ (वय ६०, रा. वडगाव सि.) यांच्या उसाचे अंदाजे १,५०,००० रुपयांचे नुकसान झाले असून, आरोपीने उसाच्या जाळ्यात टाकण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

फिर्यादीने दिलेल्या प्रथम खबरेवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# येरमाळ्यातील विश्राम गृहाची तीन कोटीची नविन इमारत तीन वर्षांपासून लोकार्पनाच्या प्रतीक्षेत?

सोलापूर तरुण भारत विशेष...

### चार एकर परिसराच्या विकासाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष...



**तभा वृत्तसेवा / सुधीर लोमटे**
**येरमाळा, दि.७ जानेवारी -**

येरमाळा हे गाव सोलापूर-धुळे,खामगाव पंढरपूर या दोन्ही राष्ट्रीय महामार्गांवर वसलेले दहा हजार लोकांवस्तीचे गाव येथील श्री येडेश्वरी देवी मंदिर राज्यासह परराज्यातही प्रसिद्ध आहे. त्यामुळे वर्षभर मोठ्या प्रमाणावर भाविक, प्रवासी लोकप्रतिनिधींची ये जा या गावात होत असते.

गावातील वाढती रहदारी आणि प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत येरमाळा येथे जुने शासकीय विश्रामगृह पाडून सुमारे तीन कोटी रुपये खर्चून नवीन अत्याधुनिक शासकीय विश्रामगृह उभारण्यात आले आहे.

मात्र, या विश्रामगृहाचे काम गेल्या पाच वर्षांपासून अत्यंत झाले. अखेर इमारत पूर्ण होऊन तीन वर्षे झाली अद्यापही या विश्रामगृहाचे लोकार्पण झालेले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये व ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष बाब म्हणजे या विश्रामगृहाला सुमारे चार एकर इतका प्रशस्त परिसर लाभलेला आहे.

इमारत उभारणी पूर्ण झाली असली तरी उर्वरित परिसरात अद्याप कोणत्याही प्रकारचा बाग-बगीचा, सुशोभीकरण किंवा हरित परिसर विकसित करण्यात आलेला नाही. योग्य नियोजन करून परिसरात बाग, वृक्षलागवड अंतर्गत रस्ते विकसित केल्यास इमारतीच्या सौंदर्यात उद्यानाप्रमाणे निश्चितच भर पडू शकते. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केवळ इमारतीच्या कामातच मोठा कालावधी वाया गेला असून परिसर विकासाबाबत विभागाची भूमिका निराशाजनक असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, गावातील ग्रामस्थांचे लक्ष आता या विश्रामगृहाच्या लोकार्पणाकडे लागले आहे. लोकार्पण कधी होणार, प्रवाशांना, अधिकाऱ्यांना ही सुविधा कधी उपलब्ध होणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित उपअभियंत्यांकडे चौकशी केली असता त्यांनी माहिती दिली कर्मचाऱ्या आभावी लोकार्पण राखडल्याचे सांगितले गेले.

### मंदिर व शहर विकासासाठी निर्णायक निवडणूक...

शासकीय विश्राम गृहाची इमारत तयार झाली असुन ती सुरु व्हावी याचा पाठपुरावा केला असता सार्वजनिक बांधकाम कार्यालयाने इमारत देखभालीसाठी कंत्राटी पद्धतीने देण्यासाठी प्रस्ताव दिला असल्याचे सांगितले असले तरी विभागीय अभियंता कार्यालय कोणताच प्रस्ताव कंत्रातदार प्रत्यक्ष टीकामाच्या संदर्भात भेटीला गेल्या शिवाय मंजुर करत नसल्याने ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या कामाची व्यवस्था असुन आता येरमाळकरांना विश्रामगृहाची इमारत चालु होण्याची प्रतीक्षाच करावी लागणार आहे, असे मला वाटते.

**- गणेश बारकुल,** उपसरपंच ग्रामपंचायत कार्यालय येरमाळा.

### मंदिर व शहर विकासासाठी निर्णायक निवडणूक...

यापूर्वी शासकीय विश्रामगृहाच्या देखभालीसाठी शिपाई, परिचार व इतर कर्मचारी उपलब्ध असत. मात्र सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अशी मनुष्यबळ व्यवस्था नसल्याने या नव्या विश्रामगृहाची देखभाल कंत्राटी पद्धतीने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संभाजीनगर विभागीय अभियंता कार्यालयाकडे, धाराशिव अधिक्षक अभियंता कार्यालयामार्फत इमारतीच्या देखभाली साठी कर्मचारी नडल्याने प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

**- प्रकाश धस,** उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय कळंब.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# निलंगा नगरपालिका स्वीकृत सदस्यपदी सगरे, प्रा. डॉ. तरंगे

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, ८ जानेवारी :** निलंगा नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी भारतीय जनता पक्षाच्या वतीने पत्रकार हरिभाऊ सगरे तर काँग्रेसच्या वतीने प्रा. डॉ. गजेंद्र तरंगे यांची निवड करण्यात आली आहे. राजकारण, समाजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रातील दोन अभ्यासू चेहऱ्यांना संधी मिळाल्याने शहरातून या निवडीचे स्वागत होत आहे.





निलंगा नगरपालिकेच्या राजकारणात स्वीकृत सदस्य पदासाठी पालिका निवडणुका झाल्यापासून अनेक जणांच्या नावांची चर्चा सुरू होती. अखेर गुरुवारी भाजपच्या वतीने पत्रकार हरिभाऊ सगरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून सगरे एक अभ्यासू व आक्रमक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी शहराच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली असून, आता थेट सत्तेच्या माध्यमातून त्यांना शहराच्या विकासात योगदान देण्याची संधी मिळाली आहे.

तर दुसरीकडे, काँग्रेस पक्षाने शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवलेले प्रा. डॉ. गजेंद्र तरंगे यांना संधी दिली आहे. डॉ. तरंगे यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे काम केले असून त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. त्यांच्या निवडीमुळे काँग्रेसने एका सुशिक्षित आणि कार्यक्षम चेहऱ्याला पालिकेत प्रतिनिधित्व दिले असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

एका बाजूला प्रदीर्घ अनुभव असलेले हरिभाऊ सगरे आणि दुसरीकडे शैक्षणिक क्षेत्रातील डॉ. गजेंद्र तरंगे अशा दोन दिग्गजांच्या निवडीमुळे निलंगा नगरपालिकेच्या चर्चेचा स्तर उंचावण्यास मदत होणार आहे. या दोन्ही नवनियुक्त सदस्यांचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे.

# विकासाचा अनुशेष भरून काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न : आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि. ८ जानेवारी :** औसा मतदारसंघातील किनीनवरे गावाचा सर्वांगिण विकासासाठी महत्त्वपूर्ण टप्पा ठरत, आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते

तालुक्यातील किनीनवरे येथील जवळपास ३ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व ७२ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या विकासकामांमुळे गावातील पायाभूत सुविधा अधिक भक्कम होणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठी सोय होणार आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांनी किनीनवरे गावास भेट देऊन किनीनवरे मुख्य रस्ता, केंगलवाडी मुख्य रस्ता, केंगलवाडी येथील स्मशानभूमीचे बांधकाम, समाजमंदिर बांधकाम तसेच जिल्हा परिषद शाळेतील स्वच्छतागृह बांधकाम अशा जवळपास ३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण केले. त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य

### ३ कोटींच्या कामाचे लोकार्पण; ७२ लाखाच्या कामाचे भूमीपुजन

उपकेंद्राच्या नवीन इमारतीसह सुमारे ७२ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, औसा मतदारसंघाचा अनेक वर्षांचा विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. पायाभूत सुविधा बळकट करण्यासोबतच शेतकरी हा विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून शेतरस्ते, पाणी आणि वीज या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचा आमचा संकल्प आहे.असे मत आ. पवार यांनी व्यक्त केले.



संतोष मुक्ता, सुभाष जाधव, हनुमंत किनीकर, ड. परीक्षित पवार, प्रवीण किनीकर, रेखनाथ देवणीकर, राधाकृष्ण जाधव, आदिनाथ जाधव, प्रतीक पाटील, प्रशांत डोके, राखी निकम,राम बिराजदार, सतीश मझेर, बंकर पाटील, एकनाथ शिंदे, सचिन अनसरवाडे, शंभूराज भोसले, महादेव जाधव, बंटी पाटील.स्थानिक ग्रामस्थ, पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किनीनवरे गावात झालेल्या या विकासकामांमुळे परिसराच्या सर्वांगिण प्रगतीला नवी दिशा मिळणार असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# जळकोट काँग्रेसच्या वतीने निषेध आंदोलन; चव्हाणांचा राजीनामा घ्या



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि. ८ जानेवारी :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्त्यांच्या मेळाव्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे लातूर शहरात आले आले असताना त्यावेळी त्यांनी काँग्रेसचे दिवंगत नेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल वक्तव्य केले. त्या निषेधार्थ जळकोट तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने जळकोट शहरातील भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रतिमेस जोडे मारून निषेध बस स्थानक समोर करण्यात आला.

तसेच चव्हाण यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यातकॉंग्रेस कमिटीच्या वतीने आला. यावेळी तालुकाध्यक्ष मारोती पांडे, काँग्रेसचे नेते बाबुराव जाधव, युवा नेते सचिन केंद्रे, महेश धुळशेट्टे, मेहताब बेग, बडगिरे, विश्वनाथ इंद्राळे, संग्राम कांबळे, अनिल सोनकांबळे, ज्ञानोबा पाटील, उत्तम मुंडकर, संभाजी कोंसबे, राम नामवाड, नगरसेवक संग्राम नामवाड, प्रमोदराव दाडगे, हावगी स्वामी, सुधाकर सोनकांबळे, मैनोदिन बिरादार,सुनिल नामवाड, अनिल सोनकांबळे आदिसह कॉंग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# खरोळा ग्रामपंचायतीची ४५ लाख ५ हजार ४५१ रुपयांची वसुली : देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि. ८ जानेवारी :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत ५० टक्के कर सवलत योजनेतुन रेणापूर तालुक्यातील खरोळा ग्रामपंचायतीने घरपट्टी, वीज कर, पाणिपट्टीची वसुली ४५ लाख ५ हजार ४५१ रुपये केली असल्याची माहिती सरपंच धनंजय देशमुख व ग्रामविकास अधिकारी आर.व्ही. अंकुशवाड यांनी दिली.

लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बाळासाहेब वाघ, रेणापूर पंचायत समिती गटविकास अधिकारी सुमित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली खरोळा ग्रामपंचायतीची वसुली व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रचार व प्रसार करून ३१ डिसेंबर २०२५ अखेर ४५ लाख ५ हजार ४५१ रुपये एवढी मोठी ऐतिहासिक ग्रामपंचायतीचे सरपंच धनंजय



वसुली केली. खरोळा येथील ग्रामस्थांनी ५० टक्के सवलतीचा फायदा घेऊन वेळेत कर भरणा केल्याबद्दल सरपंच धनंजय देशमुख यांनी ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले.

सदर वसुलीतून सोमवार दि. ५ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा ग्राम विकास निधी अंतर्गत दुकान गाळे करिता कर्ज घेतले . त्याची परतफेड चा धनादेश २० लाख ७८ हजार ९९६ रुपये सुधाकरराव देशमुख, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, ग्रामपंचायतचे ग्रामविस्तार अधिकारी अंकुशवाड आर. व्ही. यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यअधिकारी राहुल कुमार मीना, उप मुख्यकार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांच्याकडे शंभर टक्के डीव्हीडीएफ कर्ज परतफेडचा धनादेश सुपूर्द केला व खरोळा ग्रामपंचायत कर्जमुक्त करण्यात आली.

# नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, ८ जानेवारी :** येथील नवनिर्वाचित नगराध्यक्षा स्वाती सचिन हुडे व सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा मनोजदादा पुदाले मित्रमंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी नूतन अध्यक्षा स्वाती सचिन हुडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, मनोज पुदाले,माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, युवा नेते सचिन हुडे, सुधीर भोसले, नंदकुमार नळंदवार, अमोल निडवदे, विजय निटुरे, अमोल अनकल्ले, उत्तरा कलबुर्गे, सरोजा वारकरे, मंदाकिनी जिवणे, शामला कारामुंगे यांच्यासह भाजपचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते. यावेळी बोलताना मनोज पुदाले यांनी निवडून आलेल्या सर्व नूतन पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेच्या माध्यमातून सामान्य जनतेचे हित जोपासेल यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

नगराध्यक्षा स्वाती सचिन हुडे यांनी सत्काराला उत्तर देताना शहरातील जनतेनी आपल्यावर विश्वास टाकला तो विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.



# माधव बेंजरगे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



**त.भा. वृत्तसेवा,**
**देवणी, ८ जानेवारी :** युवा नेते माधव प्रभाकर बेंजरगे यांना राज्यस्तरीय समाजभूषण २०२५ पुरस्काराने दि. ५ जानेवारी २०२६ रोजी आहिल्यानगर येथे झालेल्या सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने हिसामनगर (माटेगडी) तालुका देवणी येथील सामाजिक कार्यकर्ते माधव प्रभाकर बेंजरगे या युवा कार्यकर्त्याला महाकालभक्त उज्जैन श्रीमहंत डॉ. श्रीकांतदास धुमाळ महाराज, सिने अभिनेत्री रुचिरा देसाई, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, स्त्री जन्माचे स्वागत चळवळीच्या नेत्या डॉ सुधा कांकरिया आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

# ५३ हजारांचे वीजबिल झाले चक्क दोन हजार

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, ८ जानेवारी :** निलंगा महावितरण चा मीटर रीडिंग घेणारा कंत्राटी विभाग ग्रामस्थांना अव्वाच्या सव्वा बिल मिटर रीडिंग न घेताच देत असल्याचे मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांच्या लक्षात येताच त्यांनी शिष्टमंडळासह महावितरण कार्यालयात भेट देत अधिकाऱ्यांना याचा जाब विचारला व शेतकऱ्याचे बिल जे ५३ हजारांचे तुम्ही दिले त्याची धास्ती घेऊन त्याला कसे छातीत दुखले हे सांगत जर चुकीच्या अवास्तव लाईट बिल मुळे त्याला हृदय विकाराचा झटका आला असता तर तुम्ही जबाबदारी घेणार होतात का असा परखड सवाल उपस्थित केला.

यावेळी अधिकाऱ्यांनी ही रिडींग घेणाऱ्यांची चूक आहे असे सांगत चालू रिडींग नुसार हे लाईट बिल दीड दोन हजारच भरावे लागेल असे त्या उपस्थित शेतकऱ्याला सांगितले. हे ऐकताच शेतकऱ्याने सुटकेचा निश्वास सोडला व मनसेचा धन्यवाद व्यक्त केला.

निलंगा महावितरण कार्यालय हे महाचरण कार्यालय झाले असून ग्रामस्थ शेतकऱ्यांना आवास्तव लाईट बिले देत शुल्लक कामांसाठी ही तालुक्याला अनेक हेलपाटे मारावे लागत आहेत कारण अधिकारी उपस्थितच राहत नाहीत. तसेच कार्यालयात बसूनच मीटर रिडींग न घेता डोअर लॉक लिहून अव्वाच्या सव्वा लाईट बिले दिले जातात. भ्रष्टाचाराची कीड लाईट मॅन पासून ते अधिकाऱ्यांपर्यंत लागली आहे. ग्रामस्थांना कुठल्याही कामासाठी आर्थिक मागणी महाप्रतापास जबाबदार लोकांवर गुन्हा दाखल केल्याशिवाय थांबू



केली जात असल्याच्या तक्रारी आमच्याकडे येत आहेत असे डॉ. भिकाने यांनी सांगत हे सुधरले नाही तर येणाऱ्या काळात दोषी अधिकाऱ्याला काळे फासू असा इशारा दिला आहे.

ह्या बोगस लाईट बिलच्या नका असे मनसेने अधिकाऱ्यांना सांगत यावर तात्काळ कार्यवाही करा असे सुचवले. यावेळी मनसे पदाधिकारी प्रदीप शेळके, गणेश उसनाळे, बालाजी पवार, विकास सूर्यवंशी, प्रदीप माने सह शेतकरी उपस्थित होते.

# कासार शिरसी-निलंगा जादा बस सोडण्याची मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**
**कासार शिरसी, ८ जानेवारी :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी ते निलंगा जाण्यासाठी जादा एसटी बस सोडण्यात यावी अशी मागणी निलंगा आगार व्यवस्थापक यांच्याकडे शिवसेनेच्या (उबाठा) वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कासार शिरसी ते निलंगा जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असून शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी कासार शिरसी, हसोरी, हरीजवळगा, भूतमुगळी व लिंबाळा या गावातून शिक्षणासाठी निलंगा येथे मोठ्या संख्येने जातात. परंतु एसटी बस गेल्या काही दिवसांपासून प्रत्येक थांब्यावर थांबत नसल्याने विद्यार्थ्यांची व प्रवाशांची मोठी हाल होत आहे. व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याचा विचार करून निलंगा आगारातून किंवा उमरगा आगारातून कासार शिरसी येथून सकाळी ८ वाजता निघणारी जादा एसटी बस सुरू करावी व इतर एसटी बस मार्गावरील प्रत्येक थांब्यावर थांबवावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. व या मागणीचा विचार नाही केल्यास शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही दिला आहे. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख शिवाजी नामदेव चव्हाण, सागर माने,बालाजी माने, शंकर चव्हाण, बालाजी चव्हाण व विद्यार्थी उपस्थित होते.

# सावित्रीच्या लेकींनी लिहिलेले मराठी कथा साहित्य ग्रंथ प्रदर्शन यशस्वी



**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर,८ जानेवारी :** सावित्रीबाई फुले जयंती व वाचन पंधरवड्यानिमित्त महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे आयोजित सावित्रीच्या लेकींनी लिहिलेले मराठी कथा साहित्य या विषयावरील विशेष ग्रंथ प्रदर्शनाचा समारोप उत्साहात झाला.

दोन्ही दिवस (५ व ६ जानेवारी) राज्यशास्त्र विभागासमोर भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनाला महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व वाचनप्रेमींची प्रचंड गर्दी झाली. प्रदर्शनात सावित्रीबाई फुले यांच्या वारशातून प्रेरित होऊन लिहिलेल्या महिला लेखिकांच्या निवडक मराठी कथासंग्रहांचे आकर्षक प्रदर्शन करण्यात आले होते. प्राचार्यांनी उपक्रमाचे कौतुक करत सर्व सहभागींचे अभिनंदन केले. याप्रसंगी ग्रंथपाल म्हणाले, या प्रदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढली असून, भविष्यात असे उपक्रम वारंवार घेतले जातील. हा उपक्रम यशस्वी करणाऱ्या सर्व टीमचे आभार मानले.

# रासेयो शिबिरातून विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास करून घ्यावा : अमोल पाटील

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, ८ जानेवारी :** राष्ट्रीय सेवा योजना ही शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक संस्काराची शाळा आहे. या शाळेतून जेवढे ज्ञान ग्रहण करता येईल तेवढे विद्यार्थ्यांनी करावे. फक्त अतिरिक्त गुण मिळतात म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये न येता सामाजिक भान डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी कामे करावीत. यातूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडतो असे मत निलंग्याचे नायब तहसीलदार श्री.अमोल पाटील यांनी व्यक्त केले. निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे. लिंबाळा ता. निलंगा जि. लातूर येथे आजपासून सुरू झाले या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी श्री.अमोल पाटील हे बोलत होते.

याप्रसंगी गटविकास अधिकारी सतीश पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी चांगले विचार, चांगले भाषण, चांगली व्याख्याने ऐकून आपल्या ज्ञानात भर पाडून घ्यावी. कारण हसनाळे, जि.प.शाळेच्या मुख्याध्यापिका



कोणताही वक्ता दिलेल्या विषयावर मांडणी करताना अनेक पुस्तकांचे वाचन करून एकत्रित मांडणी करीत असतो.

चांगले विचार आणि चांगले संस्कार मिळाले नाहीत तर आयुष्याची माती होते म्हणून विद्यार्थ्यांनी स्वतःला घडविण्यासाठी चांगल्या विचारांची कास धरावी.

याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, विस्तार अधिकारी आडे, सरपंच सखाराम कलबोने, उपसरपंच बालाजी माने, ग्रामविकास अधिकारी सौ.एस.व्ही. बेबीनंदा भोसले, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक यांची उपस्थिती होती.

या सात दिवशीय शिबिरात डिजिटल साक्षरता, पर्यावरण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, वृक्ष संवर्धन, महिला सक्षमीकरण, सायबर सुरक्षा, नशामुक्ती, यासारख्या विविध विषयांवर कार्यक्रम घेतले जाणार आहेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. विठ्ठल सांडूर यांनी तर आभार प्रा. शिवरुद्र बदनाळे यांनी मानले. सूत्रसंचालन कौशल्या बेलकुंदे व मोनिका सोमवंशी यांनी केले.

## सचिन यतोंडे यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर,८ जानेवारी :** येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील इंग्रजीचे अध्यापक सचिन यतोंडे यांचे दि.७ जानेवारी २६ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले.



सचिन यतोंडे हे इंग्रजीचे अध्यापक, मनमिळाऊ स्वभावाचे व जुनी पेन्शन आंदोलनातील लढाऊ शिलेदार म्हणून परिचित होते. मागील काही दिवसापासून ते आजाराने ग्रस्त होते. उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले आहे. लाल बहादूर शास्त्री विद्यालय, नातेवाईक व मित्र परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अंत्यसंस्कार त्यांच्या मूळ गावी जांब तालुका मुखेड सार्वजनिक स्मशानभूमीत करण्यात आले.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भजनी मंडळ नोंदणीच्या नावाखाली फसवणूक; तक्रार दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

भजनी मंडळात नोंदणी करून देतो, असे आमिष दाखवून शहरातील अनेक नागरिकांची फसवणूक झाल्याची तक्रार प्रकाश भांजी यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात दिली आहे.

तक्रारीनुसार, अनिता आरगडे नावाच्या महिलेने आमच्या भजनी मंडळात नाव नोंदणी करा असे सांगून प्रत्येकी तीन हजार रुपये घेऊन अनेकांची फसवणूक केली. नोंदणी केल्यानंतर संबंधितांना नकली प्रमाणपत्र देण्यात आले. प्रमाणपत्र देताना सर्व प्रक्रिया खरी असल्याचे भासवून दिशाभूल करण्यात आली.

मात्र, या प्रमाणपत्रांची चौकशी केली असता संबंधित भजनी मंडळच अस्तित्वात नसून संपूर्ण प्रकार बनावट असल्याचे निष्पन्न झाले. फसवणूक झाल्यानंतर प्रकाश भांजी व त्यांच्या पत्नीने पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रार अर्जात अनिता आरगडे या महिलेने शहरातील सुमारे १० ते १५ जणांची फसवणूक केल्याचा उल्लेख असून, संबंधित महिलेवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. पोलिसांनी तक्रार दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### गंधोरा येथील इंदिरा गांधी विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**नळदुर्ग, दि.८ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील गंधोरा येथील इंदिरा गांधी विद्यालय या शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा दि.७ जानेवारी रोजी विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राम बनसोडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापिका रावाबाई पवार, शिक्षक श्रीनिवास भोसले, महादेव तुप्पे, बलभिम कांबळे, नंदिनी आलुरे, योगिता बाळुरकर, उत्तम बनजगोळे, गुलाब राठोड, सगुणा राठोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थी रामराव मुसळे, लिंबाजी सोनटक्के, प्रविण पाटील, रंगनाथ चव्हाण, दिलीप चव्हाण, प्रविण जांभळे, सुरज एकंडे, दत्ता पाटील, पवन मुसळे, जाकीर शेख, अशोक धनवडे, गिरीश कुलकर्णी, उमेश मुसळे, सर्जेराव आळणे, सतीश मुसळे, राजेंद्र कोनाळे, हुसेन शेख, छबु मुसळे, पूजा भोसले, श्रीदेवी भोसले, हेमा भोसले, पुष्पा भोसले, पार्वती एकंडे, संगीता पाटील, दिपाली भोईटे, मैना भोसले, जेठीथोर सुवर्णा खबुले आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जि.प.-पं. स. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भूम येथे भाजपची आढावा बैठक संपन्न

**वाशी, दि.८ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील भूम येथे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने भूम भारतीय जनता पार्टीची आढावा बैठक बुधवार (दि.७) जानेवारी रोजी शहरात पार पडली. निवडणुका जवळ येत असल्याने सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी सुरू असून भाजपकडूनही संघटनात्मक हालचालींना वेग आला आहे. या बैठकीमध्ये आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या दृष्टीने पक्षाची भूमिका, रणनीती, तसेच कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या बैठकीला भाजप नेते तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, जिल्हा सरचिटणीस नितीन भोसले, बाळासाहेब क्षीरसागर, नगरसेवक समरजित ठाकूर, तालुकाध्यक्ष संतोष सुपेकर, महादेव वडेकर, प्रदीप साठे यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



### जैन कासार समाजाच्या वतीने नगराध्यक्ष, नगरसेवक व पत्रकारांचा सत्कार सोहळा

**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

येथील शिवपार्वती मंगल कार्यालय येथे नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक व पत्रकारांचा सत्कार सोहळा जैन कासार समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुलचंद व्यवहारे यांनी केले. सदर कार्यक्रमात समाजाचे मान्यवर जयश्री कंदले, वैशाली व्यवहारे, विशाल रोचकरी, चंद्रवदन शेटे, आनंद कंदले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभिक सत्रात समाजाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. नगराध्यक्ष विनोद गंगणे यांचा जैन कासार समाजाचे अध्यक्ष सुभाष शेटे व व्यापारी फुलचंद व्यवहारे यांच्या हस्ते शाल व फेटा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संस्कृती सविता सचिन कपाळे (वाशी, धाराशिव) यालाही सत्कार करण्यात आला. संस्कृतीने इटानगर, अरुणाचल प्रदेश येथे झालेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय ताईकांदो स्पर्धेत १७ वर्ष वयोगटातील मुलींच्या ३२ किलो खालील गटात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत कास्य पदक जिंकले होते, त्यामुळे समाजाच्या वतीने तिचा गौरव केला गेला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय मैंदर्गी यांनी केले तर आभार प्राध्यापक पद्माकर राव यांनी मानले. याप्रसंगी सुधाकर शेटे, संतोष शेटे, चिंतामणी भांबरे, अनिल सोलापूर, सुनील सोलापूरे, प्रमोद शेटे, बबलू रोकडे, संदीप शेटे, राहुल शेटे, पद्माकर राव, महावीर गडदे, रवि दुरुगकर, विलासराव रोकडे, सचिन गडदे, चैतन्य काटकर अनेक महिला व समाज बांधव उपस्थित होते.

### मराठा उद्योजकांसाठी शनिवारी मेळावा

**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

मराठा समाजातील उद्योजकांसाठी चए (मराठा आंत्रप्रेन्युअर असोसिएशन) च्या वतीने भव्य मेळावा आयोजित केला जात आहे. हा मेळावा शनिवार, १० जानेवारी २०२६, सकाळी ११ वाजता परिमल मंगल कार्यालय, धाराशिव येथे होणार आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेकडून चोरीची मोटारसायकल हस्तगत



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दि.६ जानेवारी २०२६ रोजी धाराशिव जिल्ह्यात मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्यासाठी गस्तीवर होते.

दरम्यान, बसस्थानक परिसरातील प्रदीप हॉटेलजवळील गेटमध्ये काळ्या रंगाची एक मोटारसायकल घेऊन एक इसम थांबला असून सदर मोटारसायकल चोरीची असल्याची खात्रीलायक गोपनीय माहिती पथकास मिळाली.

माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ तेथे जाऊन सूर्यकांत उर्फ सुरज उर्फ रावसाहेब मस्के (वय ३५, रा. मारवड गल्ली, धाराशिव ता. जि. धाराशिव) यास ताब्यात घेतले. गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला असता आरोपीने मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली.

पथकाने आरोपीच्या ताब्यातून चोरीची मोटारसायकल क्र. एम एच १४ एचटी १२४०, चेसी नं. ME4JVC65DGKD0६१७३४, इंजिन नं. JC65ED0१३२२७३ अशी सुमारे ४० हजार रुपये किमतीची मोटारसायकल हस्तगत केली आहे. नमूद आरोपीस पुढील कायदेशीर कारवाईसाठी धाराशिव पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशाने पोलीस हवालदार बळीराम शिंदे, राहुल नाईकवाडी, चव्हाण, अशोक ढगारे व चालक पोअं. दहीहंडे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## वाशी पारा रस्त्याची दयनीय अवस्था, नागरिकांच्या जीविताला धोका

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील वाशी पारा रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून संपूर्ण रस्ता खड्ड्यांनी व्यापलेला आहे. जागोजागी मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे नागरिकांसाठी जीव मुठीत घेऊन जाण्यासारखे बनले आहे.

या रस्त्यावरून ये-जा करताना नागरिकांना कंबरदुखी, मानदुखी यांसारख्या शारीरिक त्रासांना सामोरे जावे लागत असून दुचाकी व चारचाकी वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. दुचाकी वाहनांचे संतुलन बिघडणे, टायर फुटणे, पंचर होणे अशा घटना दररोज घडत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

वाशी तालुक्याला जोडणारा हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असल्याने दिवसभर या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्याची ही बिकट अवस्था असतानाही संबंधित प्रशासनाकडून दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. आता तरी प्रशासनाला कधी जाग येणार? हा रस्ता वेळेत दुरुस्त होणार की एखादा गंभीर अपघात झाल्यानंतरच हालचाल होणार? असे संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत असून, तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याची जोरदार मागणी केली जात आहे.

## ‘आय लव लोहारा’ सेल्फी पॉईंटची एका वर्षातच दुरवस्था

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ जानेवारी -**



सेल्फी पॉईंट राजकीय पक्षांच्या डिजिटल बोर्डांच्या अतिक्रमणात...

लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नगरपंचायत कार्यालयाच्या वतीने उभारण्यात आलेल्या ‘आय लव लोहारा’ सेल्फी पॉईंटची अवघ्या एका वर्षातच दुरवस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे. सदर सेल्फी पॉईंटवरील लाईट बंद पडल्या असून, बोर्डावरील अक्षरे खिळखिळी झाली आहेत.

राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्रातील नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका हद्दीत शहराच्या नावाने सेल्फी पॉईंट उभारण्यासाठी आर्थिक तरतूद करून मुख्याधिकाऱ्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

शहराच्या सुशोभीकरणासाठी व पर्यटनाला चालना देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात होता. मात्र, लोहारा नगरपंचायतीने उभारलेल्या ‘आय लव लोहारा’ सेल्फी पॉईंटकडे देखभालीअभावी दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

सध्या हा सेल्फी पॉईंट राजकीय पक्षांच्या डिजिटल बोर्डांच्या अतिक्रमणात सापडला असून, त्याच बोर्डाचा आधार घेऊन सातत्याने राजकीय फलक लावले जात आहेत. यामुळे शहराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत आहे.

नगरपंचायत प्रशासनाने या सेल्फी पॉईंटची तातडीने दुरुस्ती करून लाईट सुरू कराव्यात, खराब झालेली अक्षरे बदलावीत तसेच अतिक्रमण हटवावे, अशी मागणी लोहारा शहरातील नागरिकांकडून होत आहे.

## दर्पण दिनानिमित्त विविध संघटनांकडून पत्रकारांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

दर्पण दिनानिमित्त तुळजापूर शहरात विविध सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संघटनांच्या वतीने पत्रकारांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित करत अनेक ठिकाणी पत्रकारांचे सत्कार करण्यात आले.



अजित परमेश्वर मित्र मंडळाच्या वतीने जिजामाता नगर येथे माजी नगरसेवक अजित परमेश्वर व नगरसेविका डॉ. अनुजा कदम यांच्या हस्ते पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. तसेच नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या वतीने येथील स्कायलंड हॉटेल येथे नगराध्यक्ष विनोद गंगणे, विशाल रोचकरी तसेच आजी-माजी नगरसेवकांनी एकत्र येत शहरातील सर्व पत्रकारांचा सन्मान केला.

जवाहर तरुण मंडळाच्या वतीने नगरसेवक रणजीत इंगळे, आनंद जगताप, चिन्मय मगर यांनी पत्रकारांचा सत्कार केला.

तुळजाई पतसंस्थाच्या वतीने संस्थेचे चेअरमन राजाभाऊ देशमाने व नगरसेवक पंडितराव जगदाळे यांच्या हस्ते संस्थेच्या सभागृहात पत्रकारांचा गौरव करण्यात आला.

सायंकाळी नरेश काका अमृतराव मित्र मंडळाच्या वतीने कुंभार गल्ली येथे अमृतराव परिवार यांच्या हस्ते पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. आरपीआय पक्षाच्या वतीने मराठवाडा उपाध्यक्ष तानाजी कदम व नाना शितोळे यांनी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकारांचे सत्कार केले.

तसेच इस्कॉन व हरे कृष्ण भक्त यांच्या वतीनेही पत्रकारांचा गौरव करण्यात आला. इंद्रजीत साळुंके मित्र मंडळाच्या वतीने इंद्रजीत साळुंके, प्रसाद पाणपुडे, श्रीकृष्ण साळुंके यांनी बाळशास्त्री जांभेकर व दर्पण वृत्तपत्राचे छायाचित्र भेट देऊन पत्रकारांचा सन्मान केला.

यानंतर जैन कासार समाजाच्या वतीने गुलचंद व्यवहारे व माजी नगरसेवक विजय कंदले यांच्या हस्ते शिवपार्वती मंगल कार्यालय येथे शहरातील सर्व पत्रकारांचे भव्य सत्कार करण्यात आले.

## जि.प. निवडणुकीसंदर्भात शिवसेना उबाठा पक्षाच्या कार्यकर्त्यांची बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.८ जानेवारी -**

होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अणदूर जिल्हा परिषद गटातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बुधवारी (दि.७) रोजी हुतात्मा स्मारक, अणदूर येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीला शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व आमदार कैलास दादा पाटील उपस्थित होते.

बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांनी अणदूर जिल्हा परिषद गटातून डॉ. जितेंद्र कानडे यांना उमेदवारी देण्याची मागणी केली. मार्गदर्शन करताना जिल्हाप्रमुख आ. पाटील यांनी सांगितले की, महाविकास आघाडीच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. आगामी निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती आणि श्रीमंत व्यक्ती विरुद्ध गरीब शेतकरी यांसारखी असणार असल्याने, सर्वांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार करण्याची गरज आहे.

बैठकीचे आयोजक डॉ. जितेंद्र कानडे, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन सुनील जाधव, युवा सेनेचे ऋषिकेश मगर, तालुका संघटक कृष्णात मोरे, तालुका उपप्रमुख सरदार ठाकूर, धाराशिव कृषि उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्याम जाधव, जिल्हा प्रवक्ते जाधवर, ग्राहक सेनेचे राजेंद्र जाधव मेजर, नंदगाव ग्रामपंचायत सदस्य सूर्यकांत अरबळे यांसह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी तालुकाप्रमुख बाळकृष्ण घोडके पाटील यांनी केले तर आभार मकरंद भालकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशासाठी मनोज कस्तुरे, संजीव आलुरे, मकरंद भालकरे, प्रभाकर गाढवे, विशाल गुड्डु, देवा पाटील यांनी पुढाकार घेतला.

## सनातन धर्म व गोसंवर्धन जनजागृतीसाठी २५ हजार किमी पायी यात्रेवर असलेल्या दीपक गुप्तांचे श्रीक्षेत्र मैलारपुरात आगमन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ जानेवारी -**

बिहार राज्यातील साहेबगंज (मुजफ्फरपूर) येथील २१ वर्षीय गोरक्षक दीपक गुप्ता हा युवक सनातन धर्माचा प्रचार, तसेच भारतात गोहत्या थांबविण्यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने संपूर्ण भारतभर २५ हजार किलोमीटरची पायी यात्रा करत आहे. या यात्रेदरम्यान दि. ७ जानेवारी २०२६ रोजी त्यांचे तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुर येथे आगमन झाले. येथे त्यांनी श्री खंडोबा देव व माता बाणाई यांचे दर्शन घेतल्यानंतर पुढील प्रवासासाठी प्रस्थान केले.

आज सनातन धर्मावर विविध संकटे येत असून, हिंदू धर्मासाठी पवित्र असलेल्या गोमातेची मोठ्या प्रमाणावर होणारी हत्या ही चिंतेची बाब ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर दीपक गुप्ता यांनी समाजप्रबोधनाचा वसा घेत पाठीवर बॅग, भारताचा तिरंगा व हिंदू धर्माचा भगवा ध्वज घेऊन ही पायी यात्रा सुरू केली आहे. या यात्रेत ते १२ ज्योतिर्लिंगे व चार धाम दर्शन पूर्ण करणार आहेत.

आतापर्यंत २९२ दिवसांच्या प्रवासात १० राज्यांतून १३ हजार किलोमीटर पायी चालत त्यांनी ९ ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतले आहे. नळदुर्ग येथे त्यांच्या आगमनाची माहिती मिळताच शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले यांनी त्यांची भेट घेऊन विचारपूस केली, श्री



खंडोबा देवाचे दर्शन घडवून आणले तसेच भोजनाची व्यवस्था करून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देत त्यांना निरोप दिला. पुढील टप्प्यात दीपक गुप्ता हे मल्लिकार्जुन (श्रीशैलम), तिरुपती बालाजी, ओडिशातील श्री जगन्नाथ मंदिर आणि त्यानंतर झारखंड मार्गे नेपाळमधील श्री पशुपतीनाथ मंदिर येथे जाऊन आपली पायी यात्रा पूर्ण करणार आहेत. यासाठी त्यांना अजून सुमारे १२ हजार किलोमीटर पायी प्रवास करावा लागणार आहे.

सनातन धर्म व गोसंवर्धनासाठी २५ हजार किलोमीटरची पायी यात्रा करणारे दीपक गुप्ता यांचे कार्य धाडसी, महान व प्रेरणादायी आहे. मोबाईल व विविध व्यसनांच्या आहारी जाणाऱ्या आजच्या तरुणांसाठी दीपक गुप्ता हे आदर्श युवक ठरत असून, त्यांच्या या समाजहितकारी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सेरेंटिका कंपनीची हेल्पलाईन

**तक्रारी संदर्भात शेतकऱ्यांनी हेल्पलाईनशी संपर्क साधण्याने आवाहन.....**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

सेरेंटिका कंपनीच्या वतीने जिल्ह्यातील विविध भागात पवनउर्जा प्रकल्प तसेच पवनउर्जा प्रकल्पाच्या विद्यूत वाहिनी उभारण्याचे काम सध्या सुरु आहेत. सेरेंटिकाच्या वतीने हे प्रकल्प उभारताना शेतकऱ्यांना कांही समस्या, तक्रारी असतील तर त्यांनी सेरेंटिकाच्या वतीने नव्यानेच सुरु करण्यात आलेल्या टोल फ्री हेल्पलाईन १८०० २०२ ८७३५ या क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन सेरेंटिका रिन्यूएबल्स कंपनी कडून करण्यात आले आहे.

सेरेंटिका हे हरिज उर्जा क्षेत्रातील एक प्रतिष्ठीत नाव असून ही कंपनी धाराशिव जिल्ह्यात पवनउर्जा प्रकल्प उभारणीचे काम करत आहे.

हे प्रकल्प उभारत असताना पवनउर्जा प्रकल्पाशी संबंधित शेतकऱ्यांना कांही अडचणी, तक्रारी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी, शेतकऱ्यांना थेट कंपनीच्या प्रतिनिधीशी संवाद साधता यावा यासाठी सेरेंटिका कंपनीच्या वतीने टोल फ्री हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. नुकतेच जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते या हेल्पलाईनचे अनावरण करण्यात आले आहे.

या हेल्पलाईनला सध्या मोठा प्रतिसाद मिळत असून कंपनीच्या वतीने शेतकऱ्यांच्या अडचणी, समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी आंदोलन न करता या हेल्पलाईनवर संपर्क साधून आपली समस्या कळवावी, कंपनी त्यावर योग्य उपाय योजना करेल असे आवाहन देखील कंपनीच्या वतीने करण्यात येत आहे.

सेरेंटिकाच्या वतीने जिल्ह्यात विविध समाजपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. कंपनीच्या वतीने गावात शुध्द पाण्याचे प्रकल्प उभारण्यात आले असून अनेक तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्याचे काम कंपनी करत आहे.

तसेच मागील कांही दिवसापुर्वी सेरेंटिका कंपनीच्या वतीने जिल्ह्यातील



४० दिव्यांगाना व्हिलचेअरचे वाटप करण्यात आले आहे.

कंपनी ही कामे कर्तव्य समजून करत असून शेतकऱ्यांनीही कंपनीला सहकार्य करण्याचे आवाहन सेरेंटिका रेन्यूएबल्स कंपनीकडून करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

**घरजागा वाटणीपत्र**
**नामांतर ८ अ नाव नोंदणी**

जा.क्रमांकः १९८१
**नगर पंचायत कार्यालय, लोहारा बु.**, ता.लोहारा, जि.धाराशिव
जा.क्र./ नपलो / नामांतर / दि.०२/०७/२०२५

**भागाबाई विनायक रोडगे** यांनी या कार्यालयात दि.०२/०७/२०२५ रोजी सर्व्हे नं./ मिळकत नं. २०६९ (२) चे खरेदी खत/कोर्ट डिग्री/ वारसा आधारे नावं नोंद/नावं बदलनेसाठी नामांतर विभागात अर्ज दाखल केलेला आहे, व त्यानी ८ अ चा उतारा नक्कल मिळणे बाबत कळविले आहे. वरील घराची चतुरसीमा व लांबी खलील प्रमाणे.

**-जागेची चर्तु:सीमा-**

**पुर्वस** : विनायक रोडगे
**दक्षिणेस** : सगट यांचा प्लॉट
**पश्चिमेस** : गुंडू सगट
**उत्तरेस** : मारुती रोडगे यांचं प्लॉट

वरील चतुरसीमा आणि जागेची नाव नोंदणी/करिता आहे. तरी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की ज्या कोणास सदरहू नामांतराबाबत नाव नोंदणी हस्तांतरण बाबत तक्रार असेल तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात आलेल्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत तक्रार दाखल करण्यात यावी अन्यथा तक्रार नाही असे गृहीत धरून नामांतर करून दिले जाईल व नाव नोंदणी केली जाईल पुन्हा कोणाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत, लोहारा**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## एआय तंत्रज्ञान – डेटा सायन्स विषयांवर राष्ट्रीय परिसंवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** लातूरच्या अंबाजोगाई रोडवरील कॉक्सिट महाविद्यालयात नुकतेच एआय तंत्रज्ञान व डेटा सायन्स या विषयांवरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम.आर. पाटील हे होते.याप्रसंगी डॉ. बी.व्ही. धांद्रा, डॉ. आर. एस. हेगडी, डॉ. परागकावेरी, डॉ. राकेश देवरे, प्राचार्य डॉ. आर.एस. अवस्थी यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. डेटा सायन्समुळे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या माहितीचे सुसूत्रीकरण करण्यास मदत झाल्याचे डॉ. धांद्रा यांनी सांगितले. डॉ. परागकावेरी यांनी क्लाऊड कॉम्प्युटिंगविषयी अत्याधुनिक माहिती दिली. डॉ. देवरे यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स यावर महत्वपूर्ण सादरीकरण केले. तर डॉ. अवस्थी यांनी आंब्याच्या झाडावर ड्रोनच्या सहाय्याने फवारणी करण्याच्या तंत्रज्ञाची माहिती दिली. सदर राष्ट्रीय परिसंवाद डॉ. संतोष चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. त्यांना डॉ. दीपाली महामुनी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुषमा मुंडे यांनी केले. परिसंवादास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



# मनपा निवडणूकीचा प्रचार शिगेला

## लातूरचा सुजाण मतदार कोणाच्या बाजूने देणार ‘कौल’?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. प्रमुख राजकीय पक्षांसह प्रादेशिक पक्ष – अपक्ष, त्याचप्रमाणे भाजपच्या निष्ठावंतांची आघाडी लातूरच्या निवडणूक आखाड्यात उतरली आहे. सगळ्यांनीच प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसत असले तरी लातूरचा सुजाण मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार? याकडे प्रत्येकाचे लक्ष लागून राहिले आहे.

लातूर शहर मनपाच्या स्थापनेपासूनची ही तिसरी सार्वत्रिक निवडणूक आहे. मनपाची मुदत संपून आता जवळपास तीन वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. पहिल्या निवडणुकीत काँग्रेसने तर दुसऱ्या निवडणुकीत भाजपने मनपावर ताबा मिळवला होता. यावेळच्या निवडणुकीत भाजप, भारतीय राष्ट्रीय काँग्रेससह अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसही पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरली आहे. लातुरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुती एकत्रित लढण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, अखेरच्या क्षणी वाटाघाटी फिस्कटल्याने महायुतीतील हे दोन्ही प्रमुख घटक पक्ष स्वतंत्ररित्या लढत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत आपआपल्या कार्यकर्त्यांना अधिक संधी देता यावी या दृष्टीने स्वतंत्र लढणेच योग्य असल्याच्या प्रतिक्रिया पक्ष कार्यकर्त्यांसह सामान्य मतदारांतूनही व्यक्त केल्या जात होत्या.

या निवडणुकीच्या प्रचारासाठी उमेदवारांना अधिकचा वेळ मिळणार नसल्याने उर्वरित वेळेत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रत्येक उमेदवारांचा प्रयत्न आहे. शहराच्या सर्वच भागात सध्या भल्या सकाळपासून उमेदवार मतदारांच्या गाठी – भेटीसाठी फिरताना दिसत आहेत. प्रभाग मोठा आणि प्रचाराला वेळ कमी असल्याने उमेदवारांची आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची तारांबळ उडत असल्याचे पाहायला मिळत आहे. प्रचारासाठी कार – ऑटो – टेंपोसह छोट्या छोट्या वाहनांचा उपयोग केला जात आहे. उमेदवारांच्या प्रचाराच्या भोंग्यांनी सध्यस्थितीत लातूरकरांचे कान अक्षरशः बधिर होण्याची पाळी येऊन ठेपल्यागत झाले आहे. एका उमेदवाराच्या प्रचाराचा भोंगा गेला की दुसऱ्या उमेदवाराचा भोंगा दारापुढून जात असल्याने आता मतदारांनाही मनपा निवडणुकीच्या प्रचाराने आघाडी घेतल्याचे चांगलेच लक्षात येत आहे.

कडाक्याच्या थंडीत प्रचारासाठी जाताना उमेदवारांनाही अक्षरशः गारठल्यासारखे होत असल्याचे निदर्शनास येत आहे. मध्यंतरी ढगाळ वातावरणामुळे थंडीचे प्रमाण अंशतः घटले होते. तेव्हा अनेकांनी थंडी गेल्याचा आनंद व्यक्त केला होता. मात्र, मागच्या दोन दिवसांपासून थंडीचे पुन्हा कासवगतीने आगमन झाले आहे. किमान मनपा निवडणूक पार पडेपर्यंत तरी ही थंडी कायम राहील असा अंदाज आहे. त्यामुळे उमेदवारांना आपला उर्वरित प्रचार कडाक्याच्या थंडीचा सामना करतच पूर्ण करावा लागणार आहे. या निवडणुकीच्या प्रचारात आता सगळ्यांनीच आघाडी घेतली आहे. लातुरात भाजपच्या निष्ठावंत पण नाराज कार्यकर्त्यांनी भाजपासमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे भाजपच्या मतांवर नाही म्हटले तरी थोडाफार प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नाराज निष्ठावंत नसते तर मात्र भाजपच्या यासहचा मार्ग सोपा झाला असता, अशीही मतदारांत चर्चा आहे. लातूरचा मतदार सुजाण आणि अतिशय चाणाक्ष आहे. तो शेवटपर्यंत कोणाच्या पारड्यात आपले मत टाकणार आहे, याचा थांग लागू देत नसल्याने ही निवडणूक अतिशय चुरशीची आणि अटीतटीची होण्याची चिन्हे आहेत.

## वीर माहेश्वर पतसंस्था दिनदर्शिकेचे प्रकाशन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** येथील वीर माहेश्वर अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या वतीने नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन गुरुवारी दुपारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रकाशन प्रसंगी डॉ. मन्मथ स्वामी, कुमारस्वामी गणाचार्य, पतसंस्थेचे उपाध्यक्ष विजयकुमार मठपती, सचिव अशोक मठपती गुरुजी, विलास स्वामी गुरुजी, बसवराज स्वामी चिट्टे , बसवराज स्वामी लिंबाळकर, दत्तात्रय स्वामी बसपुरे, शिवकांत स्वामी, पतसंस्थेचे व्यवस्थापक अमोल हलगरकर, श्रीधर स्वामी, रामानंद स्वामी, प्रमोद सुरवसे, महेश स्वामी गणाचार्य आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपले विचार व्यक्त करताना सचिव अशोक मठपती यांनी संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा आयोजित केला जातो असे सांगितले. ही दिनदर्शिका पतसंस्थेच्या सर्व सभासदांना वितरित केली जाते. सर्व सभासदांनी लोकशाहीने आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकार मतदान करून अवश्य बजावावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## माजी खा. सुधाकर श्रृंगारे यांचा भाजपात प्रवेश



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** लातूर लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी गुरुवारी भाजपात प्रवेश केला. माजी मंत्री तथा निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या उपस्थितीत श्रृंगारे यांचा पक्षप्रवेश संपन्न झाला.

लातूर लोकसभा मतदारसंघातून २०१९ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या तिकीटावर सुधाकर श्रृंगारे हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले होते. यावेळी माजी खा. श्रृंगारे यांची मुलगी सौ. सुप्रिया पायाळ यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला. शहरातील पाटील प्लाझा येथे भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ‘नवोदय’ मृत्यू प्रकरणी पालकमंत्र्यांचा आढावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यूप्रकरणी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आढावा घेऊन तपास गतीने आणि पारदर्शकपणे करण्याच्या सूचना दिल्या.जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन मुलीच्या मृत्यूबद्दल अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत. त्या पार्श्र्वभूमीवर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत पालकमंत्री भोसले यांनी बैठक घेतली. घडलेली घटना अतिशय दुर्दैवी असून या प्रकरणी पोलिसांनी निष्पक्ष पद्धतीने तपास करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

या प्रकरणात आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती पोलीस प्रशासन आणि जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रशासनाने दिली.

## ग्रंथालय हे विद्यार्थ्यांचे बौद्धिक सामर्थ्य वाढविणारे केंद्र : प्राचार्य डॉ. कटारे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** अवांतर वाचनामुळे विचारक्षमतेचा विस्तार होऊन व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. नियमित वाचनाची सवय विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांसह आत्मविश्वास वाढवते. नियमित वाचनातून चिकित्सक विचारशक्ती, भाषिक कौशल्ये आणि आत्मविश्वास वाढतो. वाचनाची सवय ही आयुष्यभर साथ देणारी संपत्ती आहे. सर्व विद्यार्थ्यांना वाचनाशी मैत्री करावी. ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, वैचारिक आणि सांस्कृतिक जडणघडणीचे प्रमुख केंद्र त्यातूनच विद्यार्थी घडतो, असा विश्वास प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी व्यक्त केला.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव





येथे मराठी विभाग आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अवांतर वाचन संकल्प सप्ताह च्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, महाविद्यालयामध्ये वाचन सप्ताहाचे आयोजन करून सप्ताहभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये पुस्तक प्रदर्शन, वाचन प्रेरणा सत्रे, चर्चा परिसंवाद, निबंध लेखन स्पर्धा, कथालेखन स्पर्धा, वाचन अनुभव कथन यांचा समावेश असणार आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मराठी विभाग प्रमुख डॉ. जयदेवी पवार, अभ्यासक्रमा बाहेरील वाचनाचे महत्त्व, व्यक्तिमत्त्व विकासात वाचनाची भूमिका, विचारक्षमतेचा विस्तार, भाषिक समृद्धी आणि सामाजिक जाणीव वाढविण्यात अवांतर वाचन कसे उपयुक्त ठरते याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तर ग्रंथालयातील विविध साहित्यप्रकार कथा, कादंबऱ्या, चरित्रे, वैचारिक व प्रेरणादायी ग्रंथ,इनसायक्लोपीडिया यांची ओळख करून देत नियमित वाचनाची सवय लावण्याचे आवाहन यावेळी ग्रंथपाल डॉ.महावीर कटके यांनी केले. यावेळी अवांतर वाचनाच्या या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. कार्यक्रमाला डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भांजी, प्रा.चंद्रकांत मोरे, डॉ. मा.ना. गायकवाड, प्रा. विवेक गोस्वामी, सगर यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. शितल खोत यांनी केले.

## प्रा.डॉ.नारनवरेंना सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ८ जानेवारी :** निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी



येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रा.डॉ.अशोक उद्धव नारनवरे यांना ग्रामीण जनता शिक्षण प्रसारक मंडळ, चलबुर्गा, ता.औसा, जि.लातूर यांच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मा.अभिमन्यू पवार (आमदार, औसा विधानसभा मतदारसंघ) यांच्या हस्ते 'सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, ग्रंथ व शाल असे होते.

दि.३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त श्रीमती लक्ष्मीबाई ढेंकरे माध्यमिक विद्यालय, फत्तेपूर, ता.औसा येथे 'सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार' वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी व्यासपीठावर ग्रामीण जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.दत्तात्रय सुरवसे, सचिव ड.बाबुराव मोरे, फत्तेपूर च्या सरपंच अनिता माळी, श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर येथील प्रो.सविता किर्ते, मुख्याध्यापक अनिल मुळे इत्यादी उपस्थित होते.

प्रा.डॉ.अशोक नारनवरे यांना 'सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळाल्याबद्दल, शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ तथा संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ. शंकर कल्याणे, प्रा.बलभीम सातपुते, डॉ.सचिन हंचाटे, डॉ. प्रदीप पाटील, डॉ.जाफर चौधरी, प्रा.सुनील सर्वज्ञ, प्रा.विकास पाटील, संजीवकुमार होसुरे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रा.डॉ.अशोक नारनवरे यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## डिप्लोमा परीक्षा निकालात ‘एम एस बिडवे’ ची भरारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** नुकताच महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांनी डिप्लोमा हिवाळी परीक्षेचा निकाल जाहीर केला. या निकालामध्ये एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील वर्षापासून सुरू झालेल्या डिप्लोमा शाखेने उत्कृष्ट निकालाची परंपरा राखली आहे.

द्वितीय वर्ष सिविल अभियांत्रिकी मधून कु.ज्योती मंत्री हिने ८७.१८ इतके गुण तर प्रथम वर्षामध्ये कु. पायल श्रेया राजू हिने ८५% इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.

द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी मध्ये सुनील पाटील याने ८८% इतके गुण मिळवले तसेच प्रथम वर्षात कु. संध्या कांबळे हिने ८७.५० इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक राखला.

विद्युत अभियांत्रिकी मध्ये कु. अदिबा कासार हिने द्वितीय वर्षात ८८.१२ इतके गुण मिळवले तर प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी मध्ये वेदांत मुळे याने ८२.१२% इतके गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या द्वितीय वर्षांमध्ये कु.ऋतुजा मार्कड हिने ७८.११% इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रथम वर्षामध्ये कु. सायली कवठे हिने ८६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये द्वितीय वर्षांमध्ये रियाज गस्ते याने ८३.१८% गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रथम वर्षामध्ये प्रसाद सिंग ठाकूर याने ८७.३०% इतके गुण मिळवत प्रथम क्रमांकाचा मान मिळवला.

मेकॅनिकल विभाग द्वितीय वर्षामध्ये कु.शाहूबाई जाधव हिने ८०.५६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथम वर्षामध्ये कु. प्राची पंडिकोंडे हिने ७५ टक्के इतके गुण मिळवत प्रथम क्रमांकावर बाजी मारली. तसेच संपूर्ण महाविद्यालयाचा निकाल हा ८२.२५ टक्के लागला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्र्वर बुके, बस्वराज एरटे, काशिनाथ साखरे, सौ. ललिताताई पांढरे, महेश हलगे, बाबुराव तरगुडे, श्री गुरुलिंग धाराशिवे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाचे परिसर संचालक डॉ मोहन बुके, प्राचार्य डॉ. एस एम. जगदे, उपप्राचार्य प्रा. विरभद्र बाळे, निबंधक डॉ. सौ. ज्योती पाटील, डिप्लोमा प्रमुख डॉ. सुरज दामरे, प्रथम वर्ष प्रभारी प्रा. एन.के. प्रयाग यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व संबंधित प्राध्यापकांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

## महात्मा फुलेंच्या क्रांतीने सामाजिक परिवर्तन शक्य : डॉ. कुंभार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** स्त्री-पुरुष समानता, शिक्षण आणि जातीव्यवस्थेविरुद्ध शेवटच्या श्वासापर्यंत महात्मा जोतीराव फूले यांनी संघर्ष केला. समाजात समताधिष्ठित मूल्ये रुजावी, यासाठी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य समाजासाठी अभिमानास्पद, प्रेरणादायी आहे. महात्मा फूलेंच्या वैचारिक क्रांतीने सामाजिक परिवर्तन शक्य असल्याचे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत डॉ. नागारोव कुंभार यांनी केले.

बुधोडा ता. औसा येथील माझं घर प्रकल्पात महात्मा जोतिराव फूले यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी डॉ कुंभार प्रमुख उद्घाटक म्हणून बोलत होते. याप्रसंगी लेखिका अरूणा दिवेगावकर, प्रमोद झिंझाडे, राजेंद्र कासार, हरिश्र्चंद्र सूडे, ड. शोभाताई गोमारे, डॉ. निलम पन्हाळे,माया सोरटे,



रंजना चव्हाण,रंजना हासूरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बोलताना डॉ. नागारोव कुंभार म्हणाले की, महात्मा फुले यांनी सर्व जाती-धर्मांच्या लोकांना समान संधी मिळवून देण्याबरोबरच ब्राह्मणवादी वर्चस्वाला आव्हान देण्याचे कार्य केले. ज्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा मिळाली. समतेच्या लढ्यात शिक्षण हेच सामाजिक बदलाचे प्रमुख साधन मानून त्यांनी मुलींसाठी आणि बहुजन समाजासाठी भारतातली पहिली शाळा सुरू केली. सर्वांना समान ज्ञान यापध्दतीने शिक्षणाची व्यवस्था उभी केली. जातीभेदावर आधारित विषमतेला जोरदार विरोध केला. ब्राह्मण्यवादी वर्चस्वाला आव्हान दिले. स्त्रिया शिक्षीत झाल्या तरच समाज प्रगती करेल यावर त्यांचा विश्र्वास होता. त्यामुळे त्यांनी विधवा पुनर्विवाह व बालविवाहासारख्या प्रथांविरुद्ध आवाज उठवला. आज विविध क्षेत्रात महिलांची होणारी प्रगती महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याच्या कामाची पावती आहे.

स्त्री-मुक्तीच्या चळवळीचा पाया महात्मा फूले यांनी घातला. सामाजिक प्रबोधनाचे, परिवर्तनाचे पहिले पाऊल त्यांनी घट्ट रोवले. स्त्री ही पारंपरिक रुढीच्या दास्यातून खऱ्या अर्थान मुक्त व्हायची असेल तर तिला शिक्षण दिले पाहिजे याचा आग्रह त्यांनी धरला. हिंदूंच्या धर्मग्रंथात सांगितलेला सिद्धांताचा फोलपणा दाखवून देत ब्राह्मणी व्यवस्थेच्या वर्चस्वाच्या मूलाधारालाच त्यांनी धक्का देण्याचे काम केले. महात्मा फुले हे एक प्रचंड असे समाज परिवर्तनाचे, समाज सुधारणेचे, धगधगत्या पण वास्तववादावर उभे असलेल्या सामाजिक विचारांचे पहिले भारतीय समाज विद्यापीठ होते असेही डॉ. कुंभार म्हणाले. कार्यक्रमासाठी संगीता झरे, दगडूसाहेब पडिले, सतिष सोनकांबळे, पांडूरंग जाधव, सुनिल हेंगणे, रफिक पटेल, कपिल शेवाळे,निंबराज बिरादार, बस्वराज अष्टपुत्रे, संतोष साखरे आदींनी परिश्रम घेतले.